ई/233



# टीपू

वि. ग. ठेले

विश्व-मंगल प्रकाशन. पुणे २

ज हि रु दि न म हं म द

ऊर्फ

# बा बु र

*

: लेखक :

श्री. वि. गं. लेले, पुणें.

*

एकमेव विक्रेते
चा. रा. पेंडसे आणि मंडळी
७८२ सदाशिव, पुणें.

किंमत १॥ रु.

3

: प्रकाशक :
वि. वि. लेले,
विश्वमंगल प्रकाशन
५२७ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रथम मुद्रण
विजयादशमी शके १८७६
सर्व हक्क लेखकाधीन
: मुद्रक :
न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार पेठ, पुणें २.

ऱ्ही/233

## याच लेखकाच्या कांहीं पुस्तकांवरील अभिप्राय

### शिवशाहीचा अस्त :

**महाराष्ट्र, पुणें**

कादंबरीप्रमाणें अद्‌भुत व आकर्षक असें पुस्तक लिहीत असतांना श्री. लेले यांनीं कल्पनाशक्तीपेक्षां साक्षेपीपणानें जमविलेल्या माहिती-वरच भिस्त ठेविली आहे. हा इतिहास आहे. रोमांचकारी कथा आहे, पण काल्पनिक कादंबरी नव्हे. श्री. लेले यांनीं हा विषय त्रयस्थ वृत्तीनें लिहिला नाहीं. त्यांत स्वतःचें अंतःकरण ओतलें आहे. त्या-मुळें या पुस्तकांतील अनेक परिच्छेद भावनाशीलतेनें ओथंबलेले व माहितीनें भरगच्च भरलेले असे आहेत. ० ० ० हा विषय इतक्या यशस्वी तऱ्हेनें हाताळणारे श्री. लेले हे कोणी इतिहासाचे प्राध्यापक किंवा हा विषय व्यवसाय म्हणून अभ्यासणारे नाहींत. स्वतः इंजिनिअर असून इतिहासाचा त्यांना छंद आहे.

श्री. लेले यांनीं दीर्घ परिश्रमानें स्वीकृत कार्याशीं तादात्म्य पावून पुस्तक लिहिले. व फलटणचे अधिपति श्रीमंत राजे मालोजीराव यांनीं या ग्रंथाच्या प्रकाशनास साह्य केलें याबद्दल उभयतांना मराठी इतिहास वाचकांतर्फे धन्यवाद देऊन हे समीक्षण पुरे करतों.

प्रा. रा. वि. ओतूरकर, पुणें.

प्रबुद्ध भारत, सप्टेंबर १९४८

'Not personal interest but the cause of the Nation First' should be our motto, which has been emphasized by the author in lucid and vivacious style. Mr. V. G. Lele (the author) has done great service to the nation by bringing out this book at an opportune moment when nation building literature of this type is the need of the day.

सकाळ, पुणें १९४८

श्री. लेले यांचें पुस्तक इ. स. १९४८ मध्यें प्रसिद्ध झालें. एक प्रकारें साताऱ्या गादीचें शतसांवत्सरिक श्राद्धच त्यांनीं केलें आहे. इ. स. १८४८ मध्यें शेवटला छत्रपति आप्पासाहेब निधन पावला व त्याचा दत्तक पुत्र अमान्य करून कंपनी सरकारनें साताऱ्याचें राज्य खालसा केलें. विजयनगरच्या साम्राज्याचा शेवट सांगणाऱ्या हरिभाऊ आपट्यांची 'वज्राघात' कादंबरी वाचतांना जो अनुभव येतो तसाच अनुभव येथेंही येतो. कादंबरीपेक्षांही विदारक सत्यकथा यांत सांगितल्या आहेत. स्वतःच्याच दुर्दैवाचा चित्रपट प्रेक्षक बनून पाहतांना जसा तो पाहवतही नाहीं आणि अर्धवट टाकून उठवतही नाहीं, तसाच प्रकार शिवशाहीचा अस्त हातीं घेतल्यावर होतो. पुढें काय झालें हें जाणण्याच्या अधिऱ्या औत्सुक्यानें वाचक पानामागून पानें वाचीतच सुटतो. लेखकानें स्वतःच लिहिलें आहे, 'प्रस्तुत पुस्तकाचा विषय म्हणजे दुःखद घटनांची मालिकाची मालिकाच. ती संकलित करतांना मनाला अत्यंत क्लेश झाले'. वाचकालाही त्या वाचतांना अनेक यातना होतात व हृदयाला चटके बसतात, पण त्यांत व्यक्तिदोषापेक्षां आत्मनिरीक्षणाचा हेतु प्रधान आहे. स्वकीय वा परकीय कोणाच्याहि दुर्गुणांबद्दल घृणा व गुणांबद्दल गौरव करतांना मनाचा समतोलपणा त्यांनीं राखला आहे.

प्रभात, १३-७-१९४८

इतिहास वाचीत असतांना ज्यांच्या मनांत ममत्वाचा थोडातरी अंश असतो त्यांच्या मनांत विशेष प्रकारची कालवाकालव होते. शिवशाहीचा अस्तही गोष्ट महाराष्ट्रांतील लोकांच्या मनाला विशेष खेद उत्पन्न करणारी आहे.

खुद्द इंग्रज सरकारनें सातारच्या राज्यासंबंधीं झालेला सर्व पत्रव्यवहार, आपण स्वतः केलेलीं लहानमोठीं बरींवाईट कृत्यें आणि खुद्द प्रतापसिंहमहाराज आणि आप्पासाहेब महाराज यांचें खाजगी आणि सार्वजनिक जीवन व इंग्रज सरकारशीं त्यांचे आलेले संबंध यासंबंधीचें सर्व दप्तर छापून शिल्लक ठेविलें आहे. हें दप्तर वाचणें म्हणजे कांहीं महिन्यांचें काम आहे, आणि त्याचा कागद भुरा काळसर झाल्यानें अधू डोळ्याचे लोकांनीं हें वाचन करण्यापूर्वीं दहादां विचार करावा. श्री. लेले यांनीं तें वाचलें असून श्री. बसू यांच्या ग्रंथाचेंही अवलोकन केलें आहे.

बाळाजीपंत नातूचें तें लोभी, देशद्रोहाचें आणि स्वजन-विद्वेषाचें वर्तन पाहून उद्वेग उत्पन्न झाल्यावांचून राहात नाहीं आणि खुद्द प्रतापसिंहमहाराजांच्या भावानें केवळ राज्य-लोभानें आपल्या भावाच्या कीर्तीवर आणि गुणवैभवावर अंगार ठेवण्यास तयार व्हावें आणि बाळाजीपंत नातूसारख्या क्षुद्र बुद्धीच्या इसमाशीं संगनमत करावें हें पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं त्या काळीं महाराष्ट्रांतून कडव्या सद्‌गुणांची पिछेहाट होत होती आणि दुर्गुणांचा काळाबाजार सर्वत्र भरत होता. श्री. लेले यांनीं ही पिछेहाट आणि हा बाजार याचें वर्णन निर्भयपणानें आणि कसलीही बाकी न ठेवतां केलें आहे.

श्री. लेले यांच्या भाषेसंबंधानें मुद्दाम लिहिलें पाहिजे. खास मराठी भाषेचे उत्कृष्ट नमुने या ग्रंथांत तुम्हांला ठिकठिकाणीं आढळतील. जे वाक्प्रचार मराठी भाषेची गोडी वाढवितात आणि ज्यामुळें तें तें लिखाण सरसकट लोकांना जवळचें वाटतें, पण ते वाक्प्रचार बहुतेक लेखकांच्या लेखनांतून सांप्रत गेलेले आहेत. लेले यांच्या लिखाणांत मात्र ते जिकडे तिकडे सांपडतात, त्यामुळें जिवंत आणि ओळखीचें मराठी आपण वाचीत आहोंत असें वाटतें. लेले यांची भाषा फार चटकदार आहे. शिवशाहीच्या अस्तासंबंधींची या पुस्तकांत दिलेली हृदयद्रावक हकीगत एकदां तरी मुळांतूनच वाचावी अशी वाचकांस माझी विनंति आहे.

प्रा. श्री. म. माटे, पुणें

त्रिकाळ, ता. १५ मार्च १९४८

'शिवशाहीचा अस्त' म्हणजे शिवप्रभूनीं आयुष्य पणास लावून उभविलेल्या हिंदवी स्वातंत्र्याचा शेवट वा अखेर. अशा दुर्दैवी घटनांचें समालोचन हें सहृय वाचकांचे डोळ्यांत अश्रू उभे करणारें, हृदयास चटके देणारें आणि घडलेल्या अक्षम्य चुकांमुळें मनास पीळ पाडणारें झालें असल्यास नवल नाहीं. जेथें न्यायनिष्ठुर अशा प्रत्यक्ष इतिहासलेखकाची भग्नहृदय अशी अवस्था झाली तेथें वाचक शोकरसानें न्हाऊन निघेल यात काय आश्चर्य! इतिहास म्हणजे एक रुक्ष विषय अशी अनेकांची खरी वा खोटी समजूत असते. परंतु प्रस्तुत ग्रंथांतील वेधक भाषाशैलीनें मोहून जाणार नाहीं असा वाचक सांपडणें विरळाच ० ० ० त्यामुळें परिच्छेदामागून परिच्छेद वाचतांना अनेक गत घटनांनीं गजबजलेल्या आणि अवचित सांपडलेल्या एखाद्या ऐतिहासिक राजवाड्याचीं दालनेचीं दालनें एकामागून एक आपण ओलांडत आहोंत कीं काय असें वाचकास वाटतें.

मनोहर मासिक, १९४८

या ऐतिहासिक सत्यकथेंत अद्भुतता सर्वत्र पसरली आहे. पुस्तकांतील निरनिराळ्या प्रकरणांना नांवेंही कादंबरीला शोभण्यासारखींच आहेत. 'भेदनीतीचें जहर' 'फितूर', भ्रमाचा भोपळा फुटला, आरोप, न्यायाचें थोतांड, तळिराम थंड झाला इत्यादि मथळे या दृष्टीनें पहाण्यासारखे आहेत. करुणरस सर्व कथेंत आरंभापासून शेवटपर्यंत चढत्या प्रमाणावर निर्माण होऊन तो इतक्या तीव्रतेला पोहोंचतो कीं, वाचकाचें मन खिन्न होऊन शेवटीं "अरेरे! काय हा आमचा अध:पात!" असे उद्‌गार मुखावाटे बाहेर पडतात.

प्रस्तुत ग्रंथाची भाषा सहजसुंदर, ओघवती व निरनिराळ्या प्रसंगांना अनुरूप अशीच आहे. लेखक स्वत: विषयाशीं तादात्म्य पावून त्याच्या अंत:करणांत तत्कालीन परिस्थिति व व्यक्ति याविषयीं विविध भावना उदित होत राहतात व त्यामुळें भाषेंत स्वाभाविकपणा उत्पन्न होतो.

प्रा. गो. वि. तुळपुळे, पुणें.

## कळस—ऐतिहासिक कथासंग्रह

चित्रमय जगत्, फेब्रुवारी १९५१

मराठ्यांच्या, पेशव्यांच्या व मोगलांच्या इतिहासांतील कांहीं निवडक प्रसंगांवर आधारलेल्या या सात स्फूर्तिदायक कथा म्हणजे इतिहासकालांतील ज्वलंत चलच्चित्रेंच होत. शिवशाहीचा अस्त व मराठ्यांच्या वीर कथा प्रसवणाऱ्या तेजस्वी लेखणींतून या कथा उतरल्या आहेत त्यावरून त्या किती रसरशीत व धगधगींत असतील हें सांगावयास नकोच. ऐतिहासिक पार्श्वभूमि व कमावलेली वीर-रसपोषक भाषा यामुळें प्रत्येक गोष्ट वाचनीय झाली आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत या पुस्तकाचा अवश्य समावेश झाला पाहिजे.

**महाराष्ट्र, नागपूर**

श्री. लेले यांच्या ऐतिहासिक कथा परिणामकारक असून त्यांनीं त्यांतून ध्येयवादाचें केलेलें दिग्दर्शन सुंदर आहे. पालकांनीं चांगले संस्कार होण्यासाठीं मुलांच्या हातांत जीं पुस्तकें द्यावीं त्यांत या पुस्तकाचा अवश्य समावेश केला पाहिजे. श्री. साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, २७-५-५१

**काळ, १-२-१९५१**

या सर्वच कथा मराठ्यांच्या गुणावगुणांवर प्रकाश टाकणाऱ्या, करुण व वीररसानें रसरसलेल्या व मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं विचार-प्रवर्तक झाल्या आहेत. अशीं पुस्तकें शाळांतील अभ्यासक्रमांत अवश्य नेमावींत. त्यांच्या वाचनानें मुलांना हसत खेळत इतिहासाचें ज्ञान होईल, इतिहासाची गोडी लागेल व तीं स्वदेश व स्वदेशीय यांच्याविषयीं अभिमान व प्रेम बाळगूं लागतील.

## मयूरसिंहासन—कथासंग्रह

**प्रभात, पुणें २०-५-५४**

कै. हरिभाऊ आपटे यांच्यानंतर आजच्या पिढींत तेंच महत्कार्य श्री. लेले हे आपल्या कुवतीप्रमाणें आपल्या प्रभावी लेखणीनें करीत आहेत. स्वातंत्र्य मिळालें असलें तरी भूतकालीन इतिहासाचे धडे विसरून चालणार नाहींत.

मूळचा ऐतिहासिक सत्याचा पाया कायम ठेवून त्यावर आकर्षक व मनोरंजक गोष्टीचा उठाव करावयाचा हें मोठें कौशल्याचें काम आहे. तें श्री. लेले यांना फार चांगलें साधलें आहे.

के. वि. गोडबोले, पुणें.

प्रिय मातेच्या पुण्यस्मृतीस

# निवेदन

बारा वर्षांपूर्वी १९४२ सालापासून लिहून ठेविलेल्या मोगल सम्राटांच्या चरित्रमालेपैकीं पहिला बादशहा जहिरुद्दिन महंमद ऊर्फ बाबुर याचें छोटें चरित्र आज १९५४ सालीं विजयादशमीच्या सुमुहूर्तावर प्रकाशित होत आहे. जहिरुद्दिन महंमद ऊर्फ बाबुर हें नांव बरोबर असून त्याचें बाबर हें चुकीचें नांव रूढ झालें आहे. तेव्हां तो फरक आवर्जून लक्षांत घ्यावा अशी विनंति आहे. बाबर म्हणजे सिंह अथवा वाघ या अर्थाचा शब्द पर्शियन भाषेंत आहे. त्याचा बाबुर या शब्दाशीं कांहींही संबंध नाहीं.

दिल्लीवर राजे म्हणून राज्य करणाऱ्या मोगल राजांचीं चरित्रें मराठींत नाहींत, तीं वाचकांस उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे. तो मीं यथाशक्ति केला आहे.

मोगल सम्राटांतील बाबुराचें चरित्र फार अपूर्व आहे. बाबुर स्वतः मोठा रसिक, चौकस व प्रतिभाशाली लेखक होता. त्यानें स्वतः आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. तें रसिक वाचकाला मंत्रमुग्ध करून टाकणारें आहे.

बापाच्या गादीवर तो वारसा-हक्कानें राजा म्हणून प्रस्थापित झाला. त्या वेळीं त्याचें वय केवळ अकरा वर्षांचें होतें. त्याचा बाप निवर्तला आणि तो पोरका होऊन गादीवर आला. त्या वेळेपासून संकटांनीं त्याचा पिच्छा पुरवला. त्याला सुखाचा दिवस दिसला नाहीं वा चांगल्या माणसांचा आसरा मिळाला नाहीं. तैमूरच्या

गादीवर–समरकंदवर राजा म्हणून राज्य करावें ही त्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. ती सिद्धीस नेण्याची त्याची धडपड भयंकर होती. त्यासाठीं त्यानें अविरत प्रयत्न केले. अनेक संकटें ओढवून घेतलीं. कित्येक वेळां तो राज्यपदावरून फेकला गेला. या धका-धकींत अशा कांहीं विलक्षण घटना घडून आल्या कीं, तैमूरचें छोटेंसें समरकंद व त्याचा तो छोटासा बादशहा ह्या गोष्टी पार नाहींशा होऊन तो हिंदुस्थानसारख्या अफाट देशाचा सम्राट् झाला. त्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षीं मोठ्या विलक्षण तऱ्हेनें तडीस गेली. असा हा मोठा विचित्र इतिहास आहे. बाबुराचें चरित्रही मोठें गमतीदार आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचावें म्हणजे त्याचा प्रत्यय त्यास आल्यावांचून राहणार नाहीं.

दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउसचे कुशल कर्णधार श्री. रा. न. शं. कुलकर्णी यांनीं मोठ्या आपलुकीनें सहकार्य केल्यानें या पुस्तकाच्या प्रसिद्धीचा योग जुळून आला.

पुणें,<br>
विजयादशमी,<br>
शके १८७६

वि. गं. लेले

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | | | पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १. बालपण | .... | ... | ... | १७ |
| २. राज्यस्थिति | ... | ... | ... | २० |
| ३. शत्रूचा बीमोड | ... | ... | ... | २३ |
| ४. इसान-दौलत बेगम | | ... | ... | २५ |
| ५. बालराजा | ... | .... | ... | २७ |
| ६. समरकंद | ... | ... | ... | ३० |
| ७. समरकंदवर चाल | | ... | ... | ३२ |
| ८. शंभर दिवसांचें राज्य | | ... | ... | ३५ |
| ९. अर्धें राज्य | .... | ... | ... | ३८ |
| १०. रंकाचें जिणें | ... | ... | .... | ४० |
| ११. आमंत्रण | ... | ... | ... | ४२ |
| १२. नामधारी राजा | ... | ... | ... | ४४ |
| १३. अंदिजानला रामराम | | .... | .... | ४७ |
| १४. फसगत | ... | ... | ... | ४८ |
| १५. पुन्हां एकदां समरकंद | | ... | .... | ५० |
| १६. पुढील तयारी | ... | ... | ... | ५३ |
| १७. ज्योतिषानें केलेला घात | | ... | ... | ५५ |
| १८. समरकंदला रामराम | | ... | ... | ५८ |
| १९. वनवास | .... | ... | ... | ६१ |

२०. जखमी वाघ ... ... ... ६४
२१. कुचंत्रणा ... ... ... ६६
२२. सुटका .... ... ... ६८
२३. काबूल ... ... ... ७१
२४. स्थिरस्थावर व व्यवस्था ... ... ७४
२५. हिरात ... ... ... ७७
२६. दारूचें दुरून दर्शन .... .... ७९
२७. खडतर प्रवास .... .... ... ८१
२८. काबूलचें कारस्थान ... ... ८४
२९. कंदाहार .... ... ... ८६
३०. बादशहा ... ... ... ८९
३१. पुन्हां एकदां समरकंद ... ... ९२
३२. सिंहासनावरून उचलबांगडी .... ... ९६
३३. तोफेचें ओतकाम ... ... ९९
३४. दारूबाज ... ... ... १०२
३५. पानिपत ... ... ... १०५
३६. कालंदर ... .... ... १०९
३७. अनाहूत संकट ... .... ... ११२
३८. राणा संग ... ... ... ११५
३९. कानवाची लढाई ... ... ११८
४०. इतर सत्ताधाऱ्यांचा बीमोड ... ... १२४
४१. हुमायूनसाठीं बलिदान ... ... १२७
बाबुराचें चारित्र्य ... ... ... १३५

# बाबुर

## सनावलि

इ. स. १४-२-१४८३ बाबुराचा जन्म.
९-६-१४९४ उमरशेखचा मृत्यु.
१४९४ बाबुर फरघाना प्रांताचा राजा झाला
१४९५ समरकंदावर चौघांच्या स्वाऱ्या.
१४९७ बाबुराची समरकंदवर स्वारी.
१४९९ अंदीजान बाबुराच्या ताब्यांत आलें.
१५०० फरघानाप्रांताचीं शकलें झालीं.
मे १५०१ बाबुराची शैबानीखानावर चाल.
१५०१ उलुग बेग ( बाबुराचा चुलता ) याचा मृत्यु.
१५०३ शैबानीखानाच्या तडाख्यानें चंगीजखान व तैमूर यांचे वंशवृक्ष उन्मळून पडले.
१५०५ बाबुर हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत आला.
१५१० शैबानीखानाचा मृत्यु.
१५११ बाबुराचा समरकंदास राज्यारोहणसमारंभ.
१५१२ बाबुराचा सुनी प्रजेकडून पराभव.
१५१९ बाबुराची बजाउर लोकांवर चाल.
१५२२ कंदाहार कायमचें बाबुराच्या अमलाखालीं आलें.
१० एप्रिल १५२६ पानिपतावर इब्राहिमखानाचा बाबुराकडून पराभव.
१६ मार्च १५२७ बाबुराची राणा संगाबरोबर लढाई.
२५ डिसेंबर १५३० बाबुराचा मृत्यु.

# बाबुरवरील अभिप्राय

श्री. वि. गं. लेले यांनीं आपला हौसेचा विषय म्हणून इतिहासाचा अभ्यास करून जें ग्रंथलेखन केलें त्यांत त्यांच्या ' बाबुर ' चरित्रामुळें एक उपयुक्त भर पडली आहे. जे परकीय पुरुष या देशांत येऊन राज्यस्थापना करतात आणि वंशपरंपरा निर्माण करतात त्यांचें जीवन तरी काय आहे याची सविस्तर ओळख या चरित्रानें विद्यार्थ्यांना होईल. महत्त्वाकांक्षा, कष्ट, काटकपणा, पराक्रम, दूरदृष्टि, मुत्सद्देगिरी हे गुण असणारे राज्यकर्ते होतात व सुखलोलुप, नाजूक, आळशी, अल्पसंतुष्ट, घरकोंबडे लोक इतरांचे गुलाम होतात हा धडा आजच्या विद्यार्थ्यांनीं बाबुरचरित्रापासून घेतला तर भावी पिढी निराळ्या दृष्टीची निघेल. या चरित्रांत बाबुराच्या जीवनाचे अनेक बरेवाईट पैलू आहेत. बालपणापासून राजकारणाची जबाबदारी घेणारा बाबुर; रणांगणांत स्वतः लढणारा योद्धा; स्वतःच्या देखरेखीखालीं तोफा ओतून घेणारा शिपाई; रोज पांचपन्नास कविता करून स्वतःची दैनंदिनी लिहून ठेवणारा साहित्यिक; सुंदर बागा, इमारती, शिल्पकला, यांची स्थापना करणारा रसिक; मुलावर प्राणापेक्षां अधिक प्रेम करून त्याला कठोर शिस्त लावणारा पिता; लढाईत उलट्या काळजाचा आणि त्यानंतर भूतदयेनें प्रेरित असा राजा; दूरदृष्टि ठेवून आपल्या वंशाची गादी स्थापन करणारा राज्यसंस्थापक अशा अनेक पैलूंनीं युक्त असें हें चरित्र मराठी भाषेंतील इतिहास-विषयक पुस्तकांत उपयुक्त भर घालील.

डॉ. ग. श्री. खैर.

श्री. विनायकरावजी लेले यांसी—सस्नेह नमस्कार वि. वि. तुमचें बाबुरचें हस्तलिखित साद्यंत वाचलें. मराठींत बाबुराबद्दल स्वतंत्र चरित्रग्रंथ असा दिसत नाहीं. एखाद्या पुस्तकाचा भाग म्हणून कांहीं मजकूर बाबुरासंबंधानें आला आहे; पण स्वतंत्र चरित्र-ग्रंथ असा मराठींत नाहीं. ती उणीव ह्या चरित्रानें दूर होईल. भाषा सोपी, मांडणी प्रेरक व आकर्षक झाली आहे. लेखन मुख्यतः मुलांसाठीं असलें तरी प्रौढांनाहि तें आपण वाचावें असें वाटणारें आहे. प्रस्तुत अधिक काय लिहिणें? ग्रंथाला सुयश चिंतितों.

शंकर नारायण जोशी, १८-१२-४२

# जहिरुद्दिन महंमद

ऊर्फ

# बाबुर

## बालपण : : : १

स्वराज्य-संस्थापक श्री छत्रपति शिवाजीमहाराजांच्या पूर्वीं बरोबर शंभर वर्षें बाबुराचें चरित्र घडलें. इ. स. १६३० मध्यें शिवाजीमहाराजांचा जन्म झाला तर इ. स. १५३० ला बाबुराचा चरित्र-ग्रंथ आटोपला ! त्याचा जन्म ता. १४ फेब्रुवारी इ. स. १४८३ त झाला. त्याचें नांव जहिरुद्दिन महंमद असें ठेवण्यांत आलें. मोगल लोकांच्या रासवट जिभेला जहिरुद्दिन महंमद हें अरबी नांव उच्चारतां येईना म्हणून त्यांनीं त्याचें नांव बाबुर ( वाघ ) ठेविलें. तेंच नांव इतिहासांत महशूर झालें. बाबुराच्या आईचें नांव कुतलुक निगार व बापाचें नांव उमरशेख. बाबुराचा जन्म होतांच त्या उभयतांस फार आनंद झाला. ही आनंदाची बातमी बाबुराच्या पित्यानें आपल्या श्वशुरास कळविली व त्यास या आनंदाच्या प्रसंगीं भाग घेण्यासाठीं मुद्दाम आमंत्रण दिलें. बाबुराच्या माय-आजाचें नांव युनुसखान असून तो मोगल

प्रांताचा राजा होता. या वेळीं त्याचें वय सत्तर वर्षांचें होतें. एवढ्या उतार-वयांत नातवंडाची प्राप्ति म्हणजे मोठी अपूर्व गोष्ट झाली असें त्यास वाटलें, आणि म्हातारा मोठ्या आनंदानें या उत्सवप्रसंगीं दाखल झाला. जिकडे तिकडे मौज चालली होती. युनुसखानाच्या नातवंडाचें (बाबुराचें) जावळ करण्यांत आलें. हा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. बाबुराच्या बाललीला माता-पितरांना आनंद देत होत्या. बाबुर दिवसानुदिवस मोठा होत होता. तो पांच वर्षांचा झाला तेव्हां त्यास समरकंद येथें नेण्यांत आलें. समरकंदचा सुलतान अहंमद याच्या छोट्या लेकीशीं (आइशा) त्याचा साखरपुडा झाला. समरकंद पाहण्यासाठीं आलेल्या या बाल-पाहुण्यानें चांगलाच लाट मारला. समरकंदच्या सुलतान अहंमदचा तो जांवई झाला. हा सुप्रसंग आनंदानें पार पडला. या छोटेखानी नियोजित नवरा-नवरीचे अनेक गमतीचे सोहाळे झाले.

यापुढील त्याचीं चार-पांच वर्षें शिक्षणांत गेलीं. बाबुरास आतां अकरावें वर्ष लागलें. या वर्षीं त्याचा पिता उमरशेख अक्षीच्या किल्ल्यांत अपघाती मरणानें मेला. त्या काळच्या राजे लोकांना कबूतरें खेळविण्याचा नाद होता. उमरशेखचा कबूतरखाना अक्षी किल्ल्याच्या नदीकडील बाजूच्या तटावर होता. उमरशेख कबूतरें पाहण्यासाठीं तेथें गेला असतां तो तट कोसळला. तटाबरोबर उमरशेख फेकला गेला व जागच्या जागीं ठार झाला (ता. ९ जून इ. स. १४९४). उमरशेखनंतर बाबुर फर्घाना प्रान्ताचा राजा झाला. अकरा वर्षांच्या या कोवळ्या पोराच्या मस्तकावर छत्रचामरें झळकूं लागलीं आणि मोर्चेलें वारलीं गेलीं.

जगताच्या दृष्टीनें बाबुर राजा झाला, छत्रपति झाला; पण तीं छत्र-चामरें सुखाचीं नसतात. त्यांच्यामागें दबा धरून बसलेल्या असंख्य कट्यारी दिवसाढवळ्या टळटळींत बारा वाजतां भर चौकांत कंठस्नान घालण्यास कमी करीत नाहींत. तारामंडळाप्रमाणें चकचकणाऱ्या राजमुगुटास फड्या निवडुंगाचे अणकुचीदार काटे असतात आणि ते मस्तकाच्या नाजूक नाजूक

मज्जातंतूंना टोंचून टोंचून तो धारण करणाऱ्या माणसास बेजारगतीस आणतात. ह्या नित्याचा अनुभव बाबुराच्या बाबतींत सतरा आणे अनुभवास आला. बिचारा इ. स. १४९४ ला फर्गांना प्रांताच्या गादीवर आला, आणि या वेळेपासून जी लढत सुरू झाली ती तो मरेपर्यंत एकसारखी चालू होती. त्याच्या आयुष्यांतील दोन इद म्हणजे आपल्या भाषेंत सांगावयाचें तर दोन दिवाळ्या त्यास केव्हांही एके ठिकाणीं गेल्या नाहींत. पायाला सारखी भिंगरी होती आणि राज्याच्या उलथापालथी चालू होत्या. आज गादीवर बसावें, राजा झालों म्हणून समाधानाचा सुस्कारा सोडावा तोंच पुन्हा अशा कांहीं विचित्र घटना घडून याव्यात, कीं राज्यत्याग करून रानोमाळ अन्नापाण्यावांचून उपाशीतापाशी भटकण्याचा प्रसंग यावा. अशी ही धुमश्चक्री एकसारखी चालू होती. आज राजा तर उद्यां रंक, आज अमीर तर उद्यां फकीर असें होत होतें. सुखदुःखाचा-पाठशिवणीचा खेळ एकसारखा चालू होता. क्षणांत आनंदाच्या चांदण्यांत तर क्षणांत संकटांच्या खाईत असें बाबुराचें भाग्यचक्र एकसारखें फिरत होतें.

## राज्यस्थिति : : : २

बाबुर हा उमरशेखचा युवराज—थोरला मुलगा—असल्याकारणानें त्यास फर्गाना प्रांताचें राज्य वारसाहक्कानें प्राप्त झालें. तें राज्य म्हणजे ५०००० चौरस मैलांचा सुपीक प्रदेश. त्याच्या राजधानीचें नांव अंदिजान. या राज्यावर बाबुर आणि त्याचा बाप उमरशेख दोघेही खूष नव्हते. त्यांची दृष्टि समरकंदवर होती. जगद्विख्यात तैमूरच्या सिंहासनावर आपणास राजा म्हणून राज्य करण्यास सांपडावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती; पण ती सफल न होतां बाबुराच्या पित्यास स्वर्गाची वाट धरावी लागली, पुढें बाबुरानें मात्र गादीवर आल्यापासून दोन-तीन वर्षांच्या आंत आपल्या मृत पित्याची इच्छा तडीस नेली. तो समरकंदचा राजा झाला.

बाबुराच्या आजाचें नांव अबदुल सय्यद. हा तैमूरलंगाचा नातू. बाबुर हा तैमूरपासून पांचवा आणि चंगीजखानापासून चौदावा पुरुष लागतो. तेव्हां त्याच्या शरिरांत ह्या इतिहासांत गाजेलल्या दोन्ही वंशांचें रक्त सळसळत होतें. आईकडून तो मोगल होता आणि बापाकडून तुर्क होता. खुद्द बाबुरास तुर्कांच्याबद्दल आपलेपणा वाटे आणि मोंगल लोकांबद्दल तिरस्कार वाटे. त्यानें संस्थापिलेल्या साम्राज्यास तुर्क-साम्राज्य हेंच नांव योग्य होतें, पण असें न होतां त्यास मोगल-साम्राज्य असें नांव पडलें. ही घटना अतिशय विचित्र आहे खरी.

हीं झाली मोगल साम्राज्याची हकीगत; पण बाबुराच्या हातीं आलेल्या वंशपरंपरागत राज्याची हकीगत फारच निराळी आहे. बाबुराचा मूळ पुरुष जो तैमूर त्यानें जिंकलेल्या राज्याचे अनेक भाग झाले होते आणि त्यांवर मिरासदारीचा वारसा हक्क सांगणारे तैमूरचे वंशज कचाकच एकमेकांचे गळे उतरत होते. तैमूरच्या त्या छोट्या राज्याचे सात तुकडे झाले होते, आणि त्या सात तुकड्यांवर सातजण स्वतः राजे म्हणून वावरत होते.

( १ ) ताशकंद आणि सैरामशाह खरवीया या प्रांतावर बाबुराचा थोरला मामा महंमद खान, ( २ ) ताशकंद आणि यलदूज या दोन ठिकाणांच्या मध्यांतील प्रांतावर बाबुराचा धाकटा मामा अहंमद खान, ( ३ ) समरकंद आणि बुखारा यांच्यावर बाबुराचा सर्वांत मोठा चुलता अहंमद मिर्झा, ( ४ ) बदकशान हिसार आणि कुंदूज यांच्यावर त्याच्याहून धाकटा चुलता महंमद मिर्झा, ( ५ ) काबूल आणि गझनी याच्यावर बाबुराचा सर्वांत धाकटा चुलता उलुघ बेग, ( ६ ) खुरासान आणि हिरात याच्यावर तैमूरच्या खास वंशांतील पुरुष हुसेन मिर्झा आणि ( ७ ) फर्घाना प्रांतावर बाबुरचा बाप उमरशेख याप्रमाणें राज्य करीत होते.

हे सातजण सात राज्यांचे धनी होते. वास्तविक हे एकमेकांचे काके-मामे, रक्तांनीं परस्परांशीं निगडीत झालेले. तेव्हां गुण्यागोविंदानें नांदत असतील अशी कल्पना होणें सहाजीक आहे, पण ते तसे नव्हते. भाऊबंदकीच्या पिशाचानें त्यांस इतकें पछाडलें होतें कीं बोलावयाची सोय नाहीं. भांडणें भांडणें हा त्यांचा नित्याचा व्यवसाय होता. बाबुराचा बाप उमरशेख हा कांहीं या गोष्टीस अपवाद नव्हता; तोही भांडखोर होता. त्यानें आपल्या मेहुण्यांना आणि भावांना सतावून सोडलें होतें. तेव्हां त्याचा कांटा काढून फर्घाना प्रांत काबीज करण्याचा बेत मुक्रर झाला होता व त्याप्रमाणें हालचालीस सुरुवातहि झाली होती. इतक्यांत उमरशेख मरण पावला. ही बातमी वाऱ्याच्या वेगानें सगळीकडे फैलावली. शत्रु नाहींसा झाला, उमरशेखबरोबर आपलें वैर

होतें तें त्याच्याबरोबर संपलें, त्याच्या कोवळ्या बच्च्यानें आपला कांहीं अपराध केला नाहीं तेव्हां स्वारीचा बेत रद्द करावा असें त्यांस केव्हांही वाटलें नाहीं. उलट उमरशेख गेला हीच गोष्ट आपल्या फायद्याची झाली; ही सुवर्णसंधि दवडणें मूर्खपणाचें होईल; तो गेला, आतां फर्घाना प्रांतास कोणी शास्ता उरला नाहीं; त्याच्या घरांत पोरवडा झाला; बाबुर अकरा-बारा वर्षांचा कोवळा पोर, एकाद्या कोवळ्या कांकडीप्रमाणें आपण त्यास पिरगळून टाकूं आणि मोकळे होऊं या इर्ष्येनें बाबुराच्या चुलत्यांनीं व मामांनीं फर्घाना प्रांतावर चाल केली; पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं.

## शत्रूंचा बींमोड : : : २

राजा म्हणून बाबुराच्या नांवाच्या ललकाऱ्या हवेंत उठतात न उठतात तोंच शत्रूंच्या रणभेरींचे आवाज फर्घाना प्रांताच्या सरसीमेवर ऐकूं येऊं लागले. ताशकंदहून बाबुराचा थोरला मामा महंमदखान आणि समरकदहून त्याचा थोरला चुलता अहंमद मिर्झा मोठ्या तयारीनें निघाले. एका बाजूनें चुलता आणि दुसऱ्या बाजूनें मामा आपल्या दाढी-मिशांना पीळ भरून गुरगुरत येतांना पाहून छोटा बाबुर घाबरला ! त्यांच्या मनगटाला मनगट भिडवण्याची ताकद आपल्याला नाहीं हें तो जाणून होता. तेव्हां त्यानें मवाळीचा मार्ग पतकरला. त्याचा थोरला चुलता अहंमदखान हा जवळ येतांच बाबुरानें त्यास निरोप पाठविला कीं, फर्घाना प्रांताचा मी वारसा-हक्कानें राजा आहें, पण मी तें राजेपण सोडून देतों आणि तुमचा सुभेदार म्हणून या प्रांतावर राहतों; तरी तुम्ही आपली चढाई बंद करा आणि मागें फिरा. बाबुराच्या या निरोपाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. अहंमदखान तसाच चाल करून येऊं लागला; पण बाबुर भाग्यवान् होता. अहंमदखानानें फर्घाना प्रांतांतील उरातिपा, खोजंद आणि मार्धिनान हीं गांवें झपाट्याबरोबर घेतलीं आणि त्याचा मोर्चा बाबुरावर वळला. या वेळीं बाबुर अंदिजान या ठिकाणीं होता. आपल्या निरोपास वाटाण्याच्या अक्षता लावून अहंमदखान आपल्या-

वर चाल करून येत आहे आणि आतां आपली धडगत नाहीं असें पाहून, दैवावर हवाला ठेवून बाबुर येणाऱ्या संकटाची वाट मोठ्या धैर्यानें पहात होता.

चालून येणाऱ्या अहंमदाच्या सैन्यानें एका नदीच्या पुलावर विजयोन्मादांत घिसाडघाई केली. त्याबरोबर तो पूल पडला आणि बरेंचसें सैन्य नदींत कोसळलें. त्या नदींत भयंकर रेताड होतें. त्यांत सैनिक घोड्यांसुद्धां गटंगळ्या खाऊं लागले आणि रेताडांत रुतले. अहंमदखानाचें सैन्य ह्या अपघातामुळें बेदिल झालें, त्याचा धीर सुटला. हा मोठा अपशकुन झाला असें त्यांना वाटूं लागलें. कारण चार वर्षांपूर्वीं याच ठिकाणीं त्याचा असाच विचका झाला होता. या मानसिक दौर्बल्यानें त्यास पछाडलें तोंच सैन्यांत एका भयंकर रोगाचा उपद्रव सुरू झाला. लोक पटापट मरूं लागले. अहंमद घाबरला आणि बाबुरानें तहासाठीं दिलेली संधी आपण उगीचच वाया दवडली म्हणून तो पश्चात्ताप करूं लागला. पण ती वेळ अजूनही गेली नव्हती. बाबुर बिचारा वयानें लहान आणि त्याच्यावरील हा प्रसंग पहिलाच होता. तेव्हां अहंमदखानाचा डाव साधला. त्यानें जिंकलेलीं शहरें आपल्या ताब्यांत ठेविलीं आणि बाबुराशीं सलोखा करून तो समरकंदकडे वळला. पण तिकडे जात असतांना वाटेंतच अहंमदवर मृत्यूनें झडप घातली आणि बाबुराचा एक शत्रु कायमचाच मातीस मिळाला.

अहंमदखानाची ही स्थिति झाली, पण ताशकंदहून निघालेला त्याचा थोरला मामा महंमद जोरांत होता. त्यानें कासान आणि अक्षी या दोन शहरांवर चाल केली. तेथें मात्र बाबुराच्या बेग लोकांनीं चांगलाच प्रतिकार केला. जोराचे रट्टे बसतांच महंमदखानाचा नक्षा उतरला आणि आपण उगाच या भानगडींत पडलों असें त्यास वाटलें. बाबुर व त्याचे बेग लोक यांचें सामर्थ्य त्याच्या चांगलेंच प्रत्ययास आलें आणि तो माघारीं फिरला. महंमदखान हा आरंभशूर होता. त्यास प्रथमग्रासे हा मक्षिकापात होतांच त्याचें गाडें कायमचें थंडावलें.

## इसान दौलत बेगम : : : ४

शत्रूंचा नायनाट झाला आणि बाबुर सुखानें राज्य करूं लागला. बाबुर बालपणांत राजा झाला आणि त्या राजेपणांत त्याला जीं प्राणघातक संकटें सातत्यानें भोगावीं लागलीं, त्या सर्व संकटांस तोंड देण्याचें धैर्य त्याच्या ठिकाणीं अवतीर्ण होण्यास मुख्य कारण म्हणजे त्याची आजी. बाबुरानें आपल्या सुप्रसिद्ध आत्मवृत्तांत अनेक ठिकाणीं तिच्याबद्दल धन्योद्गार काढले आहेत. तिचें नांव इसान दौलत बेगम. ही फार चतुर आणि मोठ्या धीराची बायको होती. तिच्या सांगण्यावरून बाबुरानें अनेक साहसाचीं कामें अंगावर घेतलीं आणि तीं तडीस नेलीं. ती बाई मोठ्या नेकीची होती. इसान दौलत बेगमच्या आयुष्यांत एक मोठा गंभीर प्रसंग होऊन गेला. एकदां बाबुराच्या आजाचा–युनुसखानाचा–शेख जमाल नांवाच्या एका शत्रूनें पराभव केला. दुर्दैवानें युनुसखान आणि त्याचें कुटुंब इसान दौलत बेगम या उभयतांस कैद झाली व त्या दोघांस वेगवेगळ्या ठिकाणीं ठेवलें. युनुसखान जिवंत असतांना शत्रूनें इसान दौलतचें लग्न दुसऱ्याशीं लावण्याचा घाट घातला. शादी लावण्यासाठीं एक गृहस्थ तिच्या निवासस्थानीं दाखल झाला. या बाईनें त्यास निमूटपणें आंत घेतलें, दारास कुलूप ठोकलें आणि आपल्या दासींच्या करवीं त्याचा खून पाडला. ही बातमी जमालला कळतांच त्यानें याचा जाब विचारला. त्याबरोबर तिनें बाणेदारपणानें उत्तर दिलें: जमालनें धर्माविरुद्ध वर्तणूक

केली. युनुसखान माझा पति जिवंत असतां माझें दुसऱ्याबरोबर लग्न लावण्याचा प्रयत्न झाला म्हणून मी माझा पति होऊं पाहणाऱ्या त्या माणसाची खांडोळीं उडविलीं. जमालनें फार तर माझा प्राण घ्यावा, पण असला पाणचटपणा करूं नये. या बाणेदार उत्तरानें शेख जमालच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. त्यानें इसान दौलतला मोठ्या मानानें पतिसंनिध नेऊन ठेविलें. त्या ठिकाणीं हें जोडपें एक वर्षभर तुरुंगांत होतें. नंतर त्यांची सुटका झाली. ह्याच इसान दौलतच्या धैर्याची दौलत बाबुरास आपत्तीच्या प्रसंगीं मनमुराद उपयोगीं पडली. त्यास अभंग आणि अखंड धैर्याचा ठेवा या महामातेच्या पवित्र चरणापासूनच लाभला.

## बाल-राजा : : : ५

स्वराज्याच्या सरहद्दीवर शत्रूंचा गराडा एकसारखा भेडसावीत असतां ह्या बारा वर्षांच्या बाल-राजानें कसा राज्यकारभार हांकला असेल हा विचारच मोठा मौजेचा वाटतो. अठरा कारखाने आणि त्या कारखान्यांचे प्रमुख यांना या पोराची काय कदर वाटत असेल? अष्टप्रधानांच्या वाटाघाटींत हा कोणत्या सूचना करीत असेल आणि कसा भाग घेत असेल याची कल्पनाच होत नाहीं. पण ज्या ठिकाणीं आपली कल्पना कुंठित होते त्याच ठिकाणीं या बारक्या बाबुरानें प्रत्यक्ष काम केलें आहे. बाल-बाबुराचें स्वरूप मोठें गोंडस होतें. तो राजबिंडा होता, पापभिरू आणि सत्‌शील होता. त्याच्या चेहऱ्यावर एक तऱ्हेचें पावित्र्य चमके. त्याचा स्वभाव गोड होता. त्याच्याजवळ अशी कांहीं जादू होती कीं तो कोणासही क्षणभर भारून टाकी. हे त्याचे गुणविशेष त्याच्या आयुष्यभर त्यास उपयोगीं पडले.

बाबुराची एक जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती आणि ती त्यानें आपल्या बालपणापासून उराशीं बाळगली होती. ती म्हणजे समरकंदचें राज्य जिंकून तेथील तैमूरच्या सिंहासनावर अधिष्ठित राजा म्हणून राज्य करावयाचें. फर्घाना प्रान्ताची राजधानी अंदिजान येथें बाबुर होता आणि या ठिकाणाहून त्याचीं सर्व सूत्रें हालत होतीं. बाबुराचें राजमंडळ म्हणजे राजमंडळच होतें.

त्यांची मर्जी संभाळणें म्हणजे फार मोठी कठीण गोष्ट होती. नेहमीं राजमंडळास राजाची मर्जी संभाळणें अशक्य पण अवश्य असतें; पण येथें प्रकार उलटा होता. राजा राजमंडळाची मर्जी संभाळतां-संभाळता हैराण झाला होता. त्याचे सरदार लोक अत्यंत बदमाष होते. केव्हां कोण काय करील आणि कसा गळा कापील याचा नेम नव्हता. बाबुरापासून निघून जाण्यास त्यांना अल्पसें कारण बस्स होत असे. त्याच्या वाडिलाच्या वेळच्या सर्व सरदारांनीं त्यास सोडून दिलें तरी पण बाबुर घाबरला नाहीं. त्यांच्या जागा त्यानें नव्या सरदारांची भरती करून भरून काढिल्या.

बाबुर नुकताच गादीवर बसला होता. लाळघोट्या लोकांचें कड्याळ त्याच्याभोंवतीं जमा झालें होतें. बाबुराची थोबाडभर स्तुति करण्यांत अहमहमिका लागली होती. तेव्हां सापाच्या शेपटीप्रमाणें वळवळणाऱ्या जिभेच्या शेंड्यावर अमृत आणि अंतःकरणांत हालाहल बाळगणारे प्राणी कोण आणि पाक दिलाचे कोण हें उमगणें कठीण होतें. बाबुरानें त्या मंडळींतून हसन याकूब या नांवाच्या एका गृहस्थास आपला मुख्य दिवाण नेमिलें. बाबुर लहान असल्यामुळें त्याच्या हातीं सर्व सत्ता केंद्रित झाली. तो बोलेल तें धोरण आणि बांधील तें तोरण असें झालें. अशा स्थितींत हसन याकूबला राजकारण करण्याचें कांहींच कारण नव्हतें; पण त्यानें बाबुरच्या धाकट्या भावास-जहांगिरास गादीवर बसविण्याचें कारस्थान शिजविलें. जहांगिर गादीवर आल्यास आपणास मुक्त हस्तानें सर्व सत्ता वापरतां येईल अशी त्याची कल्पना होती; पण हें सर्व राजकारण करतांना तो हें विसरला होता कीं, त्याला बाबुराच्या आजीशीं—इसान दौलत बेगमशीं हे खेळ खेळावयाचे होते. इसान दौलत बेगमला ह्या कपटकारस्थानाची बातमी लागतांच तिनें बंदोबस्तास सुरवात केली. हें राजकारण आपल्या अंगावर बेतणार असें कळतांच हसन याकूब समरकंदकडे पळून गेला. तो जातांना वाटेंत किरकोळ चकमकी झाल्या, त्यांत त्यास त्याच्याच लोकांनीं सोडलेल्या एका बाणानें पैगंबराच्या भेटीस

रवाना केलें. अत्यंत विश्वासांतील माणसानें असा दगा दिल्या कारणानें बाबुरास चांगलाच धक्का बसला व त्यानें यापुढें कोणावरही विश्वास ठेवण्याचें सोडून दिलें. तो खाण्यापिण्याचे पदार्थ तपासूं लागला. इतकेंच काय पण खान्याचे चाकू, चमचे, काटे, यांच्यावरसुद्धां त्यानें करडी नजर ठेविली. धार्मिक आचार व देव-देवतार्चन तो मोठ्या शिस्तीनें पाळूं लागला. मध्य-रात्रींच्या प्रार्थना फारच क्वचित् वेळां तो चुकवीत असे. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, त्याच्या चित्तवृत्ती धीर-गंभीर बनल्या. कसल्याहि घनघोर प्रसंगीं त्याचें मनोधैर्य खचलें नाहीं.

## समरकंद : : : ६

समरकंदचा बादशहा होणें ही बाबुराची महत्त्वाकांक्षा एकसारखी बळावत होती. स्वतःच्या राज्यांत तंटे-बखेडे चालू होते, पण महत्त्वाकांक्षी विचार त्याच्या डोक्यांतून केव्हांच मावळले नाहींत. जरा स्थिरस्थावर झालें कीं हें ध्येय साधण्यासाठीं तो उद्योगास लागे. मागें फर्घाना प्रान्त सर करण्यासाठीं आलेला बाबुराचा सर्वांत मोठा चुलता अहंमदखान समरकंदकडे जातांना वाटेंतच गतप्राण झाला. ही बातमी कळतांच बाबुराचें समरकंदचें सुखस्वप्न पुन्हां मूर्त स्वरूप धारण करूं लागलें. पण समरकंदचें तख्त रिकामें थोडेंच होतें ! अहंमदखानानंतर तें त्याच्या चुलत्यानें—महंमद मिर्झानें काबीज केलें होतें आणि त्याची राजवट सुरू होती. पण हा राजबदल समरकंदच्या रयतेला चांगलाच जाणवूं लागला. पूर्वींचा सुलतान अहंमद एक नंबरचा दारूबाज होता. दारूच्या निशेंत तो अनन्वित अत्याचार करी; तथापि एका दारूड्याच्या अत्याचारापलीकडे त्याचा त्रास रयतेस फारसा नव्हता. पण महंमद मिर्झा म्हणजे एक निराळीच व्यक्ति होती. तो इरसाल सैतान होता ! त्याला नीतिबंधनें कोणत्याच प्रकारचीं नव्हतीं. तो कोणाचाही कोणत्याही तऱ्हेनें गळा कापी. त्याला स्वकीय आणि परकीय सारखेच. जिगरदोस्त व हाडवैरी हा फरक त्याच्याजवळ नव्हता. जुलमी, खुनी, विश्वासघातकी, व्यभिचारी

आणि दारुड्या हीं सर्व विशेषणें त्यास विशेषेंकरून लागू होतीं. त्यामुळें त्याचें राज्य म्हणजे यमपुरी आणि त्याचा दरबार म्हणजे सैतानाचा दरबार झाला होता. नागडे-उघडे बीभत्स प्रकार नेहमीं राजरोसपणें चालत. राजा असला नादान असल्याकारणानें ज्याला जें सांपडेल तें तो लांबवी. कसल्याहि गोष्टीची सुरक्षितता नव्हती. बायांलेंकरांवर जुलूम-जबरदस्ती केव्हां होईल याचा नेम नसे. अब्रू व पैका यांपैकीं कांहींहि सुरक्षित नव्हतें. जो तो आपल्या ठिकाणीं त्रस्त व संतप्त होता. महंमदखानाची सहाच महिन्यांची कारकीर्द समरकंदच्या लोकांना चांगलीच जाणवली आणि आतां कसें होईल या फिकीरींत सर्व लोक होते. तोंच देवानें त्यांचें गाऱ्हाणें ऐकलें. खान वारला. त्याबरोबर लोकांना हायसें वाटलें. महंमदखानाचा त्रास चुकला, पण सिंहासनाकरितां चाललेल्या भाऊबंदकीची झळ जनतेला पोंचत होती.

समरकंदचें सिंहासन रिकामें होतांच पुन्हां त्यासाठीं लांडगेतोड सुरू झाली. इ. स. १४९५ त समरकंदवर चौघांकडून चार स्वाऱ्या होण्याचा रंग दिसूं लागला. हिरातहून सुलतान हुसेन निघाला. महंमदाचा एक मुलगा सुलतान अली हिसारहून समरकंदची वाट चालूं लागला. तिसरा बुखाऱ्याहून आणि चौथा बाबुर हा अंदिजानहून असे चौघेजण चार ठिकाणांहून मोठ्या हिरीरीनें निघाले. आतां भयंकर रणकंदन माजणार आणि त्यांत समरकंदचें वाटोळें होणार असें सर्वांसच वाटूं लागलें; पण झालें मात्र अगदीं निराळें. हे गडगडणारे मेघ पार वितळून गेले. टिलसिट या ठिकाणीं त्या चौघांत तह झाला आणि जो तो आपला मार्ग आक्रमूं लागला. तरी पण कोहिक नदींत बाबुर आणि सुलतान अली या दोघांनीं मिळून पुनः समरकंदवर स्वारी करण्याचा करार केला; पण हा करार म्हणजे नुसता पोषाखी होता, कारण हे दोन चुलत बंधू एकमेकांस भेटले तेच मुळीं घोड्यांवर; त्यांत एकमेकां-विषयीं आपलेपणा मुळींच नव्हता.

## समरकंदवर चाल : : : ७

कोहिक नदीच्या भव्य पात्रांत सुलतान अली आणि बाबुर यांची घोड्यांवर भेट झाली. ती भेट म्हणजे भेटच होती. ती त्या ठिकाणींच विसर्जित होऊन नदीच्या प्रवाहाबरोबर त्या भेटींतील करार-मदार व बोलणीं वहात गेलीं. समरकंदवर स्वारी करण्याचा बेत झाला; पण त्याचें रूपांतर कृतींत कोठेंच झालें नाहीं व तें होणारही नव्हतें, कारण बेत करणारांत आत्मीयता नव्हती. तो करार एकमेकांनीं आपले हातचे बाजूला ठेवून केला होता. बाबुराचें मात्र तसें नव्हतें. तो स्वतः समरकंदवर स्वारी करणार होता. त्याप्रमाणें तो इ. स. १४९७ मेमध्यें या स्वारीवर निघाला. सुलतान अली त्याच्या मदतीस आला नाहीं, व हें अपेक्षेप्रमाणेंच झालें. त्याला त्यांत वावगें असें कांहींही वाटलें नाहीं. त्यानें ही स्वारी स्वतःच्या शिरावर घेतली होती, आणि ती तडीस नेण्याचें सामर्थ्यहि त्याच्या अंगांत होतें. प्रथम त्यानें आपला तळ त्या शहराशेजारीं टाकिला. त्यामुळें शहरवासीय घाबरले व त्यांच्यांत गडबड उडाली असें कांहींच झालें नाहीं. सर्व वातावरण अगदीं शांत होतें. इतकेंच काय पण तेथील व्यापारी त्या सैन्याबरोबर देवघेवीचा व्यवहार करूं लागले. असा एकंदर प्रकार खेळीमेळीचा चालला असतां एकाएकी एक दिवस गडबड उडाली आणि बाबुराच्या सैन्यानें सर्व शहरभर धुमाकूळ घातला, लूटमार केली. सैनिकांचें हें करणें बाबुरास आवडलें नाहीं.

आकस्मिकपणें हा प्रकार झाला त्यामुळें त्यास फार वाईट वाटलें. निरपराधी नागरिकांना पोंचलेल्या या उपसर्गानें बाबुराचें मन बेचैन झालें. त्यानें सैनिकांचा रणमद ओसरूं दिला व एक दिवस असा हुकूम काढिला कीं, ज्या कोणीं जें कांहीं लुटलें असेल तें सर्व जसेंच्या तसें परत करावें. सुतळीचा तोडासुद्धां आपल्याजवळ ठेवूं नये. बाबुराच्या या आज्ञेचा जादूसारखा उपयोग झाला. सर्वांच्या सर्व वस्तू जशाच्यातशा ज्याच्या त्यास माघारीं मिळाल्या. चौदा वर्षांचा सेनानी असा विचित्र हुकूम देतो काय आणि त्याची अंमलबजावणी इतक्या व्यवस्थितपणें होते काय! हा एक मोठा अजब चमत्कार झाला.

समरकंदच्या लोकांना यांत मोठी अपूर्वाई वाटली. त्यामुळें बाबुराविषयीं आपलेपणा वाटणारे लोक त्याच्याभोंवतीं सहजच जमा झाले. दिवसानुदिवस लोकांचा घोळका वाढूं लागला आणि बाबुराची छावणी समरकंद शहराशीं स्पर्धा करूं लागली. इतक्यांत पूर्वींच्या महंमदाच्या मुलानें—बैसंगरनें बाबुरवर चालून घेतलें आणि परिणामकारक प्रतिकाराला सुरुवात केली. याच सुमारास तुर्कस्तानचा सुभेदार शैबानिखान यानेंही आपले लोक आणून बाबुरास हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर तें आनंदी वातावरण पार पालटून गेलें. तेथें रक्तांचे पाट वाहून प्रेतांचे खच पडूं लागले. ही कचाकची पांच-सहा महिने चालली होती. बाबुरापुढें त्यांचा टिकाव लागेना, तेव्हां शैबानिखान माघारीं फिरला. समरकंदभोंवतीं बाबुराची चिकाटी अशी जबरदस्त बसली कीं बैसंगरची रसद ठार झाली. त्याबरोबर उपासमारीनें कहर केला. सैन्य अन्नपाण्यावांचून मरूं लागलें. त्यांचीं पोटें भकाटीस गेलीं. गोळाभर अन्न नाहीं कीं अंगाला धडूत नाहीं, अशी प्राणान्तिक अवस्था झाली. बाबुरापुढें आपला निभाव लागत नाहीं असें ठरलें तेव्हां एके दिवशीं रातोरात बैसंगर आपल्या दोनतीनशें मरतुकड्या लोकांनिशीं पळून गेला.

शत्रु अशा तऱ्हेनें पळून गेल्यानंतर बाबुरानें समरकंदमध्यें मोठ्या थाटानें प्रवेश केला. फारा दिवसांची महत्त्वाकांक्षा तडीस गेल्यानें त्यास निरतिशय

आनंद वाटला. तैमूरच्या सिंहासनावर त्याची स्थापना झाली. भालदार ललकारले, सैनिकांनीं कुर्निसात केले तेव्हां त्यास कृतकृत्य वाटलें. समरकंद म्हणजे भू-लोकावरील दुसरें नंदनवनच. तेथील ते लांबच लांब पसरलेले भव्य आणि सुंदर बगीचे, टोलेजंग इमारती, तैमूरची विशाल मशीद, ज्योतिष-शास्त्रास लागणाऱ्या सर्व उपकारणांनीं सज्ज अशी उलुघ बेगनें बांधलेली तीन मजली उत्तुंग वेधशाला कोहिकच्या रम्य टेकडीवरुन समरकंदच्या सौंदर्या-वर दृष्टिक्षेप करीत होती. तर याच टेकडीच्या पायथ्याशीं अल् अमीदाच्या गोंडस उद्यानाच्या मध्यभागीं गगनाशीं गोष्टी करणारा चाळीस-खांबी उंचच उंच मनोरा उभा होता. त्याच्याच शेजारीं सुट्टीच्या दिवशीं मौजेनें फिरण्यास आलेल्या लोकांची आपल्या चमत्कारानें तहान-भूक हरपण्यास लावणारा, विजापूरच्या गोलघुमटाप्रमाणें एक घुमट पण उभा होता. अशा किती तरी अजब चिजांनीं समरकंद शहर समृद्ध होतें. त्या ठिकाणीं कलावंतांच्या कला-कुसरीच्या चिजांची रेलचेल होती. दुधांत साखर पडावी त्याप्रमाणें हा अपूर्व योग बाबुरास लाभला होता आणि त्याचे दिवस आनंदांत चालले होते; पण हा सुखाचा काल अवघा शंभर दिवस टिकला.

## शंभर दिवसांचें राज्य : : : ८

बाबुराचे समरकंदमधील हे शंभर दिवस अत्यंत आनंदांत गेले. त्याच्या गोड स्मृति त्याच्या हृत्पटलावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्याचे दिवस आनंदांत चालले होते. सकाळचा काळ सुखांत जावा, क्षणाक्षणाला आनंद द्विगुणित व्हावा; पण त्या कालांतच अखिल भू-भागाला संत्रस्त करून सोडणारें दुपारच्या माध्यान्हीचें वातावरण तयार होत असावें. प्रातःकालीं दशदिशांना संजीवित करणारा सूर्य नारायण दुपारीं बाराला इतकें उग्र स्वरूप धारण करतो कीं, त्यामुळें सर्वांगाचा भडका होतो आणि त्यांतून कसें मुक्त व्हावें हेंच उमजत नाहीं. समरकंदला बाबुरानें शंभर दिवस काढिले, आणि शंभराव्या दिवशीं त्याच्या विलोभनीय सौख्यास कोणा पाप्याची दृष्ट लागली, त्याबरोबर तें भंगलें. शंभराव्या दिवशीं त्या सौख्याची सद्दी संपली. ( सद्दी=शंभर ) त्याला ओहटी लागली. रोज नव्या नव्या भानगडी निर्माण होऊं लागल्या.

बाबुरानें सहा महिने कोणत्याहि गोष्टीची तमा न करतां समरकंदचा लढा जिंकला आणि शत्रूचा निःपात केला. आतां तो त्या ठिकाणीं आनंदांत आपली कालक्रमणा करीत होता. तंटा-बखेडा निर्माण होण्याचा संभव यत्किंचितही नव्हता. सर्व वातावरण निरामय होतें. आतां फक्त ‘ मजा

मारणें ' एवढेंच राहिलें होतें. अशा स्थितीत ' खानेको मै और लढनेको मेरा भाई ' या म्हणीप्रमाणें बाबुराचा चुलतभाऊ सुलतान अली त्या ठिकाणीं दाखल झाला. तो येतांच अर्थातच फटाफुटीस सुरुवात झाली. कांहींनीं सुलतान अलीचा पक्ष धरला व कांहींनीं बाबुराचा पक्ष स्वीकारला. समरकंदच्या लढ्यांत आपणांस अमाप लूट मिळेल या कल्पनेनें आलेले सैनिक, बाबुरानें लूटमार करूं न दिल्यानें नाखूष झाले होते. नंदनवनाशीं बरोबरी करणारें समरकंद या क्रांतीच्या डोकेफोडीनें उजाड होऊं लागलें होतें. तेव्हां हैराण झालेल्या रयतेवर पुन्हां जादा कर बसवून त्याची वसुली जबरीनें करावी हेंही बाबुरास मानवेना. तेथील शेतकऱ्यांस बीं-बियाणें देऊन त्यानें त्यांची तरतूद केली; पण नवीं पिकें हातीं येईपर्यंत कांहींहि करतां येणें शक्य नव्हतें. तेथील कोरडी मजा बाबुराच्या सैन्यास चांगलीच जाणवूं लागली. जो तो तेथून निघून जाण्याचा विचार करूं लागला. एकेक सैनिक तेथून नाहींसा होऊं लागला. आतां भराभर लष्कर कमी होऊं लागलें. शेवटीं एके दिवशीं अहंमद तंबल नांवाचा त्याचा मुख्य लष्करी अधिकारी त्याला सलाम ठोकून पसार झाला.

बाबुराचें दुर्दैव पुरें ओढवलें. आतां त्याच्याजवळ फक्त एक हजार लोक शिल्लक राहिले. इतक्यांत तो एकाएकी आजारी पडला. दुखणें विकोपास गेलें. त्याची शुद्धबुद्ध हरपली. चार दिवस त्याची वाचा बंद होती. औषधाचा किंवा अन्नाचा एक कणही घोटेना. कोरडी जीभ ओली करणें आणि नाडी ठिकाणावर आहे कीं नाहीं तें पहाणें हें एकच काम शिल्लक राहिलें. अशी त्याची दैना झाली.

बाबुराच्या गळ्याभोंवतीं मृत्यूचा पाश करकचून आंवळला जात होता, तर इकडे अंदिजानमध्यें बाबुरास त्याच्या वडिलार्जित तख्तावरून फेकून देण्याचें काम जोरांत चालू झालें होतें. ' तुम्हीं ताबडतोब आलां नाहींत तर राज्य जातें; आमचा जीव धोक्यांत आहे ' अशीं पत्रें व निरोप घेऊन स्वार

दौडत येत; पण त्याचा कांहींहि उपयोग होत नव्हता. कारण बाबुर शरपंजरीं पडला होता. इतक्यांत अझन हस्सन नांवाच्या एका निरोप्यानें गोंधळ केला. त्यानें बाबुरास घरडा लागला असून मी येथें येईपर्यंत तो तिकडे आटोपलाही असेल असेंच सांगितलें. त्याचा परिणाम मात्र फार विचित्र झाला. शत्रूला तोंड देऊन बाबुराच्या आईचें आणि आजीचें संरक्षण करणारा अंदिजानचा सुभेदार अल्ली दोस्त या निरोपानें एकदम गोंधळला. त्याचें धैर्य खचलें व त्यानें किल्ला शत्रूच्या हवालीं केला. संधीचे करार-मदारही झाले. फर्घाना प्रान्ताचें राज्य बाबुराच्या हातचें गेलें. गोष्टी इतक्या थराला गेल्या पण सुदैव इतकेंच कीं, पुढें लौकरच बाबुराच्या प्रकृतीस आराम वाटूं लागला. तो हिंडता फिरता झाल्यावर त्यास त्याच्या फर्घाना प्रान्ताची हकीगत सांगण्यांत आली, तेव्हां तो टाकोटाक अंदिजानकडे निघाला. मजल-दरमजल करीत त्यानें खोजंद गांठलें. या ठिकाणीं तो पोंचला तोंच त्यास अंदिजानची हकीगत कळली. आतां तेथें जाण्यांत अर्थ नव्हता. जें काय व्हावयाचें तें सर्व होऊन चुकलें. या घटनेनें बाबुरास भयंकर धक्का बसला. फर्घाना प्रान्ताचें राज्य गेलें आणि याच्याहीपेक्षां दुसरा चमत्कार असा झाला कीं, बाबुरनें समरकंद सोडतांच त्याचा ताबा त्याच्या चुलतभावानें—सुलतान अल्लीनें घेतला. इकडे सख्ख्या भावानें जुनें वडिलार्जित राज्य घेतलें तर तिकडे चुलतभावानें नवें मिळविलेलें राज्य बळकाविलें. अशा तऱ्हेनें बाबुराचें राज्य दोन्ही ठिकाणांहून एखाद्या पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें तीन ताड उडालें. त्याची स्थिति चमत्कारिक झाली. हेंही गेलें व तेंही गेलें आणि हात चोळीत बसण्याचा प्रसंग त्याच्यावर आला.

## अर्धें राज्य : ८ : ९

दहापांच रुपयांचें नुकसान झालें तर माणसास कोण हळहळ वाटते! पण ही झाली सामान्याची गोष्ट. असामान्याचें सर्वच कांहीं असामान्य असें जरी म्हटलें तरी त्याला सुद्धां मर्यादा आहेच. दुसऱ्यासाठीं पहिलें जाणें, आणि पहिलें गेल्यानंतर दुसरेंही गमावणें यासारखें दुःख नाहीं. फर्घानाचा राजा म्हणून समाधान नाहीं तेव्हां समरकंद जिंकणें, समरकंद जिंकल्यानंतर फर्घाना वैऱ्यांनीं काबीज करणें आणि तो पुन्हां काबीज करण्यासाठीं समरकंद सोडतांच फर्घान्याचें राज्य नाहींसें होणें या घडामोडी पाहून मोठा अचंबा वाटतो. पण बाबुराच्या आयुष्यांत असले प्रसंग त्याच्या पांचवीस पुजले होते. हा उलटलेला डाव माघारीं फिरवण्याचा खटाटोप बाबुरानें तत्काळ चालविला. निराश होणें हें जरी स्वाभाविक असलें तरी पण निराशेनें कायमची मरगळ घेणें हा त्याचा स्वभाव नव्हता. कांहीं काल त्याला वाईट वाटलें. तो चिडखोर बनला. त्याचें स्वास्थ्य ढांसळलें. तो ढसढसा रडला. पण अश्रूंच्या रूपानें त्याची निराशा निचरून जातांच तो पुन्हां ताजा-तवाना झाला, आणि त्याचे प्रयत्न पुन्हां नव्या जोमानें चालू झाले.

प्रथम त्यानें आपल्या चुलत्याकडे—महंमदाकडे चांचपून पाहिलें. कारण फर्घाना प्रान्त आपणाकडे असावा असें त्यास वाटत होतें. या त्याच्या सुत

महत्त्वाकांक्षेस फुंकर घालण्याचा प्रयत्न बाबुरानें केला. पण महंमदखान म्हणजे ढिल्या प्रकृतीचा मनुष्य; त्याला पीळ कोठेंच नव्हता. त्याच्या अंगीं शिपायाचें तेज नव्हतें कीं सेनानायकाचा वकूब नव्हता. पण कोणीं कांहीं सुचविल्यास तें करण्याची सुबुद्धि मात्र होती. म्हणून बाबुरानें इच्छा प्रगट करतांच त्यानें फर्घाना प्रान्तावर चाल केली; पण तो अक्षी या गांवीं येतांच फर्घाना सर करून बसलेल्या राजकुमार जहांगीरच्या लोकांनीं महंमदखानाची समजी केली. त्यासरसें त्याचें सैन्य माघारीं फिरलें. हा देखावा पहातांच बाबुर जागच्याजागीं सर्द झाला. त्याची पुनरपि दारुण निराशा झाली. त्याच्या सैनिकांचा तर धीरच खचला. त्याला मुख्य कारण असें होतें कीं, सर्व लष्कर अंदिजानचे रहिवासी होते. त्यांचे जिव्हाळ्याचे लागेबांधे त्या शहरांत गुंतले होते. बायका-माणसें तेथें होतीं. फर्घाना प्रान्त काबीज करणें आणि अंदिजानचा ताबा घेतल्यानंतर विजयी वीर म्हणून आपल्या मुलां-माणसांत जाऊन बसणें आणि तो स्पृहणीय आनंद उपभोगणें या गोष्टी त्यांस अशक्यप्राय वाटूं लागल्या. त्याबरोबर त्याचें लष्कर निराशेनें हैराण झालें व हजारांपैकीं जवळ जवळ आठशें लोकांनीं बाबुरास राम राम ठोकला. बाबुराचें पारडें हलकें झालें. तो भाग्यवानाचा भाग्यहीन झाला. राजाचा रंक झाला.

तो खंक झाला होता. निराशेचा अंधकार त्याच्या दृष्टिसमोर पसरला होता. आशेचा लुकलुकता किरण कोठेंही दिसत नव्हता. त्या वेळीं त्याच्या ताब्यांत खोजंद होतें. येथेंच सुदैवानें शत्रूच्या तावडींतून शिरसलामत निसटलेली त्याची आई आणि आजी त्यास येऊन मिळाली. हे कठीण दिवस कोठें आणि कसे काढावेत हा मोठा प्रश्न होता. खोजंदसारख्या छोट्या गांवीं आपल्या दोनतीनशें लोकांच्या परिवारासह दिवस काढणें फार मुष्किलीचें होतें. तेव्हां खोजंद व समरकंद या दोन शहरांच्या दरम्यान एकाद्या पर्वताच्या आश्रयानें दिवस कंठण्याचा त्याचा विचार झाला आणि तो तेथें राहण्यास गेला. पण समरकंद व खोजंद यादरम्यानच्या पर्वत-रांगांवर सुलतान अल्लीची सत्ता होती. त्यानें बाबुरास आपली हद्द सोडून जाण्यास हुकूम फर्मावला. त्याबरोबर बाबुराचे सर्व विचार हवेंतील मनोऱ्याप्रमाणें कोसळले.

या वेळीं सुलतान अल्लीनें जरा दयार्द्र बुद्धि दाखविली असती तर चाललें असतें. कारण समरकंदचें राज्य बंदुकीचा एक बारही न काढतां त्याच्या पदरांत पडलें होतें. तें जिंकण्याकरितां त्याला कोणताही त्रास झाला नव्हता. बाबुर आजारी पडला नसता तर त्यास समरकंदचें राज्य मिळणें अशक्य होतें. तेव्हां सुलतान अल्लीनें बाबुरास आपल्या हद्दींत राहूं देण्याचा मोठेपणा

दाखविला असता तर फार चांगलें झालें असतें; पण तसें झालें नाहीं. सुलतान अल्लीचा तसा हुकूम येतांच बाबुरानें आपला बेत बदलला आणि त्यानें आपला हा काल आइलक पर्वताच्या रांगेंतून कंठण्याचें ठरविलें. कारण या ठिकाणीं त्यास कोणाही सत्ताधाऱ्यांचा उपद्रव पोंचण्यासारखा नव्हता. समरकंद, अंदिजान व हिरात या सर्व ठिकाणीं त्याचे चुलतभाऊ व चुलते राज-राजेश्वर म्हणून राज्य करीत होते. बाबुर अक्षरशः वनवासी झाला होता. सर्व संबंधापेक्षां रक्तसंबंध श्रेष्ठ असें आपण मानतों व तें खरेंही आहे; पण कांहीं वेळेला हे रक्तसंबंधच घातक ठरतात. बाबुराचे सगेसोयरेच त्याच्या जिवावर उठले होते. तेव्हां त्यानें निसर्गासारखा प्रेमळ सखा जोडला आणि त्याच्या आनंददायी सहवासांत आपली कालक्रमणा चालू केली. बाबुर तसा रसिक होता. त्याच्याजवळ प्रतिभाशाली कवीची सौंदर्यदृष्टि होती. तो वनश्रीशीं समरस होऊन आपल्या आयुष्याचे दिवस मोठ्या समाधानांत कंठीत होता. पण हें समाधान खरें नव्हतें. पोटांत वडवानलाच्या ज्वाला एकसारख्या भडकत असतां सागरानें पौर्णिमेच्या दिवशीं पर्वतप्राय लाटांच्या ओठांनीं खदखदां हंसावें तशांतला हा प्रकार होता. निसर्ग पहातांच बाबुराची कविवृत्ति आनंदानें डोलूं लागे. त्या डोलण्यांतून दुःखाचे फूत्कार बाहेर पडत. गिरिगव्हरांत त्यानें जवळ जवळ दोन वर्षें काढिलीं.

एकाएकीं एक दिवस बाबुराचें चित्त अस्वस्थ झालें. तो कष्टी झाला. काय करावें, कोठें जावें, हें कष्टतर आयुष्य केव्हां संपणार, आपली स्थिति पालटणार कीं हें दिवाभीताचें आयुष्य कंठीत असतांच मृत्यु येणार वगैरे वगैरे वेडे-विद्रे विचार त्याच्या मनांत येत होते. पण बाबुराचें आयुष्य म्हणजे एक रहस्यमय कादंबरी. त्याच दिवशीं त्यास आमंत्रण आलें.

## आमंत्रण

: : : ११

त्या निराशेच्या दिवशीं दुपारीं बाबुर आपल्या निवासस्थानीं सचिंत बसला असतां स्वारांच्या टापांचे आवाज मैदानांत घुमूं लागले. प्रथम बाबुर जरा गांगरला. शत्रु का मित्र याचा निर्णय होईना; टापा अनेक घोड्यांच्या का एका घोड्याच्या हेंही कळेना; पण थोड्या वेळांतच निर्णय लागला. तो एकच स्वार होता; आणि त्यानें एक लिफाफा आणिला होता. लिफाफा दोस्त अल्लीचा होता. त्यानें बाबुरास काकुळतीची विनंति केली होती कीं, फर्गाना प्रान्ताचें राज्य शत्रूच्या हवालीं करण्यांत माझ्या हातून फारच मोठी चूक झाली. समरकंदहून निरोप आणणाऱ्या एका जासुदानें गोंधळ केला हेंही खरें; पण त्याहिपेक्षां अंदिजान शत्रूच्या हवालीं करून मीं माझा स्वार्थ साधला. अंदिजानचा ताबा देतांच शत्रूनें माझें कोटकल्याण केलें. फर्गानामधील दुसरें महत्त्वाचें शहर मार्धिनान हें कुल-मुखत्यारीनें माझ्या ताब्यांत मिळालें. किंचित्काल स्वार्थाच्या मोहास बळी पडून मीं हा सौदा केला, पण त्या क्षणापासून माझें चित्तस्वास्थ्य नाहींसें झालें. मीं निमकहरामीनें हें वैभव मिळविलें, माझा धनी प्रसंगांत सांपडला असतां त्यास साफ दिलानें मदत न करतां त्याच्याशीं बेइमानी केली. मला आतां पश्चात्ताप झाला आहे. गेलीं दोन वर्षें माझी अवस्था भुतानें पछाडल्याप्रमाणें झाली आहे. तरी आपण मला एकवार

माफी करावी आणि निःसंकोच मनानें येथें यावें. मार्धिनान शहर आपलेंच आहे, तें आपण आपल्या ताब्यांत घ्यावें. मी आपल्यास सर्वतोपरी सहाय्य करण्यास तयार आहें. यापुढील माझी वर्तणूक आपला एक नम्र व विश्वासू नोकर अशीच राहील.

अह्मी दोस्तचें हें लिखाण वाचतांच बाबुरास मोठा आनंद वाटला. कोणत्याही गोष्टीचा निर्णय घेण्यांत बाबुराचें बालमन मोठें तरबेज होतें. सूर्यास्त झाला होता तरी तो ताडकन् मार्धिनानकडे निघाला. क्षणाचाही विसांवा न घेतां त्यानें ती रात्र संपून सूर्य डोक्यावर येईपर्यंत प्रवास केला. नंतर चार घटका विश्रान्ति घेऊन पुन्हां एक दिवसपर्यंत प्रवास केला, आणि नंतर सूर्योदयाच्या सुमारास तो मार्धिनानपासून चार मैलांवर आला. मार्धिनानच्या सन्निध येतांच त्याचें मन बावरलें. आपण अह्मी दोस्तावर विश्वास ठेवून आलों; पण त्याच्या मनांत कांहीं काळेंबेरें तर नसेल ? तो कांहीं डाव तर साधणार नाहीं ? आपण करतों हा मासलेवाईक मूर्खपणा तर होणार नाहीं ना ? असले विचार मनांत येतांच बाबुराच्या मनाचा भयंकर गोंधळ झाला. पण आतां ह्या विचारांचा कांहींच उपयोग नव्हता. इतक्या नजीक आल्यानंतर माघारीं फिरणें हाच उलट मासलेवाईक मूर्खपणा झाला असता. आधीं तीन दिवस अहोरात्र व विश्रान्ति न घेतां घोड्याच्या पाठीवर शें-दोनशें मैलांचा टापू त्यानें आक्रमिला होता, अंगांत त्राण उरला नव्हता, आणि आतां माघारीं फिरणें अशक्य होतें. तेव्हां जिवाचा धडा करून त्यानें मार्धिनानमध्यें प्रवेश केला. तेथें त्याचें स्वागत उत्तम प्रकारें झालें. बाबुर आपल्या दोनशें चाळीस सैनिकांसह पुन्हां एकदां सुरक्षित ठिकाणीं दाखल झाला.

## नामधारी राजा : : : १२

अल्ली दोस्तनें बाबुरास धाडलेलें आमंत्रण म्हणजे कांहीं तरी अपेक्षेबाहेरचें कृत्य झालें असें मात्र नव्हतें. गेल्या दोन वर्षांत फर्गाना प्रान्तांत झोटिंगशाही चालू होती. जहांगीर आणि अहंमद तंबल या उभयतांनीं सैतानी सोटा फिरवून फर्गाना प्रान्ताच्या रयतेस त्राहि भगवन् करून सोडलें होतें. तेव्हां आपला जुना राजा शतपटीनें चांगला, तो पुन्हां आपणांस लाभला तर फार चांगलें होईल असें रयतेस एकसारखें वाटत होतें. या इच्छेचें रूपांतर कृतींत होऊं लागलें होतें, आणि त्याचें प्रतीक म्हणजेच हें आमंत्रण होतें.

मार्धिनान शहरीं बाबुर दाखल होतांच ही आनंदाची बातमी सगळीकडे फैलावली. अनेक सैनिक बाबुरास येऊन मिळाले. दिवसानुदिवस बाबुराचें पारडें जड होऊं लागलें. तें शहर आपण होऊन त्याच्या ताब्यांत गेलें. बाबुरानें अक्षीशहराचा ताबा घेतल्याचें वृत्त जहांगीर व त्याचा साथीदार अहंमद तंबल यास कळतांच त्यांनीं त्यास तेथून उखाड देण्यासाठीं सैन्य रवाना केलें; पण अक्षीचें वातावरण बाबुरास इतकें अनुकूल होतें कीं, शत्रु-सैन्य येतांच त्या ठिकाणीं त्याची रेवडी उडाली. इ. स. १४९९ च्या जून-मध्यें अंदिजान बाबुराच्या ताब्यांत आलें. अशा तऱ्हेनें फर्गाना प्रान्ताचें राज्य पुन्हां एकदां त्याच्या कायदेशीर वारसाकडे गेलें, आणि लोकांत समाधान नांदूं लागलें.

बाबुर फर्घाना प्रांताचा राजा झाला. याचा अर्थ बंडवाले नेस्तनाबूद झाले, सगळीकडे शांततेचें वातावरण नांदूं लागलें, रामराज्य सुरू झालें असा मात्र नव्हे. अजून क्रांतीचे वारे वाहात होते आणि राजकारणाचीं चाकें मोठ्या कसोशीनें व डोळ्यांत तेल घालून फिरवणारा कर्णधार पाहिजे होता. बाबुरांत ती कुवत नव्हती असें मात्र नव्हतें. तो समर्थ होता, पण त्याचें दयाशील मन त्याचा घात वारंवार करीत होतें.

त्याला साह्य करणारांमध्यें अहंमद तंबलच्या मोगल लोकांचा भरणा विशेष होता. ते चार हजार होते. हे लोक म्हणजे बाबुराच्या पायांतील सलता कांटा. त्याला धक्का लागला कीं जीव कासावीस होण्याचा प्रसंग. बाबुरास मदत करणारे हे मोगल म्हणजे माजलेले पेंढार. फर्घाना प्रांतावर कोणाचेंही राज्य असो; बाबुरचें राज्य असो अथवा जहांगीरचें असो किंवा कोणाचेंहि नसो, त्याची पर्वा यांना नव्हती. त्यांचा स्वहिताचा धंदा स्वछंदपणें मोकाट चालू असे. खच्चून लूट मिळविण्यासाठीं रक्तपात, खून, दरोडे, जाळपोळ, वाटेल ते अत्याचार ते बेधडक करीत. त्यांनीं आपला हा खाक्या बाबुर पुन्हा गादीवर आला तरी तसाच चालू ठेवला. बाबुरास तर या गोष्टीची प्रथमपासून चीड होती. आपण राज्य करीत असतां रयतेंत आबादानी नांदावी, तिला कोण-त्याही तऱ्हेचा उपसर्ग पोंचूं नये असें त्यास वाटे; पण बाबुराचे, हे विचार म्हणजे बचनागाच्या वनांत तुलसीच्या रोपट्याप्रमाणें होते. त्याच्या या दयाशील अंतःकरणाची रयतेस जाणीव होती. रयतेकडून मोगल लोकांच्या अत्याचारा-बद्दल एकसारख्या तक्रारी येऊं लागल्या त्याबरोबर बाबुराचें मन द्रवलें. त्यानें कडक उपायांचा अवलंब केला. खरें दयाशील मन तेंच कीं जें योग्य ठिकाणीं निर्दय व त्यागी बनूं शकतें. विनाकारण लूट करणारास कडक शासन करण्यांत येईल असा हुकूम त्यानें काढिला आणि त्याची अंमलबजावणी कोणाचीहि पर्वा न करतां न्यायनिष्ठुरपणें चालू केली. त्याबरोबर रयतेनें त्यास दुवा दिला; पण त्याचा परिणाम लष्करी दृष्ट्या फारच प्रतिकूल झाला. बाबुराचें हें करणें योग्य होतें, पण त्याला ही वेळ अनुकूल नव्हती. राज्य नुकतेंच

ताब्यांत आलें होतें. भोंवतालचें वातावरण अजून गढूळ होतें. आपणास कितपत स्थैर्य लाभतें याचाही त्यास अंदाज नव्हता. अशा स्थितींत हा हुकूम म्हणजे स्वत:च्या पायांखालील फांदीवर कुऱ्हाडीचे घाव घालण्यांतला किंवा निखाऱ्यावरील राख फुंकण्यांतलाच प्रकार; पण तो बाबुरानें केला. तसें होतांच अंदिजानला बंडाचा डोंब उसळला. चार हजार मोगल लोकांनीं बंड केलें. पुन्हां धामधुमीस सुरुवात झाली. हे चार हजार लोक पुन्हां तंबलला जाऊन मिळाले. त्याबरोबर तंबल मोठ्या आवेशानें बाबुरावर चालून आला. बाबुरानें त्याचा प्रतिकार चालविला. बाबुर आणि तंबल या दोघांच्या लढाया म्हणजे कधींही न संपणारें लळीत होऊन बसलें. केव्हां याची सरशी दिसावी तर केव्हां त्याची सरशी दिसावी असें होऊं लागलें. शेवटीं या भांडणाचा निकाल त्वयार्धम् मयार्धम् पद्धतीनें केल्याशिवाय लागणार नाहीं असें सिद्ध झालें. दोन्ही पक्ष भेटाकुटीस आल्यानंतर या भांडणाचा निकाल तहानें झाला. फर्घाना प्रान्ताचें राज्य विभागलें गेलें. अंदिजान बाबुराच्या ताब्यांत देण्यांत आलें व अक्षी जहांगिरच्या—अहंमद तंबलच्या बाहुल्याच्या ताब्यांत राहिलें. उमरशेखच्या राज्याचीं दोन शकलें त्याच्या दोन मुलांनीं केलीं आणि येथें हें भाऊबंदकीचें नाटक पुरें झालें. इ. स. १५०० त बाबुराची सत्ता कमी झाली, पण ती अजून कनिष्ठ पातळीस पोंचली नव्हती. ती त्या बिंदूला जाणार होती हें खास.

## अंदिजानला रामराम : : १३

ज्या ठिकाणीं आपण कुल-मुखत्यारीनें राज्य केलें त्याच ठिकाणीं सत्ताहीन राजा म्हणून दिवस कंठणें बाबुरास अत्यंत कठीण जाऊं लागलें. नदीच्या एका तीरावर अंदिजान आणि दुसऱ्या तीरावर अक्षी अशीं हीं दोन राजधानीचीं शहरें दोन राजांच्या ताब्यांत होतीं. बाबुर व जहांगीर हे दोन बंधू बोक्याप्रमाणें गुरगुरत आपआपल्या राजधानींत नांदत होते. दोघांनाही प्राप्त परिस्थितींत समाधान नव्हतें. असे हे अतृप्त आत्मे मोठ्या जिकीरीनें आपले दिवस ढकलीत होते.

बाबुरला अंदिजानमध्यें कोणत्याच प्रकारचें सौख्य नव्हतें. त्याच्या मनानें त्याचा त्याग केव्हांच केला होता. समरकंदचे विचार त्याच्या मनांत पुन्हां पुन्हां येत होते. बाबुरला ह्या लाजिरवाण्या जिण्याचा कंटाळा आला होता. नदीच्या पलीकडे त्याचे शत्रु त्याच्या उरावर नाचत होते. ज्याच्या शब्दावर विश्वासून तो येथें आला तो अली दोस्तही त्याला फारसें महत्त्व देत नव्हता. त्यामुळें बाबुरास आणखीच दुःख होत होतें. तेव्हां या पेचकटांतून निसटण्याची संधि केव्हां येईल याचीच तो वाट पाहात होता. इतक्यांत समरकंदकडून बाबुरास आमंत्रण आलें. त्याबरोबर त्यानें अंदिजानला राम राम ठोकला.

समरकंदला राज्यक्रान्ति होण्याचा प्रसंग समीप आला होता. सुलतान अलीनें एक घोडचूक केली. ती त्याच्या चांगलीच अंगाशीं आली. समरकंद-मध्यें तरखान लोकांचीं खानदानी घराणीं पुरातन कालापासून होतीं. पिढ्यान्‌पिढ्या त्या घराण्यांतील लोक मोठमोठ्या हुद्यांवर असत. त्यांचें वजन राजदरबारींही चांगलें असे. जनतेंतसुद्धां त्यास मानमान्यता होती. ह्या लोकांचा आणि सुलतान अलीचा कांहीं कारणावरून खटका उडाला. त्याबरोबर कोणत्याही तऱ्हेचा मागचा पुढचा विचार न करतां सुलतान अलीनें या लोकांना समरकंदहून निघून जाण्याचें फर्मान काढिलें. त्याबरोबर सुलतान अलीलाच त्याच्या सिंहासनावरून खालीं खेचण्याचा बेत तरखान लोकांनीं चालविला.

समरकंद बाबुराच्या डोक्यांतून नाहींसें झालें नव्हतें. तोच प्रकार या लोकांचाही होता. शंभर दिवसांचें रामराज्य करून जाणारा बालराजा बाबुर त्यांच्याही स्मृतिपटावर कायम होता. तेव्हां तैमूरच्या सिंहासनावर पुन्हा त्यास प्रस्थापित करावें असें त्यांच्या मनानें घेतलें आणि त्यांनीं बाबुराकडे संधान लावलें.

इ. स. १५०० च्या जूनमध्यें बाबुर समरकंदकडे अचानकपणें निघाला. समरकंदचा निरोप आला त्या वेळेस बाबुरावर पाळत ठेवणारा अल्ली दोस्त अंदिजानला नव्हता. तेव्हां आपण कोठें जात आहोंत याचा थांगपत्ता लागूं न देतां त्यानें गुप्तपणें समरकंदची वाट धरली. अल्ली दोस्तला ही वार्ता कळतांच त्यानें बाबुरास वाटेंत गांठलें व त्यास तो सामील झाला. बाबुरास ही गोष्ट मनापासून आवडली नाहीं. अल्ली दोस्तही आपल्याच लुच्चेपणानें खजील झाला. कारण त्याच्या अंतःकरणाचा रंग बाबुरानें पुरा ओळखला होता. समरकंदची वाट चालत असतां पुढें उरातिपा या ठिकाणीं कमरअल्ली त्यास मिळाला. हाही मोठा शूर होता. बाबुराचा शत्रु तंबल यानें त्यास अक्षीहून हांकलून दिलें होतें. समरकंदच्या अलीकडे युरतखान या ठिकाणीं बेग लोकांचे कांहीं पुढारी व तारखान उमराव त्यास भेटले. त्यांनीं बाबुराचें हार्दिक अभिनंदन करून त्यास असें सांगितलें कीं, खवाजयाह्या ह्या नांवाच्या काजीचें समरकंदमध्यें फार मोठें वजन आहे आणि तो तुम्हांस अनुकूल आहे. तेव्हां त्याच्याशीं तुमचा समेट झाला कीं समरकंद हातीं आलेंच असें समजा.

ह्यांच्या ह्या वाटाघाटी चालल्या होत्या व आतां बाबुराचा मुक्काम समरकंदच्या अलीकडील किश या ठिकाणीं होता, तोंच त्यास मोठा विस्मयकारक देखावा दृष्टीस पडला.

समरकंदच्या नाजूक परिस्थितीचा फायदा वेळ न गमवतां ताबडतोब घ्यावयास पाहिजे होता. तसा प्रयत्न बाबुरानें केला, तरी पण त्याला थोडासा विलंबच झाला. इतक्यांत उझबेग लोकांचा पुढारी खान व बाबुराचा शत्रु शैबानी यांनीं समरकंदमध्यें प्रवेश केला व या अकस्मिक बनावामुळें बाबुरास किश या ठिकाणीं हळहळत बसावें लागलें. समरकंदचा ताबा घेतांच शैबानीनें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. त्यानें सुलतान अल्लीचा खून करून तैमूरचा वंश-दीप मालवून टाकिला आणि बाबुराशीं संगनमत करूं पहाणारा खवाजयाह्या ह्याचा पाठलाग केला व तो हातीं लागतांच त्याचें डोकें मारण्यांत आलें.

# पुन्हां एकदां समरकंद : १ : १५

शत्रूनें डाव साधलेला पाहतांच बाबुराची निराशा झाली. अशी फसगत झाल्याकारणानें ह्या नाजूक मनःस्थितींत हात हलवीत अंदिजानला माघारीं जाणें जास्तच लाजिरवाणें झालें. समरकंदमध्यें तर पाऊल ठेवण्याची सोय नव्हती, कारण तेथें कपाळमोक्षच व्हावयाचा. तेव्हां त्यानें पुन्हां आपला मोर्चा आइलाक पर्वतांकडे वळविला. बाबुर कफल्लक होतांच अल्ली दोस्तनें त्याची रजा घेतली. आतां बाबुराबरोबर त्याचे शें-दोनशें बेग लोक एवढेच काय ते शिल्लक राहिले. बाबुर निराश मात्र झाला नाहीं. आइलाक पर्वतामध्यें कांहीं दिवस काढतांच त्याचें मन ताजेंतवानें झालें. त्याच्या डोक्यांतील समरकंदचे विचार पुन्हां जोरांत चालू झाले. त्या पर्वतावरील थंड वाऱ्यानें त्याचे विचार थंड न होतां लाल इंगळाप्रमाणें रसरसूं लागले. आतां समरकंद हातीं येणें म्हणजे एक मूर्खाचें स्वप्न उरलें होतें असें मात्र नाहीं. समरकंद हातीं यावयाचेंच असेल तर त्याचा ताबा शक्य तों लवकर घेणें भाग होतें. शैबानीनें समरकंदचा ताबा घेतला होता पण त्यानें केलेले अत्याचार सहजासहजीं पचण्यासारखे नव्हते. त्यानें राजाचा खून केला होता व एका लोकप्रिय काजीचें डोकें मारलें होतें. तेव्हां त्याच्यासंबंधीं लोकांच्या मनांत तिटकारा व तिरस्कार निर्माण झाला होता. द्वेषाच्या भावना ताज्यातवान्या आहेत तोंच हर प्रयत्नानें समरकंद-

मध्यें आपण प्रवेश केला तर शैबानीखानाची रेवडी उडवूं. त्याचा धुराळा ताबडतोब होईल, कारण आपल्या बाजूला भलेपणा आहे. लोक आपलें नांव घेतात. आपल्याला दुवा देतात, कारण आपली तेथील शंभर दिवसांची कारकीर्द चिरस्मरणीय झाली आहे. तेव्हां लोकांस आपण आल्याची वार्ता कळतांच आपलें स्वागत होईल. नागरिक आपल्याभोंवतीं गोळा होतील आणि आपण शत्रूला यशस्वी तऱ्हेनें तोंड देऊं असें त्यास वाटलें. बाबुराची ही विचारसरणी तर्कशुद्ध होती. त्यानें आपल्या सहकाऱ्यांचा विचार घेतला आणि तो उद्योगास लागला. समरकंदमध्यें अचानकपणें प्रवेश मिळविणें हें ह्या स्वारीचें मुख्य सूत्र होतें. सर्व तयारी कडेकोट होतांच बाबुर एक दिवस एकाएकी मध्यरात्रीस युरातखान या ठिकाणीं दत्त म्हणून उभा राहिला. तों त्यास समरकंदचा पाहरा जागता आहे असें आढळून आलें. त्याबरोबर तो आपल्या सैनिकांसह गुप्त झाला; पण दुसऱ्या खेपेस मात्र बाबुरानें मोका बरोबर साधला. इ. स. १५०० च्या डिसेंबरमध्यें तो शेलक्या लोकांनिशीं निघाला. यावेळीं मात्र त्याला पाहिजे तशी वेळ जुळून आली. त्याच्याबरोबर एक सुप्रसिद्ध काजी अबदलम करीम होता. त्यानें फार झपाट्यानें चाल केली. त्यांच्यापैकीं कांहीं तट चढून वर गेले आणि त्यांनीं अलगदपणें फिरूज महाद्वार उघडलें. तें सताड उघडतांच बाबुरानें आपल्या सैन्यासह त्या महाद्वारांतून सफाईनें समरकंदमध्यें प्रवेश केला. शहरामध्यें गाढ शांतता पसरली होती. नागरिक झोंपी गेले होते. फक्त कांहीं व्यापारी त्या गडबडीनें थोडेबहुत जागे झाले. त्यांना ही बातमी कळतांच मोठें समाधान वाटलें. तेथील सर्व माऱ्याच्या जागा हातीं येतांच तांबडें फुटतें न फुटतें तोंच बाबुराच्या बेग लोकांनीं शैबानीच्या उझबेग लोकांचीं पाठाडें सडकण्यास सुरुवात केली. पहाटेची साखरझोंप घेत असतां उझबेग लोकांवर हा प्राणघातक हल्ला आल्याकारणानें त्यांस अवधान राहिलें नाहीं. ते समरकंदमध्यें सैरावैरा पळूं लागले; पण त्यांना गोळ्या घालून ठार करण्याचा सपाटा बेग लोकांनीं चालविला. अकस्मात् शहर बाबुराच्या ताब्यांत गेल्याकारणानें शैबानीखानास पळून

जाण्यावांचून दुसरा मार्ग उरला नाहीं, तेव्हां तो आपल्या दोनशें स्वारां-निशीं तेथून चालता झाला. शैबानीखानास ठेंचून टाकण्यास ही संधि फार चांगली होती, पण बाबुरजवळ त्याच्याशीं भर मैदानांत मुकाबला देण्या-सारखें सैन्य नव्हतें. नाहींतर शत्रु समोरून पळून जात असतां त्यानें त्यास तसा सोडला नसता.

## पुढील तयारी : : : १६

शैबानिखान व त्याचे उझबेग लोक यांचा पुरा मोड करून त्यांना समरकंदच्या सरहद्दीबाहेर पिटाळून काढल्यानंतर समरकंदच्या तटावर ठिकठिकाणीं टेहळे ठेवून शहराचा बंदोबस्त करण्यांत आला. बाबुराचे बेग लोक त्याच्याभोंवतीं जमा झाले. ज्याच्या त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतें. समरकंदचा ताबा अकस्मिकपणें घेण्याची युक्ति काढिल्याबद्दल बाबुराची वाहवा चालली होती. एका भव्य उद्यानांतील राजवाड्यांत आतांचा राजशाही दरबार भरला होता. शहरांतील अमीर, उमराव, व्यापारी, मौलाना आणि काजी वगैरे सर्व झाडून त्या ठिकाणीं आले होते. असा उमदा राजा लाभल्याबद्दल त्यांस समाधान वाटत होतें.

आज दीडशें वर्षेपर्यंत तैमूरचे वंशज त्या सिंहासनावर अप्रतिहतपणें राज्य करीत होते. शैबानीखान हा मध्येंच उपटला. त्यानें सुलतान अल्लीचा खून करून ही प्रथा खंडित केली. पण हा खंड फार दिवस टिकला नाहीं. तैमूरचा राजदंड पुन्हा त्याच्याच वंशजाच्या हातीं आला. तो वंशदीप पुन्हां प्रखर तेजानें तेवूं लागला हें पाहून रयतेस व बाबुरास अंतर्यामीं फार आनंद वाटला.

बाबुराच्या बुद्धिमत्तेची उंची आणि राजकारणी दृष्टीचा पल्ला फारच स्पृहणीय वाटतो. दुसऱ्यांदा समरकंदच्या गादीवर येणाऱ्या बाबुराचें वय

अवघें सतरा-आठरा वर्षांचें होतें. तेव्हां त्याचें फार दिवसांचें "ध्येय" आणि "महत्त्वाकांक्षा" हीं वर्णनें शोभत सुद्धां नाहींत. पण हे शब्दप्रयोग वापरण्यासारखी कामगिरी बाबुरानें केली हें मात्र खरें. त्यानें गादीवर येतांच सरहद्दीवरील सर्व राजे लोकांशीं आपले स्नेह-संबंध वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न चालविला. उझबेग लोकांचें वाढतें सामर्थ्य लक्षांत घेतां त्यांचा कायमचा बंदोबस्त करणें इष्ट होतें आणि त्या दृष्टीनें हालचाली संघटितपणें व्हावयास पाहिजे होत्या. त्या दिशेनें बाबुराचे प्रयत्न चालू होते. या कामासाठीं सर्वांनीं एकदिलानें एकत्र यावें म्हणून त्यानें विनंति केली, पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. कांहींनीं उत्तरेंच धाडिलीं नाहींत; कांहींनीं तुसडेपणा दाखविला; कांहींनीं शें-दोनशें लोक मदतीदाखल धाडण्याचें ठरविलें. या कामासाठीं तरी सर्व मिर्झा आणि खान एकत्र होतील असें बाबुरास वाटत होतें; पण त्यांत त्याची निराशा झाली. तथापि उझबेग लोकांशीं टक्कर देण्यासाठीं बाबुरानें आपलें सामर्थ्य वाढविण्याचें काम चालू ठेविलें. वर्ष दीड वर्षाच्या अवधींत समरकंदच्या कक्षेंतील बहुतेक सर्व प्रान्त व गांवें बाबुराच्या सत्तेखालीं आलीं. त्याचें सैन्यही त्या मानानें दिवसांनुदिवस वाढूं लागलें व ह्याचाच परिणाम म्हणजे इ. स. १५०१ च्या मेमध्यें आपण शैबानीखानाशीं सामना करूं शकूं असें त्यास वाटूं लागलें.

## ज्योतिषानें केलेला घात : १ १७

शैबानीखान व उझबेग यांच्याशीं धडक मारण्याची तयारी बाबुरानें केली; पण ती पुरती होऊन त्यायोगें आपण त्यांस खास भारी झालों अशी त्याची खात्री झाली नव्हती. उझबेग लोकांचे लढाईचे डाव, व्यूह व लष्कराच्या हालचाली करण्याची तऱ्हा नीट बारकाईनें अभ्यासून त्यावर तोडी, प्रतितोडी वगैरेची तयारी व्हावयाची होती. अशा अर्धवट स्थितींत शैबानी-खानाशीं सामना देण्याचा प्रसंग त्याच्यावर आला आणि तो प्रसंगच ठरला.

समरकंदहून निघून गेल्यानंतर शैबानीखान बुखाऱ्यास राहात होता. त्यानें तेथें उझबेग लोकांची जमवाजमव चालविली होती, आणि जंगी तयारीनिशीं बाबुरवर चालून जाण्याचा त्याचा बेत होता. सध्यां त्याचा मुक्काम दाबुश्र या ठिकाणीं होता. प्रसंगीं समरकंदवर चाल करून जाणें सहज साधेल इतपतच अंतर समरकंद आणि दाबुश्र यामध्यें होतें.

इ. स. १५०१ चा मे महिना उगवला आणि बाबुरानें शैबानिखानावर चालून जाण्याचें ठरविलें. मे महिन्याचा पहिला पंधरवडा बाबुरास अनुकूल ग्रहमानाचा होता. या वेळीं शैबानिखानाशीं बाबुरानें गांठ घातली तर त्यांत त्याला यश खास येईल व शत्रूचा–शैबानीखानाचा नायनाट होईल, कारण त्याला त्या वेळीं ग्रह प्रतिकूल आहेत अशीं प्रख्यात ज्योतिषांचीं मतें पडलीं.

आणि हा पंधरवडा उलटला कीं बाबुरास अनिष्ट ग्रह येत आहेत तेव्हां खानाशीं गांठ घालावयाची असेल तर ती आतांच घातली पाहिजे असें ठरलें. तेव्हां बाबुराचा नाइलाज झाला. तारखान आणि दुघलत अमीरांच्याकडून या लढ्यासाठीं फार मोठी मदत यावयाची होती; पण ती प्रत्यक्ष दाखल होण्याच्या आधीं बाबुरास या ज्योतिषांच्या सांगण्याची भुरळ पडली आणि तो स्वारीवर निघाला.

इ. स. १५०१ मेच्या प्रारंभीं एके दिवशीं बाबुराचें सैन्य समरकंदच्या बाहेर पडलें. बाबुराची चतुरंग सेना सर्व आयुधांनीं सुसज्ज होती. लढाईत आपण विजयी होऊं असा आत्मविश्वास प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता. समरकंदपासून जरा अंतरावर सारइपूल या ठिकाणीं त्यानें आपला तळ टाकिला. खंदक करून बचावाची सिद्धता केली. जोंपर्यंत बाबुराचें सैन्य या खंदकाच्या आसपास बचावाचें धोरण ठेऊन आपल्या हालचाली करीत होतें तोंपर्यंत त्याच्या वाटेस जाण्याची ताकद शैबानीखानाची नव्हती. पण चढाई करण्याच्या हेतूनें बाबुराचें सैन्य पुढें येतांच शैबानीखानही चालून आला. सैन्यें एकमेकांस भिडण्याचा क्षण समीप आला. दोन्हीं सैन्यें समोरासमोर उभीं होतीं. बाबुरानें आपल्या सैन्याची रचना अर्धवर्तुळाकृति केली होती. डावी-उजवी बगल व मध्य यांची मजबुती चांगली होती. शैबानीखान बाबुरावर चाल करण्यासाठीं निघाला. त्याचें सैन्य लांबच लांब रांगेनें आलें. त्यानें तुलुघमा युद्धपद्धतीचा अवलंब केला. उझबेग लोक याच पद्धतीनें लढत. या वेळीं बाबुर या युद्धकलेंत पटाईत नव्हता. पुढें तो या कलेंत निष्णात झाला. हिंदुस्थानांत त्यानें याच युद्धकलेचा उपयोग केला.

शैबानीखान झपाट्यानें आला त्याच्या सैन्यानें बाबुराच्या डाव्या बाजूनें वळसा घालून त्यास पुरा वेढला, आणि एकदम कचाकचीस सुरुवात झाली. वळीव पावसांतील गारांच्या माऱ्याप्रमाणें मागून व पुढून बाणांचा मारा तडातड होऊं लागला. असल्या युद्ध-तंत्राला बाबुर अगदींच अपरिचित

होता. हें काय चालू आहे आणि याचा शेवट कसा होणार व याला तोंड कोणत्या लष्करी डावानें द्यावें हेंच त्यास उमजेना. बाबुराच्या मागच्या बाजूस एकदम धडाका उडाला. तिकडे लक्ष वेधलें जातें न जातें तोंच पुढच्या बाजूस खणाखणीस सुरुवात झाली. आतां दोन्ही बगलांवर जोरांत मारगीर सुरू झाली. सगळीकडे गोंधळ माजला. या गोंधळांत बाबुराकडील मोगल लोकांनीं त्यांचा नेहमींचा सैतानी खेळ सुरू केला. हे मोगल लोक असे विश्वासघातकी आणि बदमाष होते कीं, त्यांचा जय झाला कीं ते गांवेंचीं गांवें लुटून फस्त करीत आणि पराभव होतो असें वाटलें कीं घोड्याखालीं उड्या टाकून त्या दंगलीचा फायदा घेत आणि आपल्याच लोकांचे गळे कापीत लूटमार करीत. हा त्यांचा पुरातन सैतानी खेळ त्यांनीं आतांही चालू केला. बाबुराच्या सैन्याची बेसुमार नासाडी त्यांनीं चालविली. सभोंवार बाणांचा वर्षाव होऊन सैनिकांचीं डोकीं शेंदाडाप्रमाणें ठेचलीं जात होतीं. मोंगल सैनिकांचे विश्वास-घातकी अत्याचार एकसारखे चालू असल्याकारणानें बाबुराची लढाई बिघडली. सैन्य फटाटलें, फौजेचा भणभणाट झाला. बाबुराचा पराभव होऊन तो नदीच्या कांठाशीं आला तों त्याच्याजवळ दहा-पंधराच लोक शिल्लक राहिले. आतां त्यांना कोहिक नदीचें पात्र ओलांडून जावयाचें होतें. क्षणाचाही विचार न करतां त्यांनीं धाडकन् नदींत उड्या टाकिल्या. घोडे, त्यांचीं तीं घाटदार जिनें व चिलखतें या सर्व सरंजामासुद्धां नदीचा प्रवाह कापून पलीकडे जाणें मोठ्या जिकीरीचें काम होतें. प्राणावर बेतली होती. तेव्हां जिवाचा आटापिटा करून त्यांनीं नदीचें पैलतीर गांठलें. तेथें येतांच घोड्याचीं जिनें व चिलखतें फेकून देऊन त्यांनीं समरकंदकडे धांव ठोकली. शैबानीखानास ठार करण्याच्या हेतूनें शुभ मुहूर्तावर बाहेर पडलेला बाबुर पराजय खाऊन माघारीं आला. ज्योतिषाच्या सांगण्यावर आपण उगाच भिस्त ठेविली असें त्यास वाटलें, पण त्याचा कांहींच उपयोग नव्हता. आल्या प्रसंगांतून निभावून जाणें हेंच काय तें शिल्लक होतें. तें त्यानें ह्या प्रकारें केलें व अपयश पदरीं घेतलें.

## समरकंदला राम राम : : : १८

बाबुर जीव घेऊन समरकंदला आला. आतां शहराचें रक्षण कसें करावयाचें हा मोठा प्रश्न होता. बाबुराच्या लष्कराची धूळधाण उडाली होती. तेव्हां आतां शहर कसें लढवावें हा मोठाच पेंच होता. यद्यपि राजनिष्ठ सेवकांवर त्याची मदार होती, तरी पण शत्रूशीं दोन हात करणें हें त्यांस माहीत नव्हतें. त्यांचा पेशा लष्करी नव्हता; पण हातीं असणाऱ्या साधनसामुग्रीवरच लढत देणें भाग होतें. समरकंदची तटबंदी अतिशय मजबूत होती. तिच्या आश्रयानें शत्रूचा समाचार घेणें शक्य होतें. शैबानीखानाची धाड समरकंदवर आली त्याबरोबर चकमकीस सुरुवात झाली. तटाच्या आश्रयानें नागरिक शत्रूचा समाचार घेऊं लागले. एकदां तर दर्जीच्या दरवाज्याशीं ( समरकंदच्या तटाचें एक प्रवेशद्वार ) उझबेग लोकांनीं चांगलीच दंगल माजविली. शिड्या लावून ते वर चढूं लागले, त्याबरोबर नागरिकांनीं तटावरून अग्नीचा वर्षाव करून त्यांस खालीं पाडलें. समरकंदचा लढा केवळ तटाच्या साहाय्यानें बाबुरानें सहा–सात महिने चालविला. समरकंदभोंवतीं खळ्या खणीत शैबानीखान खडा होता. रात्रीं तर या लढ्यास विशेषच उग्र स्वरूप येई. काळ्याकभिन्न अंधःकारांत शैबानीखानाच्या उझबेग लोकांना जास्तच चेव येई. ते कर्कश अरोळ्या ठोकीत, गवताचे जाळ करीत, आणि पडघमांचे आवाज इतक्या जोरानें चालत कीं त्यापुढें आग्यावेताळाची भीषणता कमी वाटे.

अशा तऱ्हेनें सहा-सात महिने लोटले पण परिस्थितींत सुधारणा कोठेंच दिसेना. शैबानीखानाचा दम पहिल्या दिवसाइतकाच ताजातवाना व कणखर होता. शत्रु कोठेंच नमला नाहीं. उलट बाबुर मात्र बेजारगतीस आला. त्याला मदत येण्याची आशा कोठूनही दिसेना. कारण परस्परास साह्य करून सर्वांच्याच उरावर बसणारा शत्रु नाहींसा करणें हें त्या लोकांस माहीत नव्हतें. जात्यांत भरडलें जाणारें रडतें म्हणून सुपांतल्यानें खदखदां हसण्यांतलाच हा प्रकार होता. बाबुराचे सामर्थ्यवान् भाऊबंद दुरून मजा पाहात होते. कोणाकडूनही कसलीही मदत येत नव्हती, येण्याची आशा नव्हती. अपयशाचा राक्षस बाबुराचा ग्रास करण्यासाठीं झपट्यानें पावलें टाकीत होता.

समरकंदमध्यें भयंकर परिस्थिति झाली होती. अन्नाचा कण नव्हता. भुकेनें लोक व्याकूळ झाले होते. भुकेला कोंडा म्हणतात तेंच खरें. लोकांनीं काय वाटेल तें खाण्यास सुरुवात केली. गाढवें, घोडीं, कुत्रीं यांच्यावर उदरनिर्वाह करण्यास सुरुवात झाली.

आतां एकेक दिवस ढकलावयाचा म्हणजे प्राणसंकट वाटूं लागलें. शैबानीखानाची चिकाटी जबरदस्त होती व त्यांतून सुटका होण्याचा मार्ग कोठेंच दिसेना. निराशा—दारुण निराशा होऊन चित्तवृत्ति भांबावून गेल्या. बाबुरास पळून जाण्याशिवाय गत्यंतर दिसेना. बाबुरासारख्या मानधनास या प्रसंगानें काय वाटलें असेल याची कल्पनाच करवत नाहीं. पण ह्या दारुण दुःखाचा प्याला बाबुर पुन्हा एकदां मुकाट्यानें प्याला आणि त्यानें समरकंदला राम राम ठोकला. तसें करतांना त्याला प्राणांतिक यातना झाल्या. त्याची आई, आजी, बायको आणि बहीण इतक्या स्त्रिया त्याच्याबरोबर होत्या. त्यांची रवानगी सुखरूपपणें करणें हें एक मोठें अवघड व नाजूक काम होतें. तें त्यानें केलें, पण त्या धांदलींत त्याची बहीण शत्रूच्या हातीं लागली. वस्तुतः तें तसें नव्हतें. बाबुराच्या बहिणीचें शैबानीखानावर प्रेम होतें आणि ही संधि साधून ती त्याच्या जनानखान्यांत दाखल झाली.

कसेबसे प्राण वांचवून ते मार्गास लागले. दुःखाची आणि अपयशाचीं जालीम विषें पचविण्यांत बाबुराचें सामर्थ्य अचाट होतें यांत शंकाच नाहीं. त्याच्या आनंदी वृत्ति पुन्हां खेळीमेळीचे व्यवहार करूं लागल्या. कासीमबेग, कमरअल्ली वगैरे जिवलग स्नेह्यांनिशीं बाबुर आपला मार्ग आक्रमीत होता. बाबुराचा घोडा सर्वांच्या पुढें होता व त्याचे इतर स्नेही मागें होते. तेव्हां ते आतां किती मागें आहेत हें पाहण्यासाठीं बाबुरानें आपला घोडा थांबवून मागें वळून पाहिलें. त्याच्या घोड्याच्या जिनाचा पोटतंग ढिला झाला होता, त्यामुळें तो खालीं फेकला गेला. जमिनीवर मारलेला चेंडू अलगत उडी घेतो त्याप्रमाणें तो पडल्या क्षणींच उड्डाण घेऊन पुन्हा घोड्यावर स्वार झाला आणि मार्ग आक्रमूं लागला. डोक्यास मुका मार बसला होता. त्याची धांग विलक्षण तऱ्हेनें चढली होती. तो शुद्धीवर नव्हता. स्वप्नसृष्टींतील व्यवहाराप्रमाणें भोवतालचे व्यवहार चालू होते इतकेंच. संध्याकाळीं तो शुद्धीवर आला. दोन दिवसांच्या प्रवासानंतर त्याचा मुकाम दिझाक या ठिकाणीं झाला. येथें शत्रूच्या कक्षेतून ते पार पडले. गेल्या सहा-सात महिन्यांत त्या धास्तावलेल्या जीवांना सुखाचें अन्नपाणी का झोंप नव्हती. त्यांना येथील पहिलें जेवण, पहिला पाण्याचा घोट व पहिली निद्रा स्वर्गीय आनंदापेक्षांही अनुपमेय वाटली.

## वनवास : १ : १९

दुःखद विचारांचे विंचू एकसारखे फणकारे मारीत असतां दिवस कंठण्याचा प्रसंग बाबुरावर पुन्हां एकदां आला. उरातिपा शहराच्या असमंतात् असणाऱ्या कडेपठारावर हे दिवस काढण्याचें त्यानें ठरविलें. तेथील शेतकरी आणि धनगर यांच्याशीं गप्पा मारण्यांत आणि त्यांच्या जीविताशीं समरस होण्यांत बाबुरास निरतिशय आनंद होत असे. त्यांचीं गुरेंढोरें, मेंढरें, कोंकरें हिरव्याचार हिरवळीवर चरतांना पाहून बाबुराचें मन प्रसन्न होई. तीं गोजिरवाणीं कोंकरें सूर्यनारायणाच्या सोनेरी किरणांच्या मंद प्रकाशांत मखमलीप्रमाणें दिसणाऱ्या त्या भूमीवर बागडतांना पाहून बाबुर एखाद्या फुलपांखराप्रमाणें त्यांच्या मागोमाग उड्या मारी. आपण राजराजेश्वर आहोंत हें तो विसरे आणि त्यांच्यामागें अनवाणी जाई. त्याचा मुक्काम एका मातब्बर शेतकऱ्याच्या सन्निध होता. त्याची म्हातारी एकशें अकरा वर्षांची होती. ह्या जुनाट वेलीचा विस्तार फार मोठा होता. तिचीं नातवंडें-पणतवंडें मिळून शहाण्णव लोक होते. ते सर्व आसपासच्या प्रदेशांत पसरले होते. तिच्या एका जवळच्या नातेवाइकानें तैमूरबरोबर हिंदुस्थानच्या स्वाऱ्यांत नोकरी केली होती. ही म्हातारी तैमूरच्या शौर्याच्या गोष्टी सांगून बाबुराचें मनोरंजन करीत असे. त्या वीर-कथा ऐकतांना बाबुरास मोठी

मौज वाटे. तीं आख्यानें ऐकत असतां आपण हिंदुस्थानांत जावें व तेथें साम्राज्य स्थापावें असें बाबुरास वाटे. त्या राज्याचीं पुसट चित्रें त्याच्या दृष्टिसमोर उभीं रहात. पुढें ह्याच विचारांची परिणति दुःखांत होई. आपणास येथील वडिलार्जित राज्यें सांभाळतां आलीं नाहींत तर आतां कसचें राज्य नी कसचें साम्राराज्य ! काय घेऊन बसला आहेस ? वेडा कोठला ! ! असे विचार मनांत येऊन त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहात. पण त्यावेळीं त्यास माहीत नव्हतें कीं, तोच पुढें हिंदुस्थानांत मोगल साम्राज्य स्थापन करणार होता. आतां मात्र त्याच्या बैठकीला सिंहासन नव्हतें, साधें पटकुर सुद्धां नव्हतें. बोडक्या खडकावर तो बसला होता व त्याचे कंगोरे त्यास रुतत होते.

सध्यां त्याची मनस्थिति एखाद्या सशाप्रमाणें भेकड झाली होती. जरा कांहीं खुट्ट झालें कीं तो गांगरून कान टवकारून पाही. या वेळीं त्याची आई, आजी वगैरे मंडळी लपत छपत त्याच्याकडे येत होती, पण त्यांना पाहून हा घाबरला. माणसांत एकदां का न्यूनगंड निर्माण झाला कीं त्याची दैना उडते. पंजाच्या एकाच फटकाऱ्यानें मस्त गजराजाचें गंडस्थळ फोडूं पाहणारा वनराज गोगलगाय बनतो. पड्या माणसाला कोणीहि उपदेशाचें सवंग अमृत पाजतो, तसें त्याचें झालें होतें. बाबुराच्या एका मित्रानें त्यास असा उपदेश केला कीं, त्याचें यापुढील आयुष्य वैभवांत नांदणाऱ्या त्याच्या भाऊबंदांच्या कृपेवर अवलंबून आहे. तेव्हां त्यांस नजर-नजराणे धाडणें व त्यांची कृपा संपादन करणें हेंच त्याचें काम आहे. त्याच्या या बडबडीचा बाबुराच्या मनावर परिणाम झाला. खरोखरीच त्या मुर्दाड माणसाच्या सांगण्याप्रमाणें फर्घाना प्रान्ताचें राज्य बळकावून बसणाऱ्या जहांगिराला—आपल्या भावाला एक उत्तमपैकीं फरीचें शिरस्त्राण त्यानें पाठविलें. त्याबरोबरच त्याचा हाडवैरी पण जहांगीरच्या राज्याचा मुख्य सूत्रधार अहंमद तंबल यालाहि समरकंदची प्रख्यातपैकीं वजनदार तलवार त्यानें भेट धाडिली. हा नजराणा धाडतांना बाबुराचें अंतःकरण कढत होतें, अश्रूंचा पूर वाहात होता. अहंमद तंबलची

आठवण होतांच सूडाच्या भावनेनें त्याच्या सर्व शरीरभर चेंव भणाणे. वाटेल तें साहस करून त्याचा खुर्दा करावा असें त्यास वाटे. अधूनमधून त्यास संतप्त करून सोडणाऱ्या अशा विचारांची मालिका त्याच्या डोक्यांत चाले.

एका हिंवाळ्यांत सर या गांवाच्या आसपास लूटमार करण्यासाठीं तंबल आल्याची बातमी बाबुरास लागली. त्याबरोबर त्याला गांठून त्याचीं खांडोळीं उडवावींत या हेतूनें बाबुर त्याच्यावर चाल करून गेला; पण त्या ठिकाणीं तो जातो तों तंबल तेथून नाहींसा झाला होता. त्यामुळें बाबुराची निराशा झाली. बाबुरानें तेथील शेतकऱ्यांच्या सहवासांत पांच-सहा महिन्यांचा काल काढिला; पण त्याला त्या ठिकाणीं चैन पडेना, तेव्हां त्यानें आपल्या मामाला भेटण्याचें ठरविलें आणि ता. १६ जून इ. स. १५०२ ला तो ताशकंदला मिर्झा महंमदखानाकडे निघाला. उभयतांच्या भेटी झाल्या, पण एकंदर वातावरण फारसें उत्साहकारक नव्हतें. अहंमद तंबलचा बंदोबस्त करण्याचें मात्र त्याच्या मनांत होतें, कारण तो त्याच्या राज्यांत वारंवार लूटमार करी व त्रास देई. तंबलच्या स्वारींत बाबुरानें भाग घ्यावा असें त्यास वाटत होतें. त्याच्या मनाचा हा ठाव घेऊन बाबुर तेथून यलदूजला त्याचा धाकटा मामा अहंमदखान होता तिकडे जाण्यासाठीं निघाला; पण बाबुरास तिकडे जाण्याचें कारणच पडलें नाहीं. त्याचा मामा अहंमदखान आपल्या भावाला भेटण्यासाठीं म्हणून निघाला होता. उभयता खानांची भेट झाली. दोघांचें सख्य झालें व तंबलचा कांटा काढण्याचा बेत निश्चित झाला आणि त्या स्वारीवर ते निघाले.

## जखमी वाघ : : : २०

बाबुराच्या दोन्ही मामांनीं त्याच्या हाताखालीं एक स्वतंत्र तुकडी देऊन त्याची रवानगी या स्वारीवर केली होती. उश आणि उशकंद हीं दोन शहरें बाबुरानें हातोहात घेतलीं. तेथील लोकांना हा उमदा राजा आलेला पाहतांच आनंद झाला. मार्धिनान हें शहरही त्याचेंच होतें. तेथील लोक त्याच्याभोंवतीं जमा झाले. दोन खान आणि बाबुर आपल्यावर निघाले आहेत आणि बाबुर इतका समीप आला आहे ह्या गोष्टी अहंमद तंबलला कळतांच त्याच्या हालचाली सुरू झाल्या.

तंबल अंदिजानला होता आणि त्या ठिकाणीं त्याच्याशीं गांठ घालण्याचा बाबुराचा बेत होता. त्या शहराच्या आसपास त्यानें आपला तळ टाकिला व योग्य समयाची. वाट पाहात तो त्या ठिकाणीं दबा धरून बसला होता. अंदिजानचे अमीर, उमराव, मौलाना, काजी, उदीम–व्यापारी वगैरे माणसें फोडण्याचें काम चालू होतें. एकंदर वातावरण बाबुरला अनुकूल होतें, आणि अहंमद तंबलला आपण उखाड स्वास देतों असें त्यास वाटूं लागलें. तोंच एक दिवस उजाडतांच शत्रु समीप आल्याची आरोळी कंबरअल्लीनें ठोकली. त्याबरोबर शत्रूस तोंड देण्यासाठीं बाबुराचें लष्कर तयार होऊं लागलें. त्या वेळच्या धामधुमीच्या काळांत केव्हां काय प्रसंग येईल याचा नेम नसल्याकारणानें

बाबुर फारच सावधगिरीनें निजत असे. कंबरअलीची आरोळी ऐकतांच बाबुर ताडकन् उठला. त्यानें आपलीं पंचहत्यारें घेतलीं व घोड्यावर स्वार होऊन तो निघाला. त्याच्याबरोबर दहा-बारा लोक होते. तो आघाडीवर होता. ते मैल अर्धा मैल अंतर कापतात न कापतात तोंच शत्रु दिसूं लागला. हां हां म्हणतां चकमकीस सुरुवात झाली. ह्या बारीक चकमकींना चुकवून बाबुर पुढें निघाला. तों तंबल आपल्या लष्कराच्या समोर कांहीं सैनिकांशीं बोलतांना बाबुरास दिसला. त्याबरोबर बाबुराचा त्वेष अनावर झाला आणि त्यानें एक बाण तंबलवर सोडला. तो तंबलचें शिरस्त्राणास चाटून पुढें गेला. तंबलनें लगेच आपला घोडा वळविला आणि बेधडक बाबुरवर चाल केली. तंबलनें नखशिखान्त लोखंडी चिलखत घातलें होतें; बाबुरानें फक्त चिलखती कोपरी घातली होती. त्याच्या मांड्या सुरक्षित नव्हत्या. दोघांची बाणांची, नंतर खड्गांची चांगलीच झकापक झाली. बाबुराच्या मांडीस जखम झाली आणि ही खणाखणी संपली.

## कुचंबणा : : : २१

गरजू माणसाच्या भोंवतीं वावरणारें जग मोठें धोरणी आणि धूर्त असतें. त्या माणसाच्या नाजूक स्थितीचा फायदा घेऊन त्याला पूर्णपणें कसें नागवावें हें तें जाणतें. बाबुराचें मामा उभयता खान आतां असेंच वागत होते. आपला भाचा पूर्णपणें नाडला आहे, तेव्हां त्याला राबवून लोण्याचा मोठा गोळा मोठ्या शिताफीनें लम्पास करणें हें एकच काम तूर्त त्यांनीं चालविलें होतें. प्रस्तुतच्या स्वारींत कोणालाच म्हणण्यासारखें यश आलें नव्हतें. जो तो आब राखून होता. बाबुरनें मात्र कांहीं प्रांत जिंकले होते. वास्तविक ते पूर्वीं त्याचेच होते आणि आतां त्यानें स्वसामर्थ्यानें पुन्हां जिंकल्याकारणानें ते त्याच्या ताब्यांत देणें हें त्याच्या मामांचें काम होतें. पण असें झालें असतें म्हणजे मग मनुष्य कसला आणि त्याचा तो स्वार्थ तरी कसला !

बाबुराच्या मामानें–महंमदखानानें आतां मोठी गंमत चालविली. बाबुरानें या स्वारींत पुन्हा जिंकलेले हे प्रांत महंमदखानानें आपल्या भावाच्या–अहंमदखानाच्या ताब्यांत दिले आणि त्यावर अशी मल्लीनाथी केली कीं, अहंमदखानाच्या ताब्यांत हे प्रांत असणें अत्यंत जरूर आहे आणि असें करण्यांत भविष्यकालीं बाबुराचेंच कल्याण आहे. आपणा सर्वांचा शत्रु शैबानिखान याच्यावर चांगला वचक बसावा अशी इच्छा असेल तर

अहंमदखानाचा बडिवार आपणच वाढविला पाहिजे, आणि त्यासाठीं त्याचें राज्य भरघोंस असलेंच पाहिजे. आतां आपण समरकंद जिंकणारच आहोंत. तसें होतांच तें जसेंच्या तसें बाबुराच्या स्वाधीन करूं. मामांच्या या दरबारी वागणुकीचा आणि थापांचा बाबुरास अत्यंत वीट आला होता. या स्वारींत फारसें यश आलें नव्हतें म्हणून त्यांच्या भाषा इतपत तरी होत्या. जर त्यांच्या हातास यश येतें तर कसचा बाबुर आणि कसचें काय अशीच त्यांची उडवाउडवीची वागणूक झाली असती हें बाबुर जाणून होता. पण बिचारा प्रसंगांत सांपडला होता. सुसरीबाई, तुझी पाठ मऊ म्हणून दिवस काढणें त्याला भाग होतें. महंमदखानाच्या थापा ऐकल्यानंतर बाबुर अहंमदखानाकडे गेला. तेथें त्यास जखमेमुळें लंगडत येतांना त्यानें पाहिलें. तेव्हां तो धांवतच त्याच्याजवळ गेला व त्यानें त्यास मोठ्या आस्थेनें आपल्या तंबूंत आणिलें, त्याच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि जखमेवर औषधोपचार करण्यासाठीं म्हणून तावडतोब हकीमास बोलाविणें पाठविलें. धाकट्या मामाच्या या वागणुकीनें बाबुरास बरें वाटलें. अहंमदखानाच्या हकीमानें बाबुराच्या जखमेस औषधोपचार उत्तम प्रकारें केल्यानें त्यास बरें वाटलें.

## सुटका : : : २२

बाबुराच्या शरीराची जखम बरी झाली, पण त्याच्या मनाची जखम रोज चिघळत होती. रोज कोणत्याना कोणत्या प्रसंगानें तिची खपली निघावी आणि बाबुरास प्राणांतिक यातना व्हाव्यात नी जगाचा निराळा अनुभव यावा. दुधानें तोंड पोळलें म्हणून ताक फुंकून प्यावें, तों ताकानेंच एखादे दिवशीं असें तोंड भाजावें कीं जिभेला टरटरून फोड यावा, असें चाललें होतें. इतक्यांत बाबुरास तंबलच्या भावाचें बोलावणें आलें. तो त्यास मिळाला म्हणजे अहंमद तंबलचा कांटा काढण्यास त्यास सोपें जाणार होतें. भावाचा गळा कापण्यासाठीं त्यास बाबुराची मदत पाहिजे होती. हें आमंत्रण येतांच बाबुराच्या मामांना मोठें समाधान वाटलें. कारण बाबुराचें—आपल्या भांच्याचें ओझें त्यांना जड वाटत होतें. तेव्हां तें अशा तऱ्हेनें परस्पर नाहींसें झाल्यास त्यांचें आयतें काम होणार होतें. त्यांनीं त्यास तंबलच्या भावास जाऊन मिळण्याचा सल्ला दिला. तंबलच्या भावाशीं—बयाझिद्शीं स्नेहसंबंध घनदाट वाढवून त्याच्या मदतीनें तंबलचा कांटा काढावा आणि तंबल दुनियेंतून नाहींसा झाला कीं त्याच्या भावाचा—बयाझिद्चा निकाल लावावा, हे त्याच्या मामांचे ओठांतून बाहेर पडणारे विचार बाबुरास कळत नव्हते असें नाहीं; पण मामांच्या पोटांत काय मळमळत होतें हेंही तो जाणून होता.

आपलें त्यांच्याजवळचें वास्तव्य त्यांना असह्य झालें आहे आणि आपण येथून ह्या नाहीं त्या निमित्तानें हलावें असें त्यांच्या मनांत होतें, हेंही पण तो जाणून होता. पण बाबुरास त्याच्या मोगल मामांच्यापासून फोडण्यांत तंब्रलच्या भावाचें राजकारण मात्र पल्लेदार होतें. फर्घाना प्रांतावर स्वारी करण्यासाठीं आलेल्या खानद्वयांत सेनानी कोणीच नव्हता. यशस्वी तऱ्हेनें हालचाली करून तंब्रलला तोंड देणारा किंबहुना त्यावर मात करणारा सेनानी काय तो बाबुरच होता. तेव्हां त्याला त्यांच्यापासून अलग केला कीं खानांचा खुर्दा करणें फार सोपें होतें आणि बाबुर पूर्णपणें काबूंत आला कीं त्या कोवळ्या पोराला ठेचून टाकणें अशक्य नव्हतें.

राजकारणाचीं हीं पावलें बाबुराच्या लक्षांत येत नव्हतीं असें नाहीं; पण त्यानें आपल्या मनाशीं निराळाच आराखडा आंखला होता. बायझिद्चें आमंत्रण आयतें आलें होतें तेव्हां मामांच्यापासून मानानें दूर जातां येत होतें. तसेंच त्याचा त्याच्या स्वपराक्रमावर विश्वास होता, आणि आपण आपल्या चांगल्या वागणुकीनें बायझिद्ला पूर्णपणें आपलासा करूं आणि तंब्रलची अर्धी शक्ति आत्मसात् करून अहंमद तंब्रलवर मात करूं ही बाबुरची विचारसरणी अगदींच चुकीची होती असें नाहीं. तो तरुण होता. त्याच्या चित्तवृत्ति सरळ होत्या. तो पराक्रमी होता. तेव्हां प्रथम दर्शनीं त्यास हें असें दिसलें व त्यानें तंब्रलच्या भावाच्या आमंत्रणाचा स्वीकार केला, आणि तो अक्षीला दाखल झाला. शेजारच्या एका मजबूत किल्ल्यांत तो राहूं लागला. तेथें त्याच्या बापानें–उमरशेखनें एक वाडा बांधला होता. त्या ठिकाणीं बाबुरचें वास्तव्य होतें. खास मालकीच्या घरांत भाड्यानें राहण्याचा प्रसंग यावा तशांतलाच हा प्रकार. हें शल्य बाबुरास बोचत होतेंच, पण एकंदर वातावरण ठीक होतें. बायझिद्ची वागणूक साफ दिलाची दिसत होती. किल्ल्याचा ताबा त्याच्याकडेच होता. एकंदर वातावरण आपणास पाहिजे तसें आपण तयार करूं असें बाबुरास वाटत होतें तोंच एकाएकी रंग पालटला.

शैबानीखान चालून येत असल्याचें वृत्त आलें. तो समीप येतांच बाबुरच्या मामांनीं त्याच्याशीं तह केल्याची बातमी मागोमाग धडकली. नंतर अहंमद तंबल दोन-तीन हजार फौजेनिशीं निघाला असल्याचें वृत्त दाखल झालें. आतां मात्र बाबुरास फारच मोठा पेंच पडला. शैबानीखानाशीं मामांनीं तह केला तेव्हां तीं द्वारें बंद झालीं. आणि तंबल एवढ्या मोठ्या तयारीनें बाहेर पडला तो शैबानीखानाशीं गांठ घालण्यासाठींच. तेव्हां शैबानीखानाची आणि तंबलची गांठ पडेल तेव्हां पडेल, पण तो आतां आपली गठडी प्रथम वळेल व मग शैबानीखानाचें व त्याचें काय व्हावयाचें तें होईल. त्याच्या आधीं हा फांस आपलें नरडें आंवळणार खास, असें बाबुरास वाटलें आणि तें खरेंही होतें. सुखकारक परिस्थितीच्या हिरवळींतून हा प्राणघातक प्रसंगाचा नाग सळसळतांच बाबुर घाबरला. त्याला सुटकेचा मार्ग कोठेंच दिसेना. तेव्हां त्यानें पोबारा केला आणि पुन्हां अरण्यवास पत्करला.

# काबूल : : : २३

चंगीजखानाच्या आणि तैमूरच्या वंशजावर इ. स. १५०३ च्या मध्यांत भयंकर अनर्थ कोसळला. शैबानीखानानें त्यांना असा जबरदस्त तडाखा दिला कीं हे दोन्ही वंशवृक्ष उन्मळून खालीं पडले. शैबानीखानाची धाड फारच मोठ्या प्रमाणानें आली आणि त्यानें ह्या लोकांचा धुव्वा उडविला. तो २०००० सैन्यासह समरकंदहून आला आणि विजेच्या लोळाप्रमाणें ताशकंदवर कोसळला. त्याचा ताबा घेतल्यानंतर त्याची चाल उरातिपावर आली आणि तेथून तो अक्षीवर चालून गेला. तेथें त्यास दोन खान भेटले. त्यांचा त्यानें धुरळा केला. ह्या अपयशानें धास्तावून अहंमदखान मेला; पण महंमदखानाचें दैव अत्यंत खडतर होतें. त्याचा व त्याच्या पांच मुलांचा खून शैबानीखानाच्या एका अधिकाऱ्यानें केला. ह्याच दगक्यांत अहंमदखान तंबलही छाटला गेला. शैबानीखानाचें हें जबरदस्त सामर्थ्य पाहून बाबुर स्तिमितच झाला. या जबरदस्त माणसाशीं यशस्वीपणें सामना देण्याचें सामर्थ्य आपण निर्माण केलें पाहिजे ही खूणगांठ त्यानें आपल्या मनाशीं बांधली. पण प्रस्तुत बाबुराची स्थिति अत्यंत खालावली होती. त्याच्या कपाळीं आतां अरण्यवास लिहिला होता, उजळ माथ्यानें फिरण्याची सोय नव्हती. फर्घाना, ताशकंद आणि बुखारा या ठिकाणीं उझबेग लोकांची

सत्ता प्रस्थापित झाली होती. शैबानीखानाच्या सामर्थ्यापुढें सर्वांनीं माना टाकल्या होत्या. छाती काढून चालण्याची कोणाचीहि ताकद नव्हती. बाबुरास आशा करण्यासारखें आतां फक्त एकच ठिकाण शिल्लक राहिलें होतें. तें म्हणजे काबूल. काबूलच्या सिंहासनावर त्याचा चुलता उलुगबेग हा राज्य करीत होता. तो इ. स. १५०१ मध्यें वारला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा अबदररझाक हा राज्य करीत होता, पण त्याला पदच्युत करून ती गादी कंदाहारच्या एका बेग सरदारानें बळकावली. तेव्हां त्या माणसास हुसकावून देऊन तें सिंहासन आपण घ्यावें असें बाबुराच्या मनानें घेतलें आणि तो काबूलची वाट चालूं लागला.

ह्या वेळीं बाबुराचें वय एकवीस वर्षांचें होतें. तो नुकताच चेहरेपट्टीसाठीं वस्तरा वापरूं लागला होता. एवढ्या छोट्या वयांत अनेक अनुभवांनीं तावून-सुलाखून निघालेल्या बाबुराचें काबूलकडील प्रयाण म्हणजे त्याच्या आयुष्यांतील फारच मोठी क्रांति होती. तो तैमूरनें मिळविलेल्या आणि आतां छिन्न-विच्छिन्न झालेल्या छोट्या राज्यांची हरळीची मुळी कुरतडत बसणार नव्हता, तर त्यानें आतां त्या आकुंचित क्षेत्राकडे पाठ फिरविली होती. त्यानें आपला मोर्चा भव्य जगाच्या भव्य कार्यक्षेत्राकडे वळविला होता. त्याच्या कर्तबगारीला पुरें पडेल असें कार्यक्षेत्र त्याच्यापुढें वाढून ठेविलें होतें. प्राण पणाला लावून तीन वेळां समरकंदच्या राज्यावर राजा म्हणून राज्य करणारा हा भूपाल, आणि तीन वेळेला रानावनांतून उपाशी-तापाशी भटकणारा हा भटक्या भाग्यवान् होणारा होता. समरकंदहून काबूल आणि काबूलहून दिल्ली अशीं याचीं भाग्य-स्थळें एकापेक्षां एक सरस होतीं. तेथें त्याचें अलौकिक भाग्य लौकिकाच्या शिगेस पोंचणार होतें. तेथें तो शेंकडों वर्षें टिकणाऱ्या एका साम्राज्याचा सम्राट् होणार होता. पण सद्य-स्थिति मात्र केंविलवाणी होती. मोगल साम्राज्य संस्थापणारा हा सम्राट् सध्यां अगदीं भिकारी होता. त्याच्याजवळ शें-दोनशें लोक होते. त्यांना अरबी घोडेच काय पण साधीं तट्टेंसुद्धां नव्हतीं. अंगभर वस्त्र आणि गोळाभर

अन्न कसेंबसें होतें. त्याच्याजवळ दोनच तंबू होते. स्वतःचा तंबू त्यानें आपल्या कुटुंबीयांस–मातोश्री वगैरेस दिला होता आणि दुसऱ्या एका छोट्या तंबूंत तो आपला गुजारा करीत असे. अशी ही स्वारी आतां आपला मोर्चा काबूलकडे वळविणार होती.

यापुढें बाबुराच्या सैनिकांची संख्या दिवसानुदिवस वाढत होती. रोज नवे नवे लोक सैनिक म्हणून दाखल होत होते. कांहींना तो आपल्या सैन्यांत दाखल करून घेत होता तर कांहींना त्याच्याकडून मज्जाव होत होता. आतां त्याच्या सैन्याचा मुख्य अधिकारी बकी बेग नांवाचा एक नवा गृहस्थ होता. त्याच्या मार्फत सर्व सूत्रें खेळत होतीं. बाबुराचा जुना दोस्त कंबरअली यालासुद्धां त्यानें या नव्या मोहिमेंत घेतलें नाहीं. जहांगीर आणि नसीर या दोन्ही भावांना बाबुरानें आपल्याबरोबर घेतलें होतें. इलस, उलुश, हजारा व मोंगल या जातींचा त्याच्या सैन्यांत विशेष भरणा होता. बाबुराचा लवाजमा व सैन्य म्हणजे एक पेंढार होतें. त्याला शिस्त किंवा लष्करी वचक मुळींच नव्हता; पण लुटालूट करण्याच्या बाबतींत मात्र त्याचा हातखंडा होता. हे अपराध जेव्हां अत्यंत उग्र स्वरूप धारण करीत तेव्हां मग एकाद्यास मरेपर्यंत फटक्यांची शिक्षा होई आणि मग वचक बसे.

अशा तऱ्हेनें मजल दर मजल करीत करीत बाबुराचें हें सैन्य काबूलच्या आसपास आलें. त्यानंतर काबूलवर स्वारी केव्हां व कशी करावयाची याचा विचार सुरू झाला. तेव्हां एक दिवस एका बैठकींत या स्वारीचा उहापोह करण्यांत आला. त्या वेळीं बकी बेग हा मुख्य सूत्रधार–सरसेनापति होता. त्याचा सल्ला काबूलवर एकदम चाल करावी असा पडला आणि तसें ठरलें. सैन्याची पूर्णपणें तयारी होतांच बाबुराच्या सैन्यानें काबूलवर चालून घेतलें. सैन्याच्या मध्यभागीं बाबुर होता. दोन्ही बाजूंला त्याचे दोन बंधू नसीम आणि जहांगीर हे होते. काबूल सर करतांना फारशी लढत झालीच नाहीं. किरकोळ स्वरूपाच्या चकमकी झाल्या. काबूलचें राज्य बळकावणारा मुकीमबेग मोठ्या कष्टानें आपले व आपल्या कुटुंबीयांचे जीव बचावून पळाला. बाबुराच्या मार्गांतील मोठाच कांटा नाहींसा झाला. बाबुरानें काबूलमध्यें प्रवेश केला.

## स्थिरस्थावर व व्यवस्था : : : २४

काबूलचा ताबा फारसा त्रास न होतां बाबुरास मिळाला. त्याच्या मनास आनंद झाला. आणि आनंद झाला नसता तरच आश्चर्य ! कारण सगळीकडे वाताहत झाली होती. स्वकीयांचीं डोकीं परकीयांनीं मारलीं होतीं. हातीं सत्ता नव्हती कीं सैन्य नव्हतें; मग संपत्तीची भाषा कशाला ? सगळीकडे निराशेचीं पिशाच्चें नाचत होतीं आणि अपयशाचा भेसूर वेताळ मनाच्या चिंधड्या एकसारखा उडवीत होता. अशा स्थितीत काबूलचें राज्य म्हणजे कांठोकांठ भरलेला सुधा-कलशच त्यास वाटला. तेथील वनश्री अत्यंत रम्य होती, प्रदेश सुपीक होता. त्याचा एकंदर वसूल ४९५००० रु. होता.

बाबुराची दृष्टि फार चिकित्सक होती. त्यानें आपल्या नव्या प्रांताची पाहणी फार बारकाईनें केली होती. तेथें कोणत्या प्रकारचीं झाडें आहेत व तीं कोठें वाढतात, फुलझाडें आणि त्यांच्या तऱ्हा किती, पक्ष्यांच्या जाती कोणत्या, त्यांना वादळी हवेंत हिंदुकुश पर्वतावरून कसें उडतां येत नाहीं, त्यांना कसे पकडतात, घोड्याचें उत्तम गवत कोणतें व त्याचीं घनदाट रानें कोठें आहेत, कोणत्या रानांतून गवत रेट आहे पण तेथें डांस मात्र अजिबात नाहीं अशीं रानें कोठें आहेत वगैरे बारीकसारीक गोष्टींच्या नोंदी त्यानें फार बारकाव्यानें केल्या होत्या.

काबूलच्या राज्यसीमेंत कोणकोणते प्रांत येतात, त्याची सरहद्द कोठें संपते, तेथें कोण लोक राहतात, त्यांच्या भाषा कोणत्या, रीतिरिवाज कोणते, धर्म कोणते ही महत्त्वाची माहिती सुद्धां त्याच्या दप्तरीं दाखल होती.

ही सर्व माहिती काढल्यानंतर त्याच्या मनानें असा सिद्धान्त काढला कीं, ज्या लोकांवर आपणांस राज्य करावयाचें आहे ते अत्यंत रानटी असून त्यांच्यावर वचक बसवायचा असेल तर सोडग्यासच हात घातला पाहिजे. समशेरीच्या चमकत्या पात्याशिवाय हे लोक वठणीवर येणार नाहींत आणि सिध्या मार्गानें चालणार नाहींत. बाबुर आतां राजा झाला होता. त्याच्याजवळ फार मोठें सैन्य होतें आणि तें सैन्य राजेपण कायम राखण्यासाठीं अत्यंत जरुरीचें होतें. हें सैन्य पोसण्यासाठीं रयतेनें धान्याच्या रूपानें कर द्यावा असें फर्मान बाबुरानें काढिलें. गैरशिस्तपणें वागण्यास सवकलेल्या बाबुराच्या रयतेस हें फर्मान मान्य झालें नाहीं. जरा गडबड झाली तेव्हां जबरदस्त मारपीट करून रयतेस शिस्तीचा धडा शिकविण्यांत आला. आपल्या सैन्याची नीट व्यवस्था कशी लावतां येईल आणि त्याची शक्ति अखंड कशी ठेवतां येईल हा विचार बाबुरास स्वस्थ बसूं देत नव्हता. आतां त्याला त्या म्हातारीनें सांगितलेल्या हिंदुस्थानची आणि तैमूरच्या स्वाऱ्यांची आठवण झाली. हिंदुस्थानची संपत्ति त्याच्या मनास आकर्षूं लागली. आपण आपला मोर्चा हिंदुस्थानावर वळवावा असें त्यास वाटलें व तो बाहेर पडला. त्याची ही भ्रमन्ति पांच महिनेपर्यंत चालली होती. इ. स. १५०५ जानेवारीपासून तों मे अखेर तो अनेक प्रांतांतून हिंडला. अफगाणिस्थान, खैबर, कोहट, बन्नू, बंगश, इसाकहैल, ब्रह्मपुत्रा आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत त्यानें प्रवास केला. या प्रवासांत त्यास अनेक लोकांचे अनुभव आले व प्रदेशांची माहिती झाली. ह्या माहितीचा आणि अनुभवाचा उपयोग त्यास चांगलाच झाला. हा प्रवास करून तो माघारीं आला तेव्हां त्यास असें समजलें कीं, त्याचा भाऊ नसीर त्याला सोडून बदकशानकडे निघून गेला आहे. आतां त्याला जरा

स्वास्थ्य आल्यासारखें झालें होतें. तेव्हां त्याचें लक्ष आतां त्याच्या स्वतःच्या अगदीं निकटच्या परिस्थितीकडे गेलें, आणि कांहीं बऱ्या धेंडांना शिस्त लावली पाहिजे असें त्यास वाटलें. अनेक साहसांत मदत करणारा व काबूलच्या स्वारीचें सेनापतित्व गाजविणारा बकी बेग बाबुरास डोईजड झाला होता. त्याची मिजास फारच वाढली होती. दरबारीं त्याला फारच मोठा मान होता; पण हें सर्व वैभव लोकांच्या डोळ्यांत सलेल अशा उद्दाम पद्धतीची त्याची वागणूक होती. तो बाबुराच्या मनांतून उतरला होता. त्याचें महत्त्व व त्यानें केलेली बहुमोल कामगिरी ह्या सर्व गोष्टी बाबुराच्या मनांत एक-सारख्या वागत होत्या, पण त्याची वागणूक व कर्तबगारी यांचें त्रैराशिक व्यस्त प्रमाणांत बसलें. त्याच्या राहत्या वाड्यास राजवाड्याचें स्वरूप आलें होतें. तेथें नगारे-नौबदी झडत होत्या आणि भालदार ललकारत होते. कांहीं कांहीं वेळेला हा राजा का तो राजा असा आभास निर्माण होत होता. एक दिवस बाबुराचा तोल गेला आणि त्यानें त्याला ताड्दिशी 'तुला दिवाणपदावरून बडतर्फ केलें आहे आणि तूं चालता हो' असें सांगितलें. त्याबरोबर बकी बेगची धुंदी खाडकन् उतरली व त्यानें बाबुरास विनंति केली कीं 'खावंद, आपण मला नऊ अपराधांची माफी करण्याचें अभिवचन दिलें होतें तरी त्याचा विचार व्हावा.' बकी बेग पाण्यासारखा पातळ झालेला पाहतांच दुसऱ्या एखाद्यास कींव आली असती, पण व्यवहाराच्या दिव्य दिव्यांतून तावून-सुलाखून निघालेलें त्याचें मन आतां भावनांना दाद देण्यास तयार नव्हतें. हें त्याचें वाक्य ऐकतांच बाबुरानें अकरा अपराधांची यादी त्याजपुढें टाकली. त्याबरोबर तो खजील झाला. त्याला तेथून जावें लागलें. जातांना वाटेंत अफगाणांच्याकडून त्याचा खून झाला. बकी बेगवर बाबुरानें शस्त्र धरलेलें पाहतांच त्याचा उपद्व्यापी भाऊ जहांगीर हाही पण तेथून नाहींसा झाला आणि एकंदर वातावरण निष्कंटक झालें.

काबूलच्या स्वारीवर जातांना बाबुरानें आपल्याबरोबर घेतलेलीं जहांगीर, नसीर आणि त्याचा सरसेनापति बकी बेग हीं तीन मातबर माणसें; पण त्या तिघांनींहि त्याला अपयश दिलें. बाबुराचें मन एकंदरीनें स्थिरावलें होतें; पण एक शल्य मात्र त्यास एकसारखें बोंचत होतें. समरकंदच्या उघड्या मैदानांत त्याच्या मनगटाशीं मनगट भिडवून त्यास खडे चारणारा शैबानीखान त्याच्या दृष्टिसमोर एकसारखा खडा होता. त्यानें त्याची व त्याच्या लौकिकवान् खानदानी घराण्याची दुर्दशा केली होती. तेव्हां त्या माणसाचा एकदां निचरा करावा असें त्याच्या मनानें घेतलें आणि हें साध्य साधण्यासाठीं वाटेल तें साहस करण्याची त्याची तयारी होती.

शैबानीखानाचें सामर्थ्य रोज वाढत होतें. भरतीच्या वेळीं गगनाचा ग्रास करूं पहाणाऱ्या पर्वतप्राय लाटांच्याप्रमाणें तो नवीन नवीन प्रांत बळकावीत होता. इ. स. १५०५ मध्यें सर ते अमू आणि अरल ते बदकशान एवढा मोठा टापू त्यानें आपल्या सत्तेखालीं आणला, पर्शिया जिंकला आणि खुरासानचें मुख्य शहर बालक्ष याच्यावर त्यानें चढाई केली. तैमूरच्या खास वंशांतील हुसेन मिर्झा हिरात येथें राज्य करीत होता. त्याची सत्ता खुरासनवरही होती. खुरासनचें मुख्य शहर बालक्ष येथें शैबानीखानाची

चढाई होतांच हुसेन मिर्झाच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यानें शैबानीखानावर प्रचंड सामर्थ्यानें चाल करून जाण्याचें ठरविलें. यापुढें दुनियेंत एक शैबानीखान किंवा एक हुसेन मिर्झा यांपैकीं कोणीतरी एकच राहूं शकेल अशा आवेशानें त्यानें जोरदार मांड मांडण्यास सुरुवात केली.

शैबानीखानाशीं सामना देण्यासाठीं आपणास सर्वांनीं साह्य करावें म्हणून हुसेन मिर्झानें सर्वांना खलिते धाडले. त्याप्रमाणें त्यानें बाबुरासही या स्वारींत भाग घेण्यासाठीं बोलाविलें. बाबुरास हें आमंत्रण फारच अपूर्व वाटलें; कारण तो ज्या गोष्टीची आज कित्येक दिवस वाट पाहात होता, ती नेमकी त्याच्या-पुढें वाढून आली. त्यास अतिशय आनंद झाला. तो मोठ्या सैन्यासह या स्वारींत दाखल होण्यासाठीं काबूलहून निघाला आणि आठशें मैलांचें अंतर कापून हिरातला आला, तों सुलतान हुसेन दिवंगत झाला होता, पण त्याचा मुलगा मोठ्या सैन्यानिशीं मूर्घअब नदीच्या कांठीं होता.

शैबानीखानाचा आपण धुव्वा उडवूं; आपल्या आयुष्याला लागलेला अपयशाचा कलंक आपण धुवून काढूं; आपल्या वंशाची खांडोळीं उडविणारास कंठस्नान घालूं; आपल्या राज्याच्या ठिकऱ्या उडविणारास चांगला इंगा दाखवूं; मागें आपण त्याच्याशीं एकटेच लढलों, आतां आपणास जोडीदार आहेत, या उमेदीच्या विचारांनीं बाबुर त्या ठिकाणीं आला; पण येथें येतांच त्याची निराशा झाली. येथें सर्व वातावरण निराळें दिसलें. या हिरातच्या राज्यावर दोन राजे राज्य करीत होते. एक बादिअझ झमान हा सुलतान हुसेनचा थोरला मुलगा—हिरातचा युवराज म्हणजेच कायदेशीर वारस आणि दुसरा मुजफर हा त्याच्या आवडत्या रक्षेचा मुलगा. हे दोन राजपुत्र हिरातच्या राज्यावर जोड—राजे म्हणून राज्य करीत होते. तेव्हां त्यांच्या सैन्यांत व राज्यांत शिस्त काय दर्जाची असेल याची कल्पनाच केलेली बरी. तेथें त्वेषानें आणि पोटतिडकीनें शैबानीखानावर तुटून पडण्याचें वातावरण कोठेंच नव्हतें. तें सुलतान हुसेन मिर्झाच्याबरोबर त्याच्या कबरींत गेलें होतें. तेथें विलास आणि ऐषआराम दिसत होता. रोज नव्या नव्या मजा होत होत्या आणि मेजवान्या झडत होत्या.

## दारूचें दुरून दर्शन : : २६

मूर्घअब्र नदीच्या कांठावर सुलतान हुसेन अल्लीच्या लष्कराची छावणी होती, पण तेथें लष्करी थाट मात्र नव्हता. रोज निशाबाजीचे समारंभ चालू होते. बादीअझ झमानच्या विलासप्रसंगीं बाबुर दोन-तीन वेळां निमंत्रित राजपाहुणा म्हणून हजर होता. मुझफरनें त्याला दिलेल्या मेजवान्याही थाटदार होत्या. तो थाट कांहीं और होता.

तेरेबखाना या ठिकाणीं त्या दिवशींच्या खान्याची व्यवस्था होती. त्या राजवाड्याच्या उत्तरेकडील दिवाणखान्यांत हा खाना झाला. त्यावेळीं बाबर मुजफरचा मुख्य पाहुणा होता. त्याला उच्चासन देण्यांत आलें होतें. सर्व आपआपल्या ठिकाणीं स्थानापन्न झाल्यानंतर त्याच्या स्वागतार्थ मदिरेचे प्याले आले. ज्याच्या त्याच्या हातांत तें दिव्य पेय पडल्यानंतर त्यांनीं तें एका दमांत गटागट प्राशन केलें. दिव्य संजीवनीच आपण प्राशन करीत आहोंत असें त्यांस वाटत होतें. त्यांना नशा चढू लागली होती. मेंदूचा ताबा मदिरेनें घेण्यास प्रारंभ केला होता. रंग-भराई होत होती. त्या पानांत त्यानेंही सहभागी व्हावें, आणि त्यांच्याप्रमाणेंच विमानें उडवावींत असें त्यांच्या मनास वाटत होतें. त्यानें त्या वेळेपर्यंत दारूस स्पर्श केला नव्हता. त्यामुळें मदिरेची नशा ही काय चीज आहे याची त्याला कल्पनाही नव्हती. परंतु अशी एक सूक्ष्म पण तीव्रतर वासना निर्माण होई आणि असें वाटे कीं,

आपणसुद्धां या प्रांतांत स्वैरसंचार करावा आणि हा निर्बंध आपण तोडूं शकलों तर फार चांगलें. बालपणापासून मदिरेची आणि त्याची फारकतच होती, तेव्हां त्यापासून होणारा अनंद किंवा दुःख या दोहोंपैकीं कशाचीच कल्पना त्याला नव्हती. कधीं कधीं त्याचे वडील त्यास मदिरापानासाठीं आमंत्रण देत पण तें कांहीं तरी सबब सांगून तो टाळीत असे. त्यांच्या मृत्यूनंतर मौलाना खवाज काझी यांनीं मुद्दाम काळजीकांळ्यानें या बाबतींत त्याचें रक्षण केलें होतें. अभक्ष्य-भक्षण त्याला वर्ज्य होतें. ही झाली बालपणाची हकीगत. तरुणपणीं तारुण्याच्या उन्मादावस्थेंत आपणसुद्धां दारू पिऊन मजा मारावी असें त्याला फार वाटे, पण त्या वेळीं त्याची ही हृदयाची भूक जाणून ती पुरविणारा असा कोणीहि जिगर दोस्त त्याच्या मित्रमंडळांत नव्हता.

मदिरापानाची इच्छा त्यास होत होती, पण अजून तरी तो त्यापासून अलिप्त होता. बाबुराचें आयुष्य या ठिकाणीं मोठें आरामांत चाललें होतें. खुद्द हिरात शहरांत त्यानें मुझफर मिर्झाच्या सहवासांत वीस दिवसांचा पाहुणचार उपभोगिला. त्या वेळीं हिरातच्या तोडीचें शहर जगांत दुसरें नव्हतें आणि खरोखरीच त्याचे हे दिवस अत्यंत आनंदांत गेले. बाबुरची मेहुणी मासुमा या रूपसंपन्न युवतीचें बाबुरावर प्रेम होतें, आणि त्या दोघांनीं एकमेकांच्या सहवासांत या ठिकाणीं स्वर्गीय आनंदाचा उपभोग घेत घेत हे दिवस काढले. हिरात शहरांतील त्याचें वास्तव्य एकंदरीनें सुखाचें झालें; पण आपण आलों कशासाठीं आणि करतों काय हे विचार त्याच्या मनांत येतांच त्याची निराशा झाली.

शैबानीखानासारखा सामर्थ्यवान् शत्रु भोंवतालीं एखाद्या बहिरीससाण्याप्रमाणें घिरट्या घालीत असतां असली गहाळ आणि विलासी वागणूक म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूचें आव्हानच. तेथील ते शामियाने, गालीचे, गाद्यागिर्द्या, रुजामे आणि हमामखाने या सर्व गोष्टी शैबानीखानाचा पराभव करण्यास उपयोगी पडण्यासारख्या नव्हत्या. तेथें कडक शिस्त, शत्रूशीं दोन हात करण्याची धमक व शौर्य कोठेंच नव्हतें. आणि त्याची जारीनें तयारी करण्याचें कोणाच्याही मनांत नव्हतें. बाबुराची निराशा झाली आणि तो काबूलला परतला.

## खडतर प्रवास : : : २७

हिरातहून काबुलास माघारीं जातांना बाबुरास फार त्रास झाला. ते दिवस हिंवाळ्याचे होते. बर्फाचा वर्षाव एकसारखा होत होता आणि झोंबरें-वारें म्हणजे मी म्हणत होतें. बाबुर आणि त्याचें सैन्य असल्या खडतर परि-स्थितींत आपला मार्ग आक्रमीत होतें. बर्फाचा वर्षाव म्हणजे त्याला सीमाच नव्हती. बर्फ पडतां पडतां त्याची उंची इतकी वाढे कीं, घोड्याच्या रिकेबी-पर्यंत स्वार गाडला जाई. असें झालें म्हणजे हा स्वार गोगलगाईच्या वेगानें अंतर कापी. बरोबर वाटाडे होते, तेही रस्ता चुकले. त्याबरोबर ते भांबावले. त्यांना रस्ता सुधारेना तेव्हां त्या प्रांतांत हिंवाळ्यांत अचूक रस्ता दाखविणारे त्या पर्वतराजींतील कोणी रहिवासी भेटतात का म्हणून शोध करण्यासाठीं लोक धाडण्यांत आले. ते चार पांच दिवस भटकले पण निराश होऊन माघारीं आले तेव्हां मात्र त्यांची कंबरच खचली. नेहमींच्या मार्गानें गेलों असतों तर फार बरें झालें असतें असें त्यास वाटूं लागलें. हा रस्ता कडेपठारावरून होता, पण तो कमी लांबीचा असल्याकारणानें ह्या साहसी वीरांनीं हा जवळचा मार्ग पत्करला; पण हा द्राविडी प्राणायाम करण्यांतला प्रकार होणार होता. कारण कपाळमोक्ष होण्याची पाळी होती. बाबुराचें सैन्य त्या बर्फाच्छादित

पर्वतशिखरावरून बर्फाच्या राशी बाजूला करीत करीत व त्याचें ओझें अंगावर घेत घेत एकेक पाऊल मोठ्या कष्टानें टाकीत टाकीत आपला मार्ग आक्रमीत होतें. हा सर्व प्रवास अनुमानधपक्यानें चालला होता. आठ दिवसांत दोन-तीन मैलांचें अंतर कापलें जात होतें. आतां हें घोडदळ पायदळ झालें होतें, आणि हातांत घोडे घेऊन प्रवास चालू होता. घोड्याचा आणि आपला जीव बचावून अंतर कापावयाचें होतें. केव्हां गाड्यावर नाव तर केव्हां नावेवर गाडा असें हें रहाटगाडगें फिरत होतें. आपण पुढें पावलें टाकीत टाकीत जावें आणि नंतर घोड्यास खेंचावें आणि केव्हां घसरगुंडी होते असें वाटतांच घोड्याच्या लगामास धरून आपला बचाव करावा. अक्षरशः रांगत रांगत, फरपटत फरपटत त्यांनीं झिरिन घाटाच्या पायथ्याशीं कोहिलकोटी नांवाची एक गुहा गांठली. या ठिकाणीं ते पोंहचण्याचा अवकाश कीं फार मोठ्या वादळास सुरुवात झाली. बर्फ असें कांहीं विलक्षण तडाखे मारूं लागलें कीं, तें सहन होईनात. प्राणांतिक वेदना होऊं लागल्या आणि सर्वच्या सर्व मरून जातात कीं काय असें वाटूं लागलें. गुहेच्या दाराशीं ते गेले, पण बर्फानें तिचें तोंड बुजलें होतें व एकेकाच्या रांकेनेंच प्रवेश करणें शक्य होतें. गुहा दिसण्यांत लहान दिसत होती. तिचा तलाश चालू झाला. सर्व सेना गुहेशीं आली आणि रात्र पडूं लागली. रात्र काढण्यासाठीं म्हणून जो तो आसरा करूं लागला.

बाबुरानें कुदळीनें बर्फ फोडण्यास सुरुवात केली. तडातडा त्यानें गळ्या-पर्यंत खोदलें, पण त्यास जमीन लागली नाहीं. बर्फाचा थर फार जाड होता. मांडा ठोकून व्यवस्थितपणें रात्रभर बसतां येईल एवढा प्रशस्त खड्डा त्यानें खोदून त्यांत तो बसला, तेव्हां गुहेंत आसरा घ्या म्हणून त्यास विनंति करण्यांत आली पण ती त्यानें मान्य केली नाहीं. तो आपल्या ठिकाणीं स्तब्ध होता. सर्वांच्याबरोबर आपलें काय होईल तें होईल, या विचारानें तो इंचभरही तेथून हलला नाहीं. मित्रांच्या सहवासांत मृत्यु हासुद्धां मेजवानी-

सारखाच वाटतो. बाबुर त्या खड्ड्यांत बसला होता, बर्फ पडत होतें. त्याच्या डोक्यावर चार इंचांचा थर सांठला. थंडीनें अंगांतून वेट येऊं लागले. रात्र म्हणजे मी म्हणत होती. तोंच ' गुहेंत जागा मोप आहे, आंत या ' अशी आरोळी आली. त्याबरोबर ते सर्व लोक धडपडत जोरानें गुहेंत शिरले. तेथें मात्र त्यांस निवारा सांपडला. ती रात्र मोठ्या आनंदानें पार पडली. या दिवसानंतर वादळाचा व बर्फवृष्टीचा जोर कमी झाला. पुढील प्रवास सुखाचा झाला, पण असल्या प्राणघातक संकटांशीं तोंड देत देत बाबुरानें काबूल गांठलें.

उशिरां निघून वेळेवर दाखल व्हावें, त्याप्रमाणें बाबुर या वेळीं काबुलास आला. तो राजधानीच्या आसपास येतो तों त्यास एका कारस्थानाची कानगी लागली. आतां तो काबूलचा राजा नसून त्या ठिकाणीं दुसऱ्या राजाची स्थापना झाली होती आणि त्याचें नांव खान मिर्झा असें होतें. बाबुर हिरातला गेल्यावर त्याला तेथें कैद करण्यांत आलें असून आतां तो माघारीं येत नाहीं अशी गप्प उठली आणि पुढील कारस्थान उरकण्यांत आलें. खान मिर्झा हा काबूलच्या सिंहासनास अत्यंत लायक वारस निवडण्यांत आला होता. समरकंदच्या सुलतान महंमदाचा हा एकुलता एक मुलगा. त्याचा बाप म्हणजे बाबुराचा सख्खा चुलता आणि आई म्हणजे बाबुराची एका बाजूनें सख्खी चुलती आणि दुसऱ्या बाजूनें सावत्र मावशी. अशा तऱ्हेनें खान मिर्झा म्हणजे बाबुराची जागा भरून काढण्यास अत्यंत लायक वारस होता.

बाबुर काबूलहून नाहींसा होतांच हें राजकारण झपाट्यानें शिजलें. खान मिर्झाचे नातेवाईक काबुलांत होते. त्याची आजी म्हणजे बाबुराची सावत्र आजी, तिचें नांव शाह बेगम. ही जिवंत होती. पण बाबुराची आई व बाबुरासाठीं जिवाचें रान करणारी त्याची आजी इसान दौलत या दोघीही या वेळीं जिवंत नव्हत्या म्हणून हें राजकारण फोंफावलें व तडीस गेलें. नाहीं

तर मुळांतच कांटा निघाला असता. या राजकारणाचीं सूत्रें हलवणाऱ्या मुख्य व्यक्ति दोन. एक त्याची सावत्र आजी शाह बेगम व त्याचा मावसा महंमद हुसेन मिर्झा दुघलत. ह्या दोघांचें हें राजकारण म्हणजे विश्वासघाताची परिसीमाच होय. कारण हिरातला जातांना बाबुरानें आपला राज्यकारभार या मंडळीवर सोंपविला होता, आणि त्यांनींच असा दावा साधला. हें राजकारण तडीस नेण्यासाठीं काबूलच्या किल्ल्याला चोवीस दिवसपर्यंत वेढा पडला. बाबुराच्या राजनिष्ठ लोकांनीं त्याला चांगलेंच तोंड दिलें, पण इतक्यांत बाबुरच त्या ठिकाणीं दाखल झाल्यानें ह्या राजकारणाचें पेकाटच मोडलें.

बाबुर काबुलास दाखल होतांच या राजकारणाचा धागान् धागा मोकळा झाला. या वेळीं बाबुराची वागणूक फार उदात्त आणि धीर-गंभीर होती. त्याच्या उमद्या स्वभावाची शोभा त्याच्या ह्या वागणुकीनें आणखीच उठून दिसते. त्याला या राजकारणाची बित्तंबातमी लागली होती पण त्यानें आपल्या चेहऱ्यावर कोणत्याही तऱ्हेचा उद्वेग किंवा त्वेष दिसूं दिला नाहीं. त्याच्या चेहऱ्यावर पूर्वींचेंच समाधान व आनंद दिसत होता. अशा स्थितींत तो प्रथम आपल्या आजीस–शाह बेगमसाहेबास भेटावयास गेला. आणि ही भेट इतक्या प्रेमाची वठली कीं खरोखरीच नितान्त वात्सल्यानें एकुलत्या एक नातवंडानें आपल्या आजीस भेटावें, तिच्या प्रेमळ मांडीवर लोळण घ्यावी आणि पूर्ण समाधानानें गाढ झोंपी जावें. आणि खरोखरीच बाबुर आपल्या प्रवासाचा शीणभाग दूर व्हावा म्हणून शाह बेगमच्या मांडीवर किंचित्काळ झोंपलाही. पण इतक्यांत त्याची मावशी मिहर निगर खानिम्–खान मिर्झाची आई त्या ठिकाणीं आली. इतक्या लांबचा प्रवास करून सुखरूप परत आल्याबद्दल तिनें त्याचें अभिनंदन केलें आणि " तुझ्या घरची मंडळी तुझी वाट पाहात आहेत तरी आपल्या राजवाड्यांत त्वरेनें जा; आम्हीही पण तेथें येतों आणि त्या समारंभांत भाग घेतों " असें त्यास सांगितलें. मावशीच्या विनंतीस मान देऊन बाबुर आपल्या राजवाड्यांत गेला. तेथें तो पोहोंचतांच त्याच्या अमीर-उमरावांनीं आणि सरदारांनीं त्याचें स्वागत केलें. मोठा जयजयकार केला. खान मिर्झा व महंमद हुसेन मिर्झा या प्रकारानें जागच्या जागीं थिजून गेले आणि हें राजकारण पार विरलें, नाहींसें झालें !

या अगांतुक राजकारणाचा निचरा होऊन बाबुर काबुलास जरा स्थिरावतो तोंच त्याचें मन अस्थिर करणारी दुःखद वार्ता आली. हिरातला शैबानीखानाची चाल विजयी होऊन सुलतान हुसेनचा वंशवृक्ष छाटला गेला आणि तैमूर-वंशाचीं पाळेंमुळें खणलीं गेलीं. आतां त्याचें नांव दुनियेंतून नाहींसें झालें. शैबानीखानाची स्वारी म्हणजे त्या वेळच्या राजकीय आणि सामाजिक जगाची उलथा-पालथ करणारा तो एक झंजावात होता. त्यानें तैमूरचीं नांदतीं सिंहासनें गदगदां हलविलीं आणि ठोकरीनें उधळून दिलीं. चंगीजखान व तैमूर या दोन रक्तांचा संबंध असणारी आणि मानानें राजा म्हणून मुजरे घेणारी अशी एकच बारकीशी शाखा शिल्लक होती, ती म्हणजे बाबुर. तेव्हां तैमूरबद्दल आदर बाळगणारे आणि त्याचें राज्य पुन्हां संस्थापिलें जाऊन त्याचे वंशज त्याच्यावर नांदावेत असें ज्यांस वाटत होतें, ते सर्व लोक बाबुराभोंवतीं जमा झाले.

शैबानीखानाचें हें प्राणघातक सुदर्शन सर्वांच्याच मागें हात धुवून लागलें होतें, आणि त्यांत प्रत्येकास आपला कपाळमोक्ष दिसत होता. तेव्हां शत्रूंनीं सुद्धां कांहीं काल मित्रांचीं कातडीं पांघरलीं होतीं. काबूलचा राजा उलुघ-बेग वारल्यानंतर तेथील राज्य बळकावणारे कंदाहारचे मुकिम बेग आणि

उर्धुन मोंगल ह्यांनीं किंचित्काल वैर विसरून बाबुरास शैबानीखानाशीं तोंड देण्यासाठीं मुद्दाम बोलाविलें. कंदाहारचें हें आमंत्रण बाबुरास मोठें मानाचें वाटलें. कारण मुकीम आणि उर्धुन हे दोघे त्याचे प्रतिस्पर्धी आणि त्यांनीं आपणाजवळ क्षमेची याचना करावी यांत त्याला विशेष आनंद वाटत होता. तेव्हां पुन्हां काबुलाहून बाबुर या स्वारीसाठीं निघाला आणि कंदाहारला आला. तों तेथें त्याला निराळाच प्रकार आढळला. तेथें आपलें स्वागत आपला विघ्नहर्ता सहाय्यक म्हणून उत्तम प्रकारें होईल अशी त्याची कल्पना होती, पण तसें कांहींच झालें नाहीं. त्याच्याशीं ते कंदाहारी दोस्त बरोबरीच्या नात्यानें वागूं लागले आणि केव्हां केव्हां तर त्याचा अपमान होऊं लागला. पण असली वागणूक सहन करणाऱ्या मेल्या रक्ताचा बाबुर नव्हता. त्यानें त्यांस जाब विचारला आणि लढाईचें आव्हान दिलें. या वेळीं बाबुराचें सैन्य चांगल्याच तयारींत होतें. त्याचें वर्णन तो करतो:—

"या वेळीं माझें सैन्य दोन हजारांच्या सुमारांत होतें. ज्या वेळीं शत्रूशीं सामना देण्याचा प्रसंग आला त्या वेळीं ते हजार होतें. त्यांना उत्तम तऱ्हेनें शिकवून तयार केलें होतें. मीं माझ्या लष्कराच्या दहादहांच्या आणि पंधरा-पंधरांच्या तुकड्या केल्या होत्या. त्या प्रत्येक तुकडीवर एकेक अधिकारी नेमण्यांत आला होता. त्या तुकड्या मध्यबिंदूच्या डाव्या किंवा उजव्या बाजूला कोठें उभ्या करावयाच्या, त्यांनीं केव्हां आणि कशी चाल करावयाची आणि युद्ध संपेपर्यंत कोणत्या धोरणानें वागावयाचें या सर्व गोष्टी माझ्या गणनायकांना उत्तम प्रकारें माहीत होत्या. कोणत्याही प्रकारचा गोंधळ होऊं द्यावयाचा नाहीं वगैरे गोष्टी त्यांना उत्तम प्रकारें समजावून दिल्या होत्या. उजव्या आणि डाव्या बगलेच्या लोकांनीं घोड्यांवरून शत्रूवर चाल करावयाची."

कंदाहारचें युद्ध सुरू झालें तेव्हां बाबुराचें सैन्य छोटें असून सुद्धां त्यानें मात केली. युद्ध सुरू होतांच शिस्तीच्या अभावीं शत्रूचें सैन्य गोंधळलें पण

बाबुराचें लष्कर मात्र धिम्मेपणानें सर्व हालचाल करीत होतें. त्यांनीं शेवटीं शत्रूच्या सैन्याचा धुव्वा उडवला आणि उलुघ बंधू कंदाहार सोडून पळूं लागले. बाबुरानें कंदाहारचा ताबा घेतला, आणि तेथें नुकत्याच बदकशानहून माघारीं आलेल्या आपल्या धाकट्या भावाची स्थापना केली. त्याला या कंदाहारच्या स्वारींत पैसा मात्र खूप मिळाला. त्यानें सोन्या-चांदीनें लादलेले अनेक उंट संपत्ति आणिली. पण या स्वारींत पैशापलीकडे कांहींच फायदा झाला नाहीं, कारण हा काबुलास जाऊन एक आठवडा लोटतो न लोटतो तोंच कंदाहारचा ताबा शैबानीखानानें घेतल्याचें वृत्त आलें. त्याचा भाऊ नसीर कसाबसा जीव घेऊन पळाला.

## बादशहा : : : ३०

शैबानीखानाचा हा तडाखेबंद धूमधडाका पाहून बाबुर मनांत हादरला. तो सर्वांचा निःपात करीत करीत आतां शिल्लक राहिलेलें हें तैमूरचें शेवटचें ठिकाण काबूल सर करणार; त्याचा मोर्चा काबूलकडे वळणार अशी बातमी आली. त्याबरोबर बाबुरास भयंकर हादरा बसला. कारण शैबानीखानाचा निकाल लावावा असें त्यास वाटत होतें व त्यानें तशी धडपडही चालविली होती. त्याच्याशीं सामना देण्यासाठीं म्हणून जेव्हां जेव्हां आमंत्रण आलें तेव्हां तेव्हां तो मोठ्या हिरीरीनें त्या ठिकाणीं गेलाही, पण त्याची निराशाच होत होती. शैबानीखानास जेर करण्यासाठीं त्याला त्याच्या तोडीचा जोडीदार भेटला नाहीं. नाहींतर त्यानें ती तयारी मोठ्या हौसेनें केली असती. पण तसें झालें नाहीं. शैबानीखानाच्या लष्करी सामर्थ्याची, त्याच्या सेनापतित्वाची बाबुरास पूर्ण माहिती होती. रणांगणांत त्याचा हात धरणारा त्या वेळीं कोणी नव्हता हें तो जाणून होता. तेव्हां त्याच्याशीं तुटपुंज्या सामर्थ्यानें सामना देणें मूर्खपणाचें होतें. त्यांत सर्वस्वाचा घात हा ठेवलेला होता. तेव्हां काबूल लढविण्यांत अर्थ नाहीं असें त्यानें ठरविलें. काबूल शहर अब्दर रझाकच्या ताब्यांत दिलें आणि तेथून आपलें सैन्य घेऊन हिंदुस्थानचा रस्ता सुधारला.

हिंदुस्थानचा मार्ग आक्रमीत असतां त्याला अफगाणी टोळ्यांपासून अत्यंत त्रास झाला. हे लोक नंबर एकचे लुटारू, तेव्हां चोऱ्यामाऱ्यांचा त्याच्या सैन्यास फार उपद्रव होई. त्यांची हड्डी नरम करून त्यांच्यावर आपला वचक बसविणें हें काम अत्यंत जिकीरीचें होतें. तें करीत करीत बाबुर आपला मार्ग आक्रमीत होता. जलालाबादपर्यंत तो आला असेल नसेल तोंच बातमी आली कीं, शैबानीखानाशीं तह झाला असून तो माघारीं फिरला आहे व त्यापासून पुन्हां उपद्रव होण्याचा संभव नाहीं. ही बातमी येतांच बाबुरास हायसें वाटलें. मोठें प्राणसंकट टळलें असें झालें आणि तें खरेंही होतें. बाबुराचें हें करणें सकृत्‌दर्शनीं स्वार्थीपणाचें दिसतें, पण वास्तविक तें तसें नव्हतें. त्यानें आपल्या जिवाचा बचाव केला. शैबानीखानाची आणि बाबुराची गांठ होती तर त्यानें त्यास खासच ठिकाणावर ठेविलें नसतें, केव्हांच यमसदनाला पाठविलें असतें. तेव्हां त्यानें हा धूर्तपणाचा मार्ग पत्करला हें फार चांगलें झालें.

हिंदुस्थानावर जाण्याचा बेत तूर्त रहीत करून बाबुर माघारीं फिरला आणि पुन्हा काबुलास आला. त्यानें स्वतःस बादशहा हें उपपद लावून घेतलें. हें नांव धारण करण्यांत बाबुराची महत्त्वाकांक्षा चांगलीच प्रतीत होते. कारण आजपर्यंत कोणींहि हें अभिधान आपणास लावून घेतलें नव्हतें. बाबुर काबुलास येतांच त्यानें राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. तीं त्यास कोणत्याही तऱ्हेचा झगडा न होतां मिळालीं, ही गोष्ट मात्र खरोखरी विचित्र झाली. कारण अब्दर रझाक हा उलुघ बेगचा मुलगा, काबूलच्या सिंहासनाचा हक्कदार वारस व कांहीं दिवस त्या राज्यावर राजा म्हणून नांदलेला; तेव्हां त्यास ही संधि म्हणजे बेमालूम होती. वडिलार्जित राज्य बाबुरानें केवळ स्वतःचा जीव बचावण्यासाठीं त्याच्या स्वाधीन केलें होतें व तो परागंदा झाला होता. तो माघारीं येतो काय, राज्याची मागणी करतो काय व अब्दर रझाक कोणत्याही प्रकारची खळबळ न करतां तें त्याच्या स्वाधीन करतो काय हा सर्वच प्रकार मोठा गमतीचा वाटतो.

अबदर रझाकनें काबूलचें राज्य बाबुरच्या स्वाधीन बिनबोभाट केलें; पण नंतर कांहीं दिवसांनीं त्याच्याविरुद्ध एक मोठें बंड झालें. बाबुराच्या शिस्तीचा आणि न्यायी वागणुकीचा त्या रानटी व मस्त लोकांना कंटाळा आला होता. त्यांना मनगटाचें राज्य असावें व ज्याला जसें वाटतें तसें त्याला करण्याची मुभा असावी, ही कायद्याची आणि शिस्तीची दुरदुर कामाची नाहीं असें वाटत होतें. तेव्हां बाबुरास उखाड देण्यासाठीं अदमासें तीन हजार मोगल सैनिकांनीं बंड केलें आणि त्यांनीं अबदर रझाकला आपला राजा म्हणून घोषित करून धामधूम चालविली. तेव्हां बाबुरास फार त्रास झाला. त्याचें सामर्थ्य त्या मानानें कमी होतें. चार-पांच चकमकी झाल्या आणि शेवटीं बऱ्याच धकाधकीनंतर हें बंड थंड झालें. अबदर रझाक याचा त्या बंडाशीं नांवापलीकडे फारसा संबंध नसल्याकारणानें त्याला फारसा त्रास झाला नाहीं. बाबुर या वावटळींतून पार पडला आणि शांतता प्रस्थापित झाली.

## पुन्हां एकदां समरकंद : : ३१

बाबुर आणि स्वास्थ्य या दोन गोष्टी एके ठिकाणीं नांदणेंच शक्य नव्हतें कीं काय कोण जाणे. विधिलिखित तसें नव्हतें. बाबुर आतां जरा स्वस्थतेनें राहात होता. दिवसामागून दिवस जात होते, तोंच इ. स. १५१० च्या हिंवाळ्यांत एक दिवस खान मिर्झाचें पत्र घेऊन एक जासूद आला. त्यानें मोठी आनंदाची बातमी आणली होती. बाबुराचा कर्दनकाळ, बेग लोकांचा हाडवैरी आणि तैमूर वंशाचा मुळापासून छेद करूं पाहणारा राक्षस शैबानी-खान दुनियेपार झाला होता. त्याचा मृत्यु असा तसा झाला नव्हता तर मर्वी या गांवाच्या शेजारीं झालेल्या संग्रामांत मृत स्वारांच्या ढिगाऱ्याखालीं गुदमरून तो मेला होता. त्याचें डोकें कापण्यांत आलें होतें. त्याची कवटी सोन्यांत मढवून त्याचा पेला शाह इस्माइल हा रोज पाणी पिण्यासाठीं वापरीत होता. जगांत शेरास सव्वा शेर असतो. बाबुरासारख्या पराक्रमी माणसास रणांगणांतून पळ काढावयास लावणाऱ्या शैबानीखानाचा निकाल लावणारा भेटला. त्याचें नांव शाह इस्माइल. त्यानें पर्शियाचें राज्य जिंकिलें होतें आणि तेथें तो राज्य करीत होता. त्यानें शैबानीखानास आणि त्याच्या उझबेग लोकांस असा कांहीं जबरदस्त तडाखा दिला कीं, ते खुरासानहून अमूला व अमूहून कुंदुझला पळत सुटले. त्यांचें सामर्थ्य आतां इतकें

खिळखिळें झालें होतें कीं, फक्त एकच तडाखा मिळाला कीं तें कोसळणार होतें व या कार्यासाठींच बाबुरास आमंत्रण आलें होतें. ह्या आमंत्रणानें बाबुरास आनंदानें स्वर्ग ठेंगणा वाटूं लागला आणि त्यानें या स्वारीवर जाण्याचें ठरविलें. पण ही वेळ अशी भयंकर होती कीं, स्वारीवर जातांनाच मोक्ष व्हावयाचा. हिंवाळ्याची बर्फवृष्टि चालू होती. सर्व मार्ग बर्फानें ओतप्रोत भरले होते. तेव्हां या दिव्यांतून सैन्य नेणें म्हणजे कोणत्या प्रकारच्या यमयातना होत्या त्या बाबुरानें एकदां अनुभवल्या होत्या. तो शूर होता. पराक्रमी होता. मृत्यूशीं खेळ खेळणें ही त्याची करमणूक होती. पण विनाफायदा दानावारीं मरून जाण्याची मात्र त्याची तयारी नव्हती. आतां त्यास यशाची आशा दिसत होती म्हणून तो हिंवाळी हवेचें साहस पत्करून या स्वारीवर निघाला.

शैबानीखानाच्या लष्करी सामर्थ्याची बाबुरास योग्य कल्पना होती तेव्हां घाईघाईनें त्याच्याशीं गांठ घालून धोका पत्करण्यास तो तयार नव्हता. शैबानी-खान आतां जिवंत नव्हता, पण त्याच्या खास तालमींत तयार झालेले सेनानी या स्वारींत होते. त्यांच्या हालचाली चालू होत्या. जो तो लढाई देण्यासाठीं योग्य असें ठिकाण शोधीत होता. इस्माइल शहानें धाडलेलें तुर्क लष्कर बाबुरला सामील झालें नव्हतें व एकट्यानें उझबेग लोकांशीं गांठ घालण्यास तो कचरत होता. शत्रूचें सामर्थ्य अचाट होतें. हो–ना करतां करतां शत्रूला झुकांड्या देत देत बाबुर झपाट्यानें निघाला व त्यानें अबदरा नांवाच्या पर्वतावरील घाटांत चांगली जागा गांठून मोर्चे लावले व तो शत्रूची वाट पहात राहिला. इ. स. १५११ च्या प्रारंभास केव्हां तरी ही लढाई झाली. एक दिवस मध्यरात्रीस अशी आवई उठली कीं, शत्रु आला आणि पाहतात तों शत्रु खरोखरच येत होता. रात्रभर सर्व सेना सामना देण्याची तयारी करीत होती. सूर्योदयाबरोबर टेहळ्यांनीं बातमी आणली कीं, शत्रु तयार आहे. दोन्ही लष्करांत एक मोठी दरी होती, तेव्हां शत्रूशीं गांठ घालावयाची

म्हणजे ती दरी ओलांडून येणें प्राप्त होतें. बाबूर हिरातला गेला असतांना काबूलचें राज्य पटकावूं पहाणाऱ्या खान मिर्झास या स्वारींत मोठें मानाचें स्थान देण्यांत आलें होतें. शत्रूकडील जवळ जवळ एक हजार उझबेग लोकांची रांग सामना देण्यासाठीं दरड चढून वर येऊं लागली. त्याबरोबर खान मिर्झा त्या तुकडीवर चालून गेला. पण उझबेग लोकांनीं त्याची दशा केली. या चकमकींत तो कामासच यावयाचा पण ऐनवेळीं मदत आली म्हणून तो बचावला. या लढाईत बाबुरानें दुसरा एक महत्त्वाचा मनुष्य बरोबर घेतला होता. तो म्हणजे हैदर. हा बाबुराचा मावसभाऊ आणि काबुली कारस्थानांतील त्याचा मावसा महंमद हुसेन मिर्झा दुघलत याचा मुलगा. हैदर या वेळीं वयानें लहान होता, पण त्यानें बरोबर येण्याचा हट्ट धरला म्हणून त्याला बाबुरानें बरोबर घेतले होतें. तो होता म्हणून त्याच्या पठडींतील पुष्कळसे लोक या स्वारींत होते.

या वेळीं हैदर बाबुराच्या शेजारीं होता आणि युद्धाचें अवलोकन करीत होता. त्याच्या अंगांत युद्धाचें अवसान भरत होतें. पण ' बच्चा, तूं लहान आहेस ' असें सांगून बाबुर त्यास आवरून धरीत होता. पण त्याच्या लोकांनीं मात्र कमाल चालविली होती. खान मिर्झाच्या लोकांना त्याची मदत फार झाली. ह्या लोकांनीं शत्रूचा खुर्दा केला. हे लोक बादशहाच्या आसपास फळी संभाळून होते आणि शत्रूवर तुटून पडून त्याला मागें रेटीत होते. या हल्ल्यांत प्रथम याच लोकांनीं शत्रूकडील कैदी आणला. त्याबरोबर बाबुर बादशहास अत्यानंद झाला व ह्या विजयानें हैदरचें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहावें लागेल असें तो ओरडला. दिवस बुडूं लागला होता आणि अंधःकार समीप ठेपला होता. युद्ध अशा तऱ्हेनें चालूं होतें. अंधःकार गडद होऊं लागतांच गडबड उडाली. उतरंडीवरून आपल्या निवासस्थानीं जाण्यासाठीं शत्रु मागें सरूं लागला. त्याबरोबर बाबुरच्या लोकांनीं तडाखेबंद रट्टे मारण्यास सुरुवात केली. जोराची कचाकची झाली, त्यासरशीं शत्रूनें कच खाल्ली. त्याचे पुष्कळ सेनापति पाडाव झाले, पुष्कळ लूट मिळाली. दिवसाबरोबर बाबुरचा शत्रूही बुडाला.

खर्शी, बुखारा आणि समरकंद या तिन्ही ठिकाणांहून शत्रु पळत सुटला आणि बाबुराच्या सैन्यानें त्याचा पिच्छा पुरवून उझबेग लोकांस पार हुसकावून दिलें.

समरकंद म्हटल्याबरोबर बाबुर बादशहाच्या सुप्त आकांक्षा दरदरून जाग्या होत. तो, तैमूर, त्याचें साम्राज्य आणि त्या साम्राज्याचा मी सम्राट् अशी त्या विचारांची परिणति होई. समरकंद हातीं येतांच शहाच्या अनुमतीनें त्यानें समरकंदच्या तख्तावर स्वतःस तिसऱ्यांदा राज्याभिषेक करून घेतला.

समरकंदनें असला अपूर्व समारंभ पूर्वीं केव्हांच पाहिला नव्हता. या वेळीं सगळीकडे लखलखाट उडाला होता. ध्वजा-तोरणांनीं सर्व रस्ते शृंगारण्यांत आले होते. बाबुराचा राज्यारोहण-समारंभ एवढा थाटाचा झाला कीं, गेल्या कित्येक शतकांत असा समारंभ झाला नाहीं असें लोक म्हणत होते. ह्या वेळीं बाबुराचें वैभव शिगेला पोचलें होतें. इ. स. १५११ ला बाबुराचा राज्यविस्तार फार मोठा होता. ताशकंद, सैराम प्रांतापासून तारतरी प्रदेशा-पर्यंत तसेंच काबूल, गझनी, हिंदुस्थानची सरहद्द, समरकंद, बुखारा, हिसार, कुनदुश, फर्घाना एवढ्या मोठ्या प्रांतावर बाबुराचें राज्य अप्रतिहतपणें चालू होतें. या वेळीं बाबुराच्या मनांतील हिंदुस्थानाविषयींचे विचार पार मावळून गेले होते. त्यानें तैमूरच्या सिंहासनावर सुखानें राज्य करण्याचें ठरविलें होतें. बाबुरास कृतकृत्य झालेंसें वाटत होतें. गडी खुषींत होता.

## सिंहासनावरून उचलबांगडी : ३२

बाबुर वैभवागिरीच्या गगनचुंबित शिखराला पोंचला होता. तो बादशहा झाला होता आणि आपण वैभवाचा उच्च बिंदु गांठला असें त्यास स्वतःपुरतें तरी वाटत होतें. पण हा काळ फार वेळ टिकला नाहीं. ती दुपारचीच सावली ठरली. तो पुन्हां एकदां भाग्याच्या उत्तुंग शिखरावरून अधःपाताच्या खोल गर्तेत फेकला गेला. ही आपत्ति त्यानें आपल्या हातानें ओढून घेतली होती. बाबुरास सध्यां प्राप्त झालेलें ऐश्वर्य पूर्णपणें स्वतंत्र नव्हतें. त्यांत थोडें वैगुण्य होतें. तें म्हणजे तो समरकंदला राज्य करीत होता तो पर्शियाच्या इस्माइल-शहाचा प्रतिनिधि म्हणून. येथपर्यंतही फारसें बिघडलें नव्हतें. पण याच्यापुढें त्यानें समरकंदचा राजा या नात्यानें फार मोठी चूक केली. ती म्हणजे त्यानें आपला धर्मपंथ बदलला. तो शिया झाला. कारण शहा हा शिया पंथाचा होता. बाबुरसारख्या उदारधी माणसास त्यांत फारसें वावगें वाटलें नाहीं; पण हें करण्यांत त्याच्या हातून पर्वताएवढी चूक झाली. या पापानें खणलेल्या खड्ड्यांतच त्याचें राजेपण गाडलें गेलें.

मुसलमानांची धर्मवृत्ति अत्यंत प्रखर आहे. तिला तोड आज विसाव्या शतकांतही सांपडावयाची नाहीं. शिया आणि सुनी या दोन धर्ममतांचा उभा दावा. एकमेक एकमेकांना पाण्यांत पहातात. समरकंद, बुखारा वगैरे

ठिकाणची प्रजा सुनी पंथाची होती. बाबुरानें स्वत:च्या धर्मपंथांत केलेला हा बदल त्या लोकांच्या डोळयांत सलूं लागला. बाबुरानें या शिया पंथाचीं राज-चिन्हें धारण करण्यास सुरुवात केली. शिरस्त्राण त्या पद्धतीचें तो घालूं लागला. इतकेंच काय पण त्यानें नाणेंसुद्धां तसें सुरू केलें. त्या नाण्यावर इस्माइल शहाचें नांव वर खोदून त्याला गौरवाचें स्थान देण्यांत आलें होतें. त्याच्याखालीं बाबुराचें नांव कोरण्यांत आलें होतें. तें नाणें रोज बाजारांत वापरलें जाई. प्रतिक्षणाला तें या हातांतून त्या हातांत जाई, तेव्हां हा फरक झाकून न राहतां त्या नाण्यांच्या छन्‌छनाटाबरोबर छनाने आणि तुमचा राजा शिया आहे, तो काफीर आहे, असा त्या नाण्यांचा छन्‌छनाट पुन्हा पुन्हा बजावी, तेव्हां लोकांचीं मनें जागृत होऊन त्यांचा बादशहाविषयींचा तिटकारा वाढे, त्याच्याबद्दलची पोटतिडीक निर्माण होई. इतकेंच नव्हे तर बाबुरानें शिया पंथ काजींच्यावर लादण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्यास त्यांच्याकडून जोराचा प्रतिकार झाला. त्याबरोबर त्या काजींस फांसावर चढावें लागलें. त्यांचीं डोकीं धडावेगळीं होऊं लगलीं. हें प्रकरण इतक्या घाईला आल्याबरोबर बाबुरची सुनी प्रजा त्याच्यावर उलटली. त्यांना बाबुरची ही करणी पाठींत खंजीर भोंसकल्याप्रमाणें विश्वासघाताची वाटली. त्यांना बाबुरापेक्षां शैबानीखान बरा वाटूं लागला. कारण तो उघड उघड शत्रु होता आणि त्याची वागणूकही त्या थाटाची होती. तो शत्रु म्हणून बेधडक डोकीं मारीत होता. पण हा मुँहमें नाम और बगलमें छुरी असला विश्वासघातकी शत्रु नको असें त्यांच्या मनानें घेतलें आणि त्याची सर्व सुनी प्रजा त्याच्यावर उलटली.

या असंतोषाचा पारा चढतां चढतां इतका चढला कीं, शेवटीं कुलमलीक या ठिकाणीं ३००० उझबेग लोकांनीं त्याच्या ४०००० सैन्याचा धुव्वा उडविला. कोठें चाळीस हजार आणि कोठें तीन हजार ! पण तें सैन्य नव्हतेंच, इतका

फितूर त्या सैन्यांत माजला होता. समरकंदला सलाम ठोकून बाबुरास पळून जावें लागलें. शहाचें साठ हजार सैन्य बाबुराच्या मदतीस आलें. त्यांनीं क्रौर्याचे किळसवाणे प्रकार चालविले. शेवटीं इ. स. १५१२ च्या नोव्हेंबरमध्यें धज दिवाण या ठिकाणीं जोराची लढाई झाली. त्या वेळीं कोनाकोपऱ्याचा फायदा घेऊन सुनी नागरिकांनीं बाणांची अशी प्रचंड वृष्टि केली कीं, शहाचें एवढें मोठें सैन्य पण त्याचा धुव्वा उडाला. बाबुराचें राज्य संपलें आणि पुन्हां त्याची पुढील धडपड सुरू झाली.

बाबुराच्या आयुष्याचे हे चढ-उतार पाहिले कीं मोठा अचंबा वाटतो. त्याच्या आयुष्यांतील हा परिस्थितीचा लंबक या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एकसारखा हेलकावे खात होता. बाबुरच्या आयुष्याचें घड्याळ आपले कांटे फिरवीत होतें. हें घड्याळ फार मोठें होतें. भाग्यभानूनें माध्यान्ह गांठली म्हणजे त्याचे ठोके एवढ्या जोरानें पडत कीं, त्याच्या आवाजानें बाबुराचे मित्र आनंदानें डोलत व शत्रूंचीं अंतःकरणें हबके खात; पण लगेच बारानंतर पुन्हा सामसूम आणि त्याची किटकिट पुन्हां चालू होई.

बाबुरास समरकंदच्या सिंहासनावरून त्याच्या सुनी प्रजेनें फेंकून दिलें, पण ही राज्यक्रांति प्रजेलासुद्धां भयंकर जाणवली. प्रांतचे प्रांत बेचिराख झाले. खाण्याला अन्न भेटेना का प्यायला पाणी मिळेना. पोटाची आग इतकी भडकली कीं, ती शमविण्यासाठीं जित्यानें मेल्यास खावें आणि मेल्याशेजारीं सताड पाय पसरून स्वर्गाची वाट धरावी. महामारीचा झपाटा तर असा उठला कीं, तिच्या भक्ष्यस्थानीं असंख्य माणसें पडलीं. हिंवाळ्यालाही आतांच फावलें आणि बर्फवृष्टि अशी झाली कीं, सपाट भूमीचीं टेकाडें आणि टेकाडांची सपाट भूमि झाली. अस्मानी आणि सुलतानीचा तडाखा असा जोडीनें चालू होता कीं त्याला तोड नव्हती.

काबूल घेतल्यापासून म्हणजे इ. स. १५०४ पासून बाबुराच्या मनांत हिंदुस्थानविषयीं विचार चालू होते; पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी या नाहीं त्या कारणांनीं लांबणीवर पडत होती. केव्हां कांहीं तरी राजकारणच निर्माण व्हावें, केव्हां त्याच्या अमीरांना हा विचारच आवडूं नये तर केव्हां त्याच्या नातेवाइकांनींच मोडता घालावा, असें चाललें होतें. पण बाबुराची दृष्टि मात्र हिंदुस्थानावरून केव्हांच ढळली नव्हती. तो एकेक पाऊल हिंदुस्थानाकडे टाकीत होता. इ. स. १५०४ मध्यें पेशावरच्या बाजूनें खैबर घाटांतून तो कोहाटपर्यंत आला. त्याला या वेळीं लूट पुष्कळच मिळाली. इ स. १५०७ मध्यें तो जलालाबादपर्यंत आला. इ. स. १५१४ ते १५१९ बाबुरास उत्तम प्रकारचा अनुभव मिळाला. त्यानें शहा इस्माइलच्या तोफखान्याचा पराक्रम स्वतः अनुभवला. त्यानें उस्ताद अल्लीला आपल्या पदरीं ठेऊन त्याच्या देखरेखीखालीं स्वतःसाठीं फिरंगी जातीच्या तोफांचा तोफखाना तयार केला, आणि त्याच्यावर उस्ताद अल्लीची नेमणूक केली. शिया व सुनी या धर्मपंथांच्या धांदलींत त्याचें समरकंदचें सिंहासन गेलें. पण भारतवर्षांतील गौरवपूर्ण व वैभवशाली हस्तिनापूरचें तख्त या तोफखान्यानें त्यास हस्तगत करून दिलें. इ. स. १५२० ते १५२५ च्या दरम्यान मुस्तफा नांवाचा दुसरा एक गोलंदाज बाबुरास मिळाला. अशा तऱ्हेनें बाबुराचें लष्करी सामर्थ्य बिनतोड झालें.

बाबुरानंतर शंभर वर्षांनीं मराठ्यांना स्वराज्य संस्थापन करून देण्याऱ्या शककर्त्या शिवाजीची भवानी तलवार त्यांच्याच देखरेखीखालीं तयार झाल्याचें वाचावयास मिळालें असतें तर आमचा आनंद गगनांत मावला नसता, पण बाबुराच्या बाबतींत तसें वाचावयास मिळतें हा त्याचा विशेष आहे. हिंदुस्थानच्या रणभूमीवर अचाट पराक्रम गाजविणाऱ्या फिरंगी नांवाच्या तोफांचें ओतकाम केव्हां केव्हां बाबुराच्या समक्ष उस्ताद अल्लीच्या देखरेखीखालीं चाले. इ. स. १५२६ च्या नोव्हेंबरमध्यें एक तोफ ओतली, त्या

वेळीं बाबुर स्वतः त्या ठिकाणीं हजर होता. तोफेचा साचा दाबून तयार झाला होता. त्याच्या भोंवतालीं लोखंडाचा रस तयार करणाऱ्या आठ भट्टया होत्या. त्या भट्टयांपासून तप्त लोहरस नीट वाहात जावा म्हणून बारकाल्या सुबक वाटा करण्यांत आल्या होत्या. बाबुर त्या ठिकाणीं येतांच तप्त लोहरसाचे मार्ग खुले करण्यांत आले. त्याबरोबर रस व्यवस्थितपणें खाचांत जाऊं लागला. कांहीं वेळानें रस येण्याचें थांबलें, पण सांचा पुरा भरला गेला नाहीं. तेव्हां उस्ताद अल्लीचें माथें भडकलें. काय करावें हेंच त्याला सुचेना. थोड्या नजरचुकीनें ही गोष्ट झाली, पण ती त्याच्या मनाला फारच झोंबली. तो त्या तप्त रसांत उडी घेऊं लागला, पण त्याला आवरण्यांत आलें. त्याचा सन्मान करून त्याची समजी केली व तो शांत झाला. नंतर दोन दिवसांनीं रस निवाल्यावर सांचा उघडून पाहतात तों तोफेचा एक भाग—जेथून गोळ बाहेर पडतो तो—उत्तम प्रकारें कोठेंही सोस न येतां ओतला गेला होता. ही बातमी उस्ताद अल्लीनें बाबुरास मोठ्या आनंदानें पाठविली व असेंही कळविलें कीं, ज्या भागांत दारू ठांसली जाते तो दुसरा भाग तयार करणें फार सोपें आहे. ह्या अपुऱ्या रसामुळें तोफेचा एकच भाग ओतला गेला. जरा त्रास झाला हें खरें पण या वेळीं असा नवा शोध लागला कीं, तोफा दोन भागांतच चांगल्या प्रकारें ओतल्या जातात. यानंतर पुढें तोफा दोन भागांत करूं लागले.

आतां ही दोन भागांत तयार झालेली तोफ प्रत्यक्ष उडवून पाहण्यांत आली. बाबुर त्या ठिकाणीं गेला त्या वेळीं संध्याकाळच्या प्रार्थनेचा समय होता. तेव्हां त्या नव्या तोफेस बत्ती देण्यांत आली. तोफ धडाडली पण तिनें सोळाशें पावलांचा रेटा खाल्ला. त्या वेळीं तोफेस फारच अपूर्वता होती. हा उस्ताद अल्ली चांगलाच गोलंदाज होता. दिवसांतून सोळा बार काढणें त्या वेळीं मोठ्या आश्चर्याचें होतें.

बाबुराच्या जवळ तोफखाना हें फार मोठें प्रभावशाली आयुध होतें आणि आतां त्यानें आपला मोर्चा हिंदुस्थानकडे वळविला होता.

हिंदुस्थानकडे निघालेल्या बाबुराच्या सैन्याची धाड प्रथम बाजउर नांवाच्या किल्ल्यावर पडली. बिचारे बाजउर लोक अत्यंत रानटी होते. ते इस्लामी धर्माचेही नव्हते. ते धनुष्य-बाणांच्या युद्धांत तरबेज होते. त्यांना तोफखाना आणि तोफा ही काय चीज आहे हें सुद्धां माहीत नव्हतें. त्यामुळें बाबुराच्या तोफखान्यानें त्यांचा धुव्वा उडविला. त्यांचीं मुलें-माणसें कैद करण्यांत आलीं, आणि ३००० बाजउर लोकांची कत्तल करण्यांत आली. सुन्नी पंथ सोडून शिया पंथ धारण करणाऱ्या बाबुरास विधर्मीय बाजउर लोकांच्या कत्तली करून धार्मिक समाधान वाटत होतें. त्याच्या रक्तांतील मोगली क्रूरता आतां प्रगट झाली होती. बाबुरच्या तोफखान्यानें बाजउर लोकांचा दोन-तीन तासांत धुव्वा उडविला. त्यानें तयार केलेल्या त्याच्या तोफखान्याचें अचाट सामर्थ्य त्यास या ठिकाणीं प्रथम प्रतीत झालें.

या वेळीं बाबुरास दारूच्या व्यसनानें चांगलेंच पछाडलें होतें. चिक्कार दारू पिऊन झिंगून जाण्यांत त्याला फार आनंद होत होता. दारूच्या जोडीला तो भांगही घेत असे. या मैफली अनेक वेळां चालत. एकदां ही मंडळी सहल करावयास गेली असतां तेथें त्यांनीं मदिरापानाचा विक्रम गाजविला. दुपार-पासून मदिरापानास सुरुवात झाली. तो तडाखा एकसारखा चालू होता

प्याल्यामागून प्याले घशाखालीं गटागट जात होते. क्षणाक्षणाला नशा चढत होती. आपण कोठें आहोंत, काय करीत आहोंत याची शुद्ध नव्हती. संध्याकाळ झाली, निजण्याचा समय झाला, मध्यरात्र टळली, उत्तर रात्रीस सुरवात झाली, पहाटेचा समय झाला, तरी नरड्यांत दारू ठांसण्याचा कार्यक्रम चालू होता. कांहीं 'दारू चढली नाहीं' म्हणून तर कांहीं 'दारू फार चढली' म्हणून प्याल्यामागून प्याले ढोशीत होते. वेडीविद्री बडबड आणि आरडा-ओरडा चालू होता. बाबुराच्या या कैफबाज मंडळाचा असा एक विशेष होता कीं, या कैफबाजांत दोन भाग होते. एक दारू पिणारांचा व दुसरा भांग पिणारांचा. दारू पिणारांचें भांग पिणाऱ्यांशीं जमत नसे, तर भांग पिणारे दारू पिणारांस नांवें ठेवीत. पण बाबुर सम्राट् होता व त्याच्या ठिकाणीं या दोन्ही बाजींचा समसमान संयोग झाला होता. आकंठ मदिराप्राशनानंतर हें बेशुद्ध स्थितींतील मदिरामंडळ घोड्यावर स्वार होऊन आपल्या तळाकडे निघालें. जो तो पिऊन लास झाला होता. क्षणांत डावीकडे रेल तर क्षणांत उजवीकडे रेल; अशा स्थितींत हे स्वार डकाव डकाव करीत चालले होते. मदिरामंडळाच्या या स्वारीला आग्यावेताळाच्या स्वारीचें रूप जवळ जवळ आलें होतें. फक्त एकाच गोष्टीची कमतरता होती. त्यांच्या हातांत पेटलेले पलिते नव्हते. पण इतक्यांत टूम निघाली कीं, प्रत्येकानें हातांत चुडे घ्यावेत. कल्पना निघावयाचाच अवकाश कीं त्याची अंमलबजावणी व्हावयाचीच. प्रत्येकानें आपल्या हातांत पेटलेले चुडे घेतले आणि 'हैदोस धुल्ला' करीत तें मंडळ आपली वाट चालूं लागलें. सर्व अत्याचार, आनाचार पुरे झाल्या-नंतर थकल्या भागल्या स्थितींत थंड होत होत ते आपल्या निवासस्थानीं दाखल झाले व झोंपी गेले. या वेळीं बाबुरास नशा बेसुमार चढली होती. दुसरे दिवशीं या गोष्टी लोक मोठ्या खुलावटीनें सांगूं लागले, पण बाबुरास त्याचें कांहींही स्मरण नव्हतें.

दारूला स्पर्शसुद्धां न करणारा हा गृहस्थ त्या व्यसनांत इतका डुंबून गेला, हें जसें खरें तसेंच हें व्यसन सोडण्याचें त्याच्या मनांत येतांच त्यानें तें

तितक्याच कृतनिश्चयानें सोडलेंही. मदिरापान त्यानें सोडलें पण भांगेची नशा तो करीत असे. तें व्यसन त्यास शेवटपर्यंत सुटलें नाहीं. दारू त्यानें सोडली पण दारूनें त्याला सोडलें नाहीं. तिची आठवण त्यास अनेक वेळां होई. कित्येक वेळां ही इच्छा इतकी असह्य होई कीं, तो ढसढसां रडे; पण त्यानें केलेला कृतनिश्चय इतका दांडगा होता कीं, तो त्यापासून मरेपर्यंत ढळला नाहीं. या एका गोष्टींतसुद्धां बाबुराचें असामान्यत्व दृष्टीस पडतें.

## पानिपत : : : ३५

हिंदुस्थानांत येऊन पानिपतावर आपल्या अतुल पराक्रमानें इब्राहिम-खानाला खडे चारून दिल्लीचें तख्त काबीज करणारा बाबुर काबूलहून निघाला आणि दिल्लीचा दिल्लीपति झाला असें मात्र नव्हतें. ही घटना अघटितपणें घडली असें नव्हे. तो येत येत आला. इ. स. १५१९ मध्यें त्यानें बाजउर लोकांच्यावर चाल केली आणि त्यांचा अजिंक्य किल्ला दोन-तीन तासांत आपल्या तोफखान्याच्या सहाय्यानें हां हां म्हणतां घेतला. त्या लोकांची सरसहा कत्तल केली. या वेळीं त्यानें कमालीची क्रूरता दाखविली; पण नंतर मात्र त्यानें आपल्या निष्ठुरतेस पायबंद घातला. त्याचें मुख्य कारण म्हणजे त्याला हिंदुस्थानाविषयीं आपलेपणा वाटे. त्याची अशी महत्त्वाकांक्षा असे कीं, " आपण हिंदुस्थानचे राजे होणार आणि तेही ज्या प्रांतांवर तैमूरनें आपलें राज्य संस्थापिलें होतें तेथें. त्या प्रांतांतील प्रजा ती तैमूरची प्रजा आणि तैमूर माझा कुलपुरुष, तेव्हां तैमूरचे प्रजाजन ते माझेही प्रजाजन तेव्हां त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होईल अशी दक्षता मीं घेतली पाहिजे " आणि खरोखरीच त्यानें तशी काळजी घेतलीही.

' मी तैमूरचा हक्कदार वारस असल्याकारणानें त्यानें आपल्या ताब्यांत घेतलेले प्रांत बिनशर्त माझ्या ताब्यांत देण्यांत यावेत ' अशा मागणीचा एक

खलिता देऊन मुल्ला मुरशिद नांवाचा एक वकील त्यानें सुलतान इब्राहिमखानाच्या दरबारीं धाडला. तसेंच पंजाबचा सुभेदार दौलतखान यालासुद्धां पत्रें देण्यांत आलीं. बाबुराचा वकील गेला आणि आला. त्याचा मुक्काम लाहोरला झाला. तेथें त्यानें जवळजवळ सहा महिने काढिले, पण दौलतखान म्हणजे दौलतखानच होता. बाबुराचा वकील आला पण दौलतखान आपल्या सुभेदारीच्या मदांत धुंद. लाहोरसारख्या ठिकाणीं हा बाहेरील मनुष्य येतो कोण, तो कशाकरितां आला, त्यानें खलितें कोणाचे आणिले आहेत आणि त्यांत काय मजकूर आहे, वगैरेची कांहीं एक चौकशी न करतां व त्यास कोणत्याहि प्रकारचा निकाल न देतां त्यानें त्यास लाहोरांतच खितपत ठेविलें; इब्राहिमखानाकडेही जाऊं दिलें नाहीं. पांच-सहा महिन्यांनंतर कोणत्याहि प्रकारचा निर्णय न घेतां तो वकील माघारीं गेला.

ह्यानंतर चार-पांच वर्षांचा काल तसाच गेला. त्याला हिंदुस्थानकडे लक्ष देण्यास अवसर सांपडला नाहीं. इ. स. १५२० त तो पेशावरपर्यंत आला होता, पण बदकशानला कांहीं गडबड झाली म्हणून त्याला माघारीं जावें लागलें, आणि बदकशान त्याच्या ताब्यांत आलें. नंतर इ. स. १५२२ त कंदाहार त्याच्या अमलाखालीं कायमचें आलें. त्याच्यावर त्यानें आपला दुसरा मुलगा कामरान याची स्थापना केली. समरकंदच्या क्रान्तीनंतर दहा-बारा वर्षांचा काल अत्यंत धामधुमींत आणि अस्थिर अशा परिस्थितींत गेला. इ. स. १५२६ च्या एप्रिलमध्यें त्यानें इब्राहिमखानाशीं पानिपतावर गांठ घातली आणि त्याच्या एक लाख फौजेचा केवळ चार-सहा तासांत खुर्दा केला. हा चमत्कार त्या काळाच्या दृष्टीनें अजब झाला यांत तिलप्राय शंका नाहीं.

या वेळीं बाबुरानें आपल्या सैन्याची रचना फार बहारीची केली होती. पानिपत गांव त्याच्या उजव्या बगलेला होतें. त्याच्या सैन्याचा मध्य तोफांनीं आणि तयार गोलंदाजांनीं व्यापला होता. डाव्या बाजूला खंदक खणण्यांत आले होते आणि सैन्याच्या रांगेंत एका बाणाच्या टप्प्याइतकें अंतर ठेवण्यांत आलें

होतें. तसेंच डाव्या आणि उजव्या बगलेच्या टोंकांस चारही बाजूंनीं शत्रूला वर्तुलाकार वेढून त्याची पिछाडी व आघाडी साफ करून टाकणाऱ्या तलुघमा लढाईच्या डावपेंचांत तरबेज असलेल्या मोगल लोकांची एक राखीव तुकडी त्यानें मुद्दाम ठेविली होती. या पद्धतीनें आपल्या सैन्याची मांडणी करून बाबुर पानिपतच्या रणभूमीवर खडा होता. बाबुराचें हें सर्व सैन्य अनेक महिन्यांच्या प्रवासानंतर या रणभूमीवर दाखल झालें होतें. त्यांचा देश व बायका-पोरें फार दूर होतीं. हे परागंदा होऊन पानिपतच्या रणभूमीवर मृत्यूशीं खेळ खेळण्यासाठीं जय्यत तयारीनें उभे होते. पानिपतावर जय झाल्यानंतर दिल्लीचा बादशहा बाबुर होणार होता. पण सैनिकांना त्याचें काय ? त्यांच्या कपाळाची हडेलहप्पी थोडीच टळणार होती ? तेव्हां ह्या सैनिकांचा उत्साह एकसारखा ताजातवाना ठेवून त्यांच्याकडून यशस्वी तऱ्हेनें काम करून घेणारे बाबुरासारखे सेनानी हे खरोखरच अलौकीक सामर्थ्याचे पुरुषश्रेष्ठ होत. त्यांची आकर्षक शक्ति कांहीं न्यारीच असते.

बाबुराचें सैन्य आणि सुलतान इब्राहिमचें सैन्य समोरासमोर आठवडाभर होतें; पण कोणीच कोणावर चाल करून जाईना कीं कांहींच आगळीक होईना. बाबुराचे लोक मनांतून भीत होते, कारण त्यांना या लोकांचा कांहींच अनुभव नव्हता. त्यांच्या या दिल्लीश्वराच्या सैन्यासंबंधीं कल्पना फार दांडग्या होत्या. हें कांहीं तरी फार मोठें प्रस्थ असेल आणि त्यांतून आपण निभावून निघणार नाहीं असें त्यांस वाटत होतें, पण जसजसे दिवस जाऊं लागले तसतसा बाबुराच्या लोकांस विश्वास वाटूं लागला. बडें घर आणि पोकळ वांसा अशांतील हा प्रकार आहे हें त्यांनीं जाणलें आणि एक दिवस खरोखरीच बाबुराच्या सैन्यांतील कांहीं लोकांनीं जाऊन त्या सैन्याची आगळीक केली. तरी सुद्धां तें सैन्य थंडच. तेव्हां मात्र खात्रीच पटली कीं, हें प्रकरण आपण खास हाणूं. अशा तऱ्हेनें बाबुराच्या सैन्यांत दांडगा आत्मविश्वास निर्माण झाला. ता. २० एप्रिल इ. स. १५२६ ला रात्रीं सुलतान इब्राहिमच्या सैन्यावर चाल

करण्यांत आली. थोडीशी गडबड झाली, अंधःकारांत सैन्यास व्यवस्थितपणें हालचाली करतां येईनात म्हणून सैन्य झट्दिशीं माघारीं फिरलें. पण ता. २१ ला मात्र लढाईस तोंड लागलें. दिवस भालाभर आकाशांत चढला असेल नसेल इतक्यांत इब्राहिमअल्लीचें सैन्य समोरून येतांना दिसलें. त्या-बरोबर बाबुरानें आपल्या सैन्यास इशारत दिली आणि सैन्यें एकामेकांस भिडलीं. इब्राहिमअल्लीचें सैन्य संख्येनें मोठें होतें, पण त्यास लष्करी डावपेंच माहीत नव्हते. इब्राहिमचें सैन्य एकाद्या रानडुकराच्या मुसंडीप्रमाणें जें सरळ निघालें तें बाबुराच्या सैन्यावर आदळलें. त्याला शिस्त नव्हती कीं कांहीं विवक्षित तऱ्हेच्या हालचालींची बद्धता नव्हती. बाबुरच्या सैन्याच्या दसपटीनें मोठ्या सैन्याचा लोंढा बाबुराच्या सैन्यावर आला, पण त्यानें रचलेल्या व्यूहांत तो पूर्णपणें गुरफटला. पोत्यांत एखाद्या घुशीला गांठून टिकारण्यानें ठोकावी त्याप्रमाणें बाबुरच्या सैन्यानें इब्राहिमअल्लीच्या सैन्याची दशा केली. एक लाख फौजेनिशीं अंगावर कोसळलेल्या शत्रूचे दुपारीं बारालाच बारा वाजले आणि बाबुरानें हा पानिपतचा घनघोर संग्राम जिंकला. त्याच्या आयुष्यांत एवढें मोठें यश आणि एवढ्या अल्प काळांत त्याला हें प्रथमच लाभलें.

बाबुराच्या हातीं आलेलें यश फारच अपूर्व होतें. शत्रूचा धुव्वा उडाला आणि लगेच दिल्ली व आग्रा या दोन शहरांचा ताबा घेण्यासाठीं दिल्लीवर त्याचीं सैन्यें रवाना झालीं. त्यांनीं त्या शहरांचा ताबा घेतला. तेथील मशिदींतून बाबूर बादशहाच्या नांवानें, या पहिल्या मोगल शहानशहाच्या नांवानें पहिली प्रार्थना शुक्रवार ता. २७ एप्रिल इ. स. १५२६ ला म्हटली गेली.

या संग्रामांत इब्राहिम लोदीचें एवढें मोठें सैन्य पण तें जें चुटकीसरशी निकालांत निघालें त्याची कारणमीमांसा नीट लागत नाहीं. इब्राहिमखान लोदीच्या सैन्यांत फितूर होता, रणांगणावर त्याचें सैन्य त्याला सोडून गेलें असें मात्र झालेलें दिसत नाहीं. तें शेवटपर्यंत प्राणपणानें लढलें. मग असें अपयश कां आलें ? त्याला मुख्य कारणें दिसतात तीं अशीं कीं, पैलवानास अजस्र बोजा आणि अचाट सामर्थ्य असून भागत नाहीं; त्याला डावपेंचांची जोड लागते तरच आखाड्यांत कुस्ती यशस्वी होते. नाहीं तर पुष्कळ वेळां लुकडा दिसणारा पहिलवान दुपटीतिपटीच्या गड्याला पिरगाळून टाकितो. बांधेसूद पैलवानाचें शरीर अंगाबरोबर असल्याकारणानें त्याच्या हालचाली तल्लख असतात. डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच तो आपला डाव यशस्वी करतो आणि प्रतिस्पर्ध्यास

दाणकन् उताणाचा उताणा फेकून देतो. बरोबर तोच प्रकार या युद्धांत झाला. बाबुराचे सैन्याला शिस्त होती. त्याचे खंदक, झाडांच्या फांद्या जमीनीवर टाकून त्याच्या आश्रयानें शत्रूस अडविण्याची युक्ति, तसेंच शत्रूची पाठ अचानकपणें सडकून काढून तो गांगरला कीं त्यास पुढून ठेचणें व नंतर डाव्या-उजव्या बगला दाबून त्याला मोडून काढण्याची तुलुघमा युद्ध-पद्धति व अजस्र तोफखाना; आणि या सर्वांवर मात करणारी गोष्ट म्हणजे डोळ्यांत तेल घालून विद्युल्लतेच्या चापल्यानें रणांगणावर हालचाली करणारा बहादूर सेनानी. या सर्व गोष्टींच्या समुच्चयानेंच बारा हजार सैनिकांनीं एक लाख लोकांचा निःपात केला.

पांच-सहा हजार प्रेतांचा खच पडला होता, त्यांत इब्राहिम लोदीचा मुडदा सांपडला. त्याचें डोकें कापण्यांत येऊन तें बाबुरास नजर करण्यांत आलें. रणांगणावर पंधरा-सोळा हजार लोक कामास आल्याची आवई होती, पण आग्र्यास जाऊन चौकशी करतां पानिपताच्या रणभूमीवर पन्नास-साठ हजार लोक प्राणास मुकल्याचें समजलें. विक्रम नांवाचा ग्वालेरचा हिंदु राजा इब्राहिमखान लोदीच्या मदतीसाठीं आला होता, तोही पानिपतावर मरण पावला. अशा तऱ्हेनें निरवानिरव होऊन दिल्लीचें सिंहासन रिकामें झालें.

गुरुवार अठ्ठावीस एप्रिल पंधराशें सव्वीसला बाबुरानें आपल्या सैन्यासह मोठ्या थाटानें दिल्लींत प्रवेश केला. सुलतान इब्राहिमच्या राजवाड्यांत त्याचें वास्तव्य सुरू झालें. मशिदींत त्याच्या नांवानें खुदबा सुरू झाला. अपूर्व तेजानें झळकणाऱ्या त्याच्या भाग्यास खुलवणाऱ्या पृथ्वीमोलाच्या कोहिनूर हिऱ्याची प्राप्ति त्यास याच वेळीं झाली. तो त्यास त्याच्या थोरल्या पुत्रानें—हुमायूननें या प्रसंगीं नजर केला. या वेळीं बाबुराच्या स्वारींत हुमायून होता पण त्याचा दर्जा आणि जामानिमा तो बाबुर बादशहचा युवराज, बाबुरानें संस्थापिलेल्या साम्राज्याचा भावी सम्राट् या थाटाचा नव्हता; तर एकाद्या सामान्य सेनानीप्रमाणेंच त्याची वागणूक होती. ह्या सर्व गोष्टी बाबुराच्या

लक्षांत होत्या आणि सुदैवानें आतां त्याला संपन्नता आली होती तेव्हां त्यानें हुमायूनला त्या वेळचें नाणें ७०००००० (सत्तर लाख) दाम बक्षीस दिले. त्यानें आपल्या बेग सैनिकांमध्यें दहा लाख दाम वांटले. सैन्याच्या तळाबरोबर व्यापार करणारे व्यापारी व बाजारबुणगे यांनासुद्धां त्यांच्या मानाप्रमाणें बक्षिसें देण्यांत आलीं. फर्घाना, खुरासान, काशघर आणि पर्शिया या ठिकाणीं राहणाऱ्या स्नेह्यांस बाबुरानें सोनें, रुपें, जडजवाहीर, मौल्यवान् कपडे व इकडे सांपडलेले गुलाम नजराणे म्हणून धाडिले. हिरात, समरकंद, मक्का, मदिना या पवित्र ठिकाणच्या मौलानांना व काजींना या प्रसंगीं बक्षिसें धाडण्यांत आलीं. बाबुरानें सुलतान इब्राहिमखानाच्या आईस सात लाखांचा एक प्रांत तोडून देऊन तिची व्यवस्था चांगल्या प्रकारें लावली. बाबुरचें हें सौजन्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

बाबुरानें स्वपराक्रमानें मिळविलेली ही संपदा भसाभस वांटून टाकिली. आतां त्याच्याजवळ फक्त कोहिनूर राहिला. तोसुद्धां त्यानें हुमायुनास देऊन टाकिला. त्याच्या या अवलिया वृत्तीमुळें त्याचें कालंदर म्हणून नांव त्या वेळीं मशहूर झालें होतें.

## अनाहूत संकट : : : ३७

बाबुरानें आपल्या संपत्तीची वांटणी मुक्तहस्तानें केली. जो जो त्याच्या उपयोगी पडला त्याला त्याला या नाहीं त्या प्रकारानें त्यानें कांहीं ना कांहीं पोचविलें आणि सर्वांचा दुवा घेतला. खुद्द बाबुरासही आपण दिल्लीच्या तख्तावर तख्तनशीन झालों म्हणून समाधान वाटलें. शहानशहा होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा अनेक संकटांना तोंड दिल्यानंतर तडीस गेली. स्वतः कर्तबगारीनें छोटेंसें घर बांधलें तर मिशाला पीळ भरून मनुष्य छाताड वर काढून हिंडतो; मग बाबुर तर बादशहा झाला होता. तोसुद्धां वडिलार्जित राज्याचा नव्हे तर स्वतःच्या पराक्रमानें संस्थापिलेल्या परदेशांतील राज्याचा. तेव्हां त्याची अपूर्वाई त्यास विशेष वाटावी हें साहजिकच होतें. कोणतीहि गोष्ट मिळविणें हें तर कठीण आहेच पण मिळविलेली गोष्ट टिकविणें हें त्याहीपेक्षां कठीण.

आतां तो अनुभव बाबुरास येऊं लागला. त्यानें दिल्ली शहरांत प्रवेश केला त्या वेळीं उन्हाळा होता, आणि तो दिल्लीचा कडक उन्हाळा होता. तो बाबुराच्या थंड हवेंत राहणाऱ्या लोकांना अत्यंत जाचूं लागला. त्यांतून नागरिकांची सहानुभूति अजिबात नाहीं. त्यांचीं कवाडें या लोकांना पाहतांच बंद होत. त्यामुळें प्रतिक्षणीं लागणाऱ्या गरजा भागेनात. इतकेंच नव्हे तर

ऱ्या नव्या लोकांवर भामटेगिरीचे छापे घालून व चोऱ्या करून दिल्लीच्या भामट्यांनीं त्यांस सतावून सोडिलें. जवळ पैसा असून अन्न-पाणी मिळेना कीं निवाऱ्यास निर्वेध ठिकाण मिळेना. त्यामुळें त्यांची आंतून-बाहेरून गळचेपी सुरू झाली. त्याबरोबर त्यांचें चित्तस्वास्थ्य नाहींसें झालें आणि त्यांच्या दृष्टिसमोर त्यांचा तो काबूल-कंदाहारचा थंड प्रदेश, त्यांचीं सुखदायी घरें व त्या घरांत स्वर्गीय आनंद देणारी गृहलक्ष्मी आणि तिच्या आवतीं-भोंवतीं बागडणारीं गोंडस बालकें आपल्या इवल्याशा करकमलांनीं त्यांस बोलावूं लागलीं. त्याबरोबर त्यांच्या हृदयावर सत्ता गाजविणाऱ्या त्या बालसम्राटांच्या आज्ञेपुढें बाबुराची, या नूतन सम्राटाची सत्ता त्यांस नकोशी वाटूं लागली. त्यांच्या मनावरील बाबुराची पकड ढिली पडली आणि त्यांनीं साफच सांगण्यास सुरुवात केली कीं, झालें एवढें बस्स झालें; आम्हांस घरीं जाण्यास हुकूम व्हावा. ही साथ हां हां म्हणतां सर्व सैन्यभर पसरली. ही मागणी एकमुखी येणार अशी कानगी बाबुराच्या कानीं आली.

हें वेडें पीक पिकलें तर त्यांतून तोंड निघणें मुष्किलीचें होणार हें तो जाणून होता. तेव्हां त्यानें त्यांना एक दिवस बोलावून सर्व लष्करापुढें जिव्हाळ्याचें भाषण केलें : " पराक्रमशाली दोस्तांनो ! आजपर्यंत आपण खांद्याशीं खांदा लावून अनेक प्राणघातक वावटळींतून आणि शरिराची गुडाखू करणाऱ्या बर्फाच्या बेसुमार माऱ्यांतून प्रवास केला. खाईन खाईन करीत आलेल्या संकटांना तोंड दिलें आणि हिंदुस्थानांत येऊन लक्षावधि फौजेनिशी कोसळणाऱ्या शत्रूच्या ठिकऱ्या उडविल्या, आणि आपलें साध्य आपण साधिलें. भारतवर्षाचें साम्राज्य आपल्या चरणावर लोळत आलें आहे. तेव्हां तें टाकून एखाद्या भ्याडागत माघारीं घराला पळून जाणें तुम्हांला शोभत नाहीं. बायका-पोरांच्या लेंढारांत रममाण होणारीं श्वान-सूकरें पुष्कळ असतात. तेव्हां असलें मुर्दाड जीवन पत्करणार का येथील साम्राज्याचे मानाचे मानकरी म्हणून दिमाखानें वावरणार ? घराची आणि काबूल-कंदाहारची भाषा बोलूं नका. जरा धीर धरा. संकटें नाहींशीं होतील, सुखाचे दिवस येतील. "

बाबुराच्या या भाषणानें सैनिकांनीं घरीं जाण्याची भाषा बंद केली पण अप्रसन्न मनानें ते राहूं लागले.

सर्कशींतील सिंह मालकाची करडी नजर असेतोंपर्यंत गुरगुरत काम करतो पण तो केव्हां बिथरेल त्याचा नेम नसतो. सिंहाचें काम संपेपर्यंत मालकाचा जीव धोक्यांत असतो; पण बाबुराची ही सर्कस चोवीस तास चालू होती. तिचे प्रयोग हिंदुस्थानांत चालू होते. त्याच्याभोंवतीं लष्कररूपी गुरगुरणाऱ्या नरसिंहांचा गराडा होता. त्याचा जीव चोवीस तास धोक्यांत होता. पण त्याच्या अलोट धैर्यानें तो यांतूनही मार्ग काढीत होता. एकेक दिवस काढावा तों तों त्याचा मार्ग सुकर व्हावा असें चाललें होतें. बाबुराच्या गोड वागणुकीनेंच त्याचीं संकटें प्रतिदिनीं निवारूं लागलीं. बाबुराच्यापूर्वीं हिंदुस्थानावर चाल करून येणारे महंमद गझनी, तैमूर व बाबूर यांच्या स्वाऱ्यांत भयंकर तफावत होती. महंमद गझनी व तैमूर एखाद्या सैतानाप्रमाणें आले. कचाकचा त्यांनीं येथील लक्षावधि लोकांचीं मुंडकीं तोडलीं. अलोट संपत्ति नेली. सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणें ते आले आणि गेले. त्यांच्या ह्या करणीस फार मोठ्या प्रमाणांतील डाकेगिरीचें रूप होतें. बाबुराचें मात्र तसें कांहीं नव्हतें. तो येथें राज्य करण्यासाठीं आला होता. त्याला लूट-मार करून माघारीं जावयाचें नव्हतें. तो येथें स्थिर झाला आणि त्या दृष्टीनें मांड मांडूं लागला. त्याबरोबर लोकांची दृष्टि बदलली. ते त्याच्याकडे तुलनेच्या दृष्टीनें पाहू लागले. त्याबरोबर पूर्वींच्यांत आणि बाबुरांत जमीन-अस्मानाचें अंतर दिसूं लागलें. पूर्वींच्यांनीं लोकांच्या कत्तली निष्कारण केल्या तर बाबुरानें तसला क्रूरतेचा प्रकार कोठेंच केला नाहीं. तो शूर होता, पराक्रमी होता आणि इब्राहिमखानानंतर त्याच्या तोडींत बसेल असा बाबुराइतका कोणीच पराक्रमी दिसत नव्हता. तेव्हां इब्राहिमखानानंतर हाच राजा बरा असें लोकांस वाटूं लागलें. द्वेषाची भावना मावळूं लागली. इब्राहिमखान लोदीच्या अमदानींतील अफगाण सरदार व सुभेदार एकामागून एक बाबुरास सामील होऊं लागले. जे कांहीं थोडे बंडखोर होते त्यांचा बंदोबस्त हुमायूननें केला.

अफगाण सरदारांचीं बंडें मोडण्याचें काम चालू होतें तोंच बाबुरास दुसऱ्या एका प्रबल योद्ध्यास तोंड द्यावें लागलें. तो म्हणजे चितोडचा राणा संग. हा फार नामांकित पुरुष होता. त्याचें घराणें राजपूतांत सर्वश्रेष्ठ होतें. बाबुराप्रमाणेंच अनेक संकटांना तोंड देऊन आपला मोठेपणा त्यानें निर्माण केला होता. अखिल भारतवर्षांत त्याच्या नांवाला फार मोठी किंमत होती. त्याच्या झेंड्याखालीं हांकेबरोबर लक्षावधि सैन्य जमा होत होतें आणि अनेक शत्रूंना खडे चारीत होतें. चितोडच्या गादीवर आल्यापासून त्यानें अ पला राज्य-विस्तार फार वाढविला होता. हें बाबुरी संकट आलें नसतें तर त्याची सत्ता साम्राज्यपदास पोंचली असती. माळवा प्रांताचा राजा सुलतान महंमद खिलजी याचा पराभव करून त्यानें त्याचें राज्य जिंकलें होतें आणि महंमद खिलजीला—पराजित शत्रूला मोठ्या मानानें वागवून राजपुती औदार्याचें उदाहरण जगाला दाखवून दिलें होतें. भिलसा, चंदेरी, सारंगपूर आणि राठोर व माळवा एवढ्या मोठ्या प्रदेशावर त्याचा राज्यविस्तार होता. बाबुर हिंदुस्थानांत येण्यापूर्वी याचा त्याच्याशीं पत्रव्यवहार झाला होता. एकमेकांनीं एकमेकांस मदत करण्याचें ठरलें होतें. त्यानें दिल्लीच्या इब्राहिमखान लोदीचा अनेक वेळां पराभव केला होता. मेवाड, अंबर, ग्वाल्हेर, शिक्री, चंदेरी, काल्पी, बुंदी, रामपूर,

आणि अबू या ठिकाणचे राजे राणा संगाचे मांडलिक होते. असा हा फार मोठा मातबर होता. बाबूर दिल्लीस आला नसता व आल्यानंतर स्थाईक झाला नसता तर बाबुराचें नी त्याचें बिनसलें नसतें व हा युध्दप्रसंगच आला नसता. बाबुराची आणि त्याची लढत तो तरुण असतांना झाली असती तर काय झालें असतें हें सांगतां येत नाहीं. त्यानें मुसलमानांचा रणांगणावर अठरा वेळां पराभव केला होता. त्याच्या शरीरास रणांगणीं समशेर गाजवीत असतां असंख्य जखमा झाल्या होत्या. त्यांपैकीं अैंशींचे वण मोजतां येतील अशा स्थितींत होते. त्याचा डोळा, हात व पाय निकामी झाले होते. तरी पण त्याच्या अंगांतील तडफ व मनगटांतील शत्रूला जाऊन भिडण्याची रग पहिल्या दिवसाइतकीच टणक होती.

बाबुरासारखा बलाढ्य शत्रु आपल्याजवळ स्थाईक होत आहे असें पाहतांच राणा संगानें आपलें धोरण बदललें व बाबुरास उखाड देण्याची तयारी चालविली.

राणा संग आणि बाबुर या दोन महान् व्यक्ति होत्या. दोघांचें चरित्र आणि चारित्र्य तितकेंच उदात्त आणि पवित्र होतें. उभयतांनीं आपल्या प्रखर कर्तबगारीच्या योगानें कीर्तिमंदिर निर्माण केलें होतें. तेव्हां या उभयतांची रणांगणावरील गांठ म्हणजे तो एक अपूर्व योग होता. दोन्हीही प्यादीं एक-मेकांस भारी होतीं. बाबुर काबुलास असतांना संग राण्यानें त्याच्याकडे वकील पाठवून त्याची मैत्री संपादन केली होती. त्या वेळीं उभयतांमध्यें असें बोलणें झालें होतें कीं, बाबुर एका बाजूनें दिल्लिवर चाल करुन आल्यास तो स्वतः दुसऱ्या बाजूनें आग्र्यावर चाल करून येण्यास तयार होता; पण आतां बाबुराचें म्हणणें असें कीं, तो स्वतः इब्राहिमखान लोदीवर चाल करून आला, त्यानें दिल्ली व आग्रा या शहारांचा ताबा घेतला तरी सुद्धां संगाकडून कोणत्याच प्रकारची हालचाल झाली नाहीं, अतएव त्यानें आपला शब्द पाळला नाहीं. या तक्रारींत फारसें तथ्य दिसत नाहीं. कारण ही स्वारी

दोघांच्या संगनमतानें झाली आणि त्या वेळीं देण्यांत आलेलें अभिवचन पाळण्यांत आलें नाहीं असें जर तो म्हणता तर तें मान्य होण्यासारखें होतें.

राणा संग अशी रास्त तक्रार करतो कीं, बाबुरानें काल्पी, धोलपूर व आग्रा हीं ठाणीं आक्रमून त्याच्या सत्तेवर अतिक्रमण केलें होतें. उभयपक्षीं तक्रारी चालू होत्या आणि हीं प्रकरणें हातघाईवर येणार होतीं. फक्त दिवस केव्हां उगवणार हाच काय तो प्रश्न होता.

बघतां बघतां या लढाईस धर्मयुद्धाचें रूप आलें आणि तो त्वेष उभयपक्षांत सणाणूं लागला. जिकडे तिकडे चैतन्य निर्माण झालें. राणा संगाच्या झेंड्याखालीं या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व हिंदु एक व्हावा, सर्वांनीं एका आवाजानें याला उत्तर द्यावें, अशा भावना उफाळूं लागल्या. राणा संगानें सर्व हिंदु राजराजेश्वरांना या प्रसंगीं बोलाविलें आणि युद्धाची सिद्धता जोरानें चालविली. या लढाईसाठीं दोन लाख सैन्य तर खासच जमा झालें होतें. भिल्साच्या राजाचे ३०००० घोडेस्वार; मेवाड, डोंगरपूर आणि चंदेरी या ठिकाणांहून प्रत्येकीं बारा हजार बरकंदाज लढवय्ये आले होते. 'मारूं किंवा मरूं' या अहमहमिकेनें जो तो त्या ठिकाणीं दाखल झाला होता. बाका प्रसंग येतांच पळापळ होऊन लढाई बिघडण्याचा बिलकूल संभव नव्हता. जो तो निधड्या छातीचा वीर होता, आणि छातीचा कोट करून धर्मासाठीं पंचप्राणांची कुरवंडी करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. याशिवाय इब्राहिमखान लोदीच्या दिल्लीच्या सिंहासनावर वारसा हक्क सांगणाऱ्या त्याच्या भावाचें—महंमदखान लोदीचें १०००० सैन्य राणा संगाच्या बाजूस होतें.

बाबुर या सर्व गोष्टी दुरून पहात होता. राणा संगाच्या हालचालींस एवढें तेज चढेल आणि ते इतक्या झपाट्यानें आपणापुढें दंड ठोकून खळ्या खणत उभा राहील, अशी त्याची कल्पना नव्हती. बाबुर राजपुतांच्या या तयारीनें घाबरला. त्याचें सामर्थ्य त्या मानानें कोतें होतें. तो परदेशांत नवीन आला होता. शिवाय पानिपतावर झालेल्या इब्राहिमखान लोदीच्या घनघोर संग्रामांतून तो मोठ्या शिताफीनें बाहेर पडला होता. इतर अफगाण लोकांना मोडण्याचें काम चालू होतें. येथील नव्या राहणीस कंटाळलेल्या सैनिकांची धुसफूस चालू होती. अशा अस्थिर परिस्थितींत तो होता तोंच हें संकट आलें. पण संकट आलें असतां गांगरून जाणें हें तर बाबुराच्या स्वभावांतच नव्हतें. उलट ज्या ज्या मानानें लहानमोठें संकट येईल त्या त्या मानानें त्याचें मनोधैर्य बलवान् होऊन येणाऱ्या संकटाशीं झुंज घेण्यास तो तयार असे. त्यानें आपल्या परीनें तयारी चालविली. आतांपर्यंतचीं युद्धें बाबुरानें स्वधर्मीयांशीं केलीं. मुसलमानांतील भिन्न भिन्न जातींच्या लोकांशीं त्याचे सामने झाले. मोगलांची युद्ध-पद्धत त्याला माहीत होती. अफगाण लोकांची चकमक तो जाणीत होता. उझबेग लोकांची तुलुघमा-पद्धतीची लढाई त्याच्या चांगल्याच परिचयाची होती. त्यांत तो स्वतः तरबेज होता. त्या युद्ध-पद्धतींत तोफखान्याची भर घालून ती त्यानें हिंदुस्थानांत चांगलीच प्रभावी केली आणि तुर्की लोकांची धीमी लढाई त्यानें पाहिली होती. पण सध्या ज्या लोकांशीं त्याचा सामना व्हावयाचा होता ते राजपूत लौकिकवान् होते. त्यांच्यामागें शेंकडों वर्षांची संस्कृति होती व खातरजमेचे योद्धे म्हणून त्यांची कीर्ति होती. एवढ्या मोठ्या पल्ल्याचें युद्ध करण्याची त्याची तयारी नव्हती पण तो कार्यास लागला होता. लष्कराची पूर्णपणें सिद्धता होतांच तो या स्वारीवर चालू लागला. प्रथम त्याची पंधराशें लोकांची एक तुकडी राणा संगाच्या सेनेवर चालून गेली; पण तिचा धुव्वा उडाला, सरसहा कत्तल झाली. त्याबरोबर बाबुराचे लोक आणखीच धास्तावले. मेवाड व दिल्ली या राज्यांची सरहद्द बिआना नदी होती. त्या ठिकाणीं त्यास कांहीं अफगाणी सैन्य येऊन

मिळालें. त्यांनीं तर राजपुतांच्या शौर्याचीं रसभरित वर्णनें सुरू केलीं. त्यामुळें बाबुराचे लोक आणखीच घाबरले. राणा संगाच्या सैन्यास सतावून सोडण्यासाठीं म्हणून धाडलेल्या टोळ्या जोराचे रट्टे खाऊन माघारीं येऊं लागल्या. इतक्यांत काबुलहून एक रमलज्ञ आले, त्यांनीं बाबुराचा पराभव होणार असें खडानूखडा भविष्य वर्तविलें. त्यामुळें लोकांचा धीर जास्तच खचूं लागला.

हें मरगळीचें वातावरण नाहींसें व्हावयास पाहिजे होतें. नवें चैतन्य, नवा जोम निर्माण झाल्याविना भागणार नव्हतें. तेव्हां बाबुरानें एकदम पवित्रा बदलला. अहोरात्र चिंतन सुरू केलें. असें कां होतें? कोठें काय चुकत असावें? असल्या घनघोर प्रसंगांनीं आपला एकसारखा पिच्छा कां पुरवावा? हें नाहीं तें, तें नाहीं हें असें करतां करतां विचारांची मालिका पूर्ण झाली आणि त्याच्या शरीरांत एकदम संचार होऊन तो मनाशींच पुटपुटला : "दारुड्या बाबुराला जय येणार नाहीं. ईश्वरी वाणी ईश्वरी नियमानें सिद्ध होते."

झालें. एकदम आचरणांत क्रांति झाली. बाबुरानें—ह्या पट्टीच्या दारूबाजानें एक तपानंतर ती एका क्षणांत सोडली ती कायमची. सध्या बाबुरानें आपला तळ दिल्लीपासून दहा कोसांवर फत्तेपूर शिक्री या ठिकाणीं दिला होता. त्वेषाच्या लहरींत बाबुरानें दारू न पिण्याचा कृतनिश्चय केला. मदिरेचा सांठा रस्त्यांत फेंकून दिला. मदिरापानाचीं भांडीं मोडून तोडून टाकलीं, आणि दारूची बंदी सर्व लष्करांत जारी केली. सर्वांस बोलावून मोठें तेजस्वी भाषण केलें :—

"सद्गृहस्थहो, मरण हें प्रत्येकालाच आहे, पण मरणामरणांत परी आहेत. घुंगुरट्याच्या मरणानें मरणें आणि शेराच्या मरणानें मरणें यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. शत्रूशीं दोन हात करतां करतां दुनियेपार होण्यांत पुरुषार्थ आहे, परम सौभाग्य आहे, अन्तीं सद्गति आहे. आणि जय झाला तर साम्राज्य आपलें आहे, आणि मग या साम्राज्यावर सत्ता गाजविणारें महंमदी धर्माचें साम्राज्य चिरंजीव होणार आहे. पिढ्यान्‌पिढ्या न लाभणारी

संधि आपल्या परम भाग्यानें आपणांस लाभली आहे. तेव्हां कुराणाची आणि आपल्या परम पवित्र धर्माची शपथ घेऊन या युद्धांत खांद्याशीं खांदा लावून मरेतोंपर्यंत लढण्याचा आपण कृतनिश्चय करूं." या भाषणाबरोबर सर्वांनीं जयजयकार केला. प्रत्येकानें कुराणाची शपथ घेतली, आणि या दिव्यांतून पार पडण्याचें ठरविलें. या वेळेपासून बाबुराच्या सैन्यास एक तऱ्हेचें तेज चढलें. जो तो मान ताठ करून व छाती काढून चालूं लागला. बाबुराच्या भोंवतीं एक लाख सैन्य जमा झालें.

जोमाचें वातावरण कायम आहे तोंच शत्रूशीं गांठ घालणें अत्यंत आवश्यक होतें हें बाबुर जाणून होता. कारण रोज नव्या नव्या वाईट बातम्या येत होत्या आणि गप्पांना तर ऊत आला होता. शेवटीं शिक्रीपासून पांच कोसांवर व अग्र्यापासून दहा कोसांवर कानवा नांवाचें एक ठिकाण आहे, त्या ठिकाणीं हा संस्मरणीय युद्धप्रसंग घडला. या वेळीं बाबुरानें आपल्या सैन्याची मांडणी पानिपतच्या मांडणीप्रमाणेंच केली होती. त्यांत फरक इतकाच कीं, त्याच्या तोफखान्याला तिचाकी गाड्या होत्या. बाबुराचें सैन्य दोन-तीन मैल चालून आलें असेल नसेल तोंच सैनिकांच्या आवाजांनीं आणि रण-गाड्यांच्या खणखणाटांनीं राणा संगाच्या सैनिकांना हें सैन्य येत असल्याची इशारत मिळाली आणि तेंही तितक्याच त्वेषानें पुढें येऊं लागलें. ता. १६ मार्च १५२७ ला लढ्यास तोंड लागलें; पण या वेळीं मुकाबला करण्याची बाबुराची इच्छा नव्हती. त्यानें चांचणीसाठीं कांहीं लष्कर धाडलें पण तें मागच्यासारखें मार खाऊन माघारीं न येतां त्यांनीं कांहीं राजपुतांचीं शिरकमलें कापून आणिलीं. त्याबरोबर सैन्यांतील भ्याड वृत्ति नाहींशी होऊन सर्वांच्या अंगांत रणमद भणाणूं लागला. जो तो गडी रणमस्त होऊन घुमूं लागला. या वेळीं बाबुर मध्यभागीं होता. त्याच्या डाव्या बाजूस त्याचा मेहुणा महदिखवाज हा होता व उजव्या बाजूस हुमायून होता आणि दिल्लीच्या तख्तावर हक्क सांगणारा अल्लाउदिन लोदी नांवाचा एक नामांकित लोदी गृहस्थ बिनीवर होता.

सकाळीं नवाच्या सुमारास राणा संगाचा प्रथम हल्ला बाबुराच्या सैन्यावर झाला. ही धडक बाबुराच्या उजव्या बगलेवर मोठ्या जोरानें बसली. त्याबरोबर उजव्या बगलेचें राखीव सैन्य त्या ठिकाणीं आलें व त्यानें जोराची मारगिरी करून राजपुतांचा दाब कमी केला. त्याच बगलेच्या मध्यावर असणाऱ्या तोफखान्यानें बेजरब मारा सुरू केला. हाच प्रकार डाव्या बगलेलाही सुरू झाला. आतां जोराची धमाधमी सुरू झाली. राखीव तुकड्या पुन्हां पुन्हां जाऊन पडती बाजू सावरूं लागल्या. उभयपक्ष तुल्यबल होते. मागेंपुढें रेटारेटी चालू होती. कित्येक तास गेले तरी लढाई आतां कह्यांत येण्याचा रंग दिसेना. या क्षणाला राणा संगाची सरशी दिसावी तर दुसऱ्या क्षणाला बाबुराची सरशी व्हावी असें चाललें होतें. रणांत रणमस्त होऊन उभयपक्ष हालचाली करीत होते. रक्ताच्या चिळकांड्या, घोड्यांच्या टापा आणि तरवारीच्या खणखणाटांनीं वातावरण दुमदुमून चाललें होतें. तोफांचे धडाकेही चालू होते. आतां तुलुघमा पद्धतीनें शत्रूला जेर करण्याचें ठरलें, व बाबुराचा तसा हुकूम होतांच राणा संगाचें बरेंच सैन्य मागून पुढून घेरलें गेलें. राजपुतांच्या पाठी बेसुमार सडकूं लागल्या. पिछाडी सांवरण्यास जातात तों आघाडीवर तोच प्रकार सुरू झाला, आणि दोन्ही बगलांवर जबरदस्त रेटा येतांच एवढे खंदे राजपूत वीर पण घाबरले. तरीसुद्धां त्यांनीं पंचप्राणांची तमा न करतां आपला व्यूह बराच वेळ तसाच तारून धरला.

बाबुराचें सैन्यही थोडें बहुत गांगारलें व राजपुतांची सरशी होणार असा आभास निर्माण झाला, पण इतक्यांत बाबुराच्या राक्षसी तोफा बेसुमार आगी ओकूं लागल्या. धुराच्या अलोट लोटांनीं रणमैदान व्यापलें, त्याबरोबर सैन्यांत गोंधळ उडाला, राजपुतांचा मांड विसकटला. पिछाडी सडकणाऱ्या बाबुराच्या सैन्याची फळी फोडून जिवाचा बचाव करण्याचा बाका वक्त त्यांच्यावर आला. राजपूत वीरांनीं तो मार्ग पत्करून जिवाचा बचाव करण्याचें ठरविलें. कचाकच बाबुरचें सैन्य कापून फळी फोडून ते पार होत, पण असें करतांना

अनेकांचा कपाळमोक्ष ठरलेला. कानवाची लढाई अंगावर आली. राणा संगाच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. विजयप्राप्तीशिवाय चितोड-राजधानींत प्रवेश करावयाचा नाहीं असा त्याचा निश्चय असल्यामुळें अपयशानें कलंकित झालेला आपला चेहरा लपविण्यासाठीं तो मेवाडच्या डोंगरांत कडेपठारीं राहूं लागला. बाबुराशीं पुन्हां गांठ घालण्यासाठीं त्याची तयारी चालू होती. पण बिचारा वृद्ध झाला होता. अनेक आपदांनीं जर्जर झालेलें शरीर थकत चाललें होतें. त्यांत या नव्या अपयशाची भर पडली आणि त्याचा चरित्र-ग्रंथ आटोपला. कानवाच्या लढाईंत मुसलमानांनीं वीरश्रीनें उन्मत्त होऊन रणांगणावर पडलेल्या राजपूत वीरांचीं शिरकमलें एकत्र करून त्यांचे मनोरे रचले. या लढाईंत जय मिळाला म्हणून बाबुरानें 'गाजी' हें नवीन उपपद आपल्या बिरुदावलीमध्यें सामील केलें. अरबी भाषेंत गाजी या शब्दाचा अर्थ काफिरांचें पारिपत्य करणारा असा आहे. हें उपपद मोगलवंशी बादशाहींत शेवटपर्यंत ललकारलें जात होतें व नाण्यावरही त्याचा उपयोग करण्यांत येत होता.

## इतर सत्ताधाऱ्यांचा बींमोड : : ४०

राणा संगाच्या पाडावानंतर राजपूतांत कांहींच त्राण उरला नाहीं. ते एका-मागून एक नाहींसे झाले. त्यांची सत्ता नामशेष झाली. राणा संगानंतर मेदिनीराय नांवाच्या एका सरदाराचा पाडाव करण्यांत आला. माळवा आणि बुंदेलखंड यांच्या सरहद्दीवर चंदेरी नांवाचा एक किल्ला होता. तो मेदिनी-रायाच्या ताब्यांत होता. त्याच्यावर बाबुराची धाड आली, तेव्हां मेदिनी-रायानें तो मोठ्या शौर्यानें लढविला, पण निभाव लागत नाहीं असें पाहतांच त्यांनीं शत्रूवर जोराची धडक घेऊन स्वर्गाची वाट धरली.

बाबुरानें ठिकठिकाणीं नाकीं बसवून बंदोबस्त चालविला. जे लोक या लांबच्या वस्तीला कंटाळले होते, त्यांची एक टोळी करून हुमायूनच्या हाता-खालीं त्यांस काबुलास पाठविलें. बदकशानच्या सुभ्यावरही हुमायूनची नेमणूक करण्यांत आली. इब्राहिमखान लोदीचा मुलगा शहाजादा महंमद हा फार मोठ्या फौजेसह बंगाल प्रांतांतून काशीपर्यंत चालून आला. पण बाबुर सामना देण्यासाठीं समीप येतांच त्याच्या लोकांनीं त्यास सोडून दिलें व हें प्रकरण जागच्या जागींच निकालांत निघालें. याच वेळीं त्यानें बंगालच्या राजाचा पराभव केला. अयोध्या प्रांतांतील बंडें मोडून जिकडे तिकडे शांतता प्रस्थापित करून तो आग्र्यास माघारीं आला.

हिंदुस्थानांत आल्यापासून त्याची प्रकृति तितकीशी बरी नव्हती. येथील हवा त्यास मानवेना, अधूनमधून त्यास ताप येई. त्याची शरीरसंपत्ति पहिल्यापासून खणखणीत म्हणूनच ती तग धरून होती. नाहींतर त्याच्यावर कोसळणारे ते आणीबाणीचे प्रसंग पाहिले म्हणजे तो त्यांतून कसा निभावला याचेंच आश्चर्य वाटतें. त्याचा उत्साह दुर्दमनीय होता. त्याच्यासारखा पोहणारा तर फारच क्वचित् आढळेल. मार्च इ. स. १५२९ तील त्याची नोंद अशी आहे कीं, गंगा नदीचें पात्र तेहतीस हात मारून तो पार झाला आणि थोडा वेळ विश्रांति घेऊन पुन्हां माघारीं आला. या वेळपर्यंत त्याच्या भ्रमंतिमध्यें भेटलेल्या कोणत्याही नदीचें पात्र पोहून काढल्याशिवाय त्यानें सोडलें नव्हतें. फक्त गंगेचें पात्र त्यानें ओलांडलें नव्हतें, तेंही पण आतां ओलांडलें. याशिवाय शक्तीचा चमत्कार तो नेहमीं करीत असे. तो असा कीं, दोन बगलेंत दोन माणसें उचलून खंदकावरून उड्या घेत तटबंदीस तो प्रदक्षणा घाली. यावरून बाबुराच्या ताकदीची सहज अटकळ करतां येते.

बाबुरासारखा कृतज्ञ आणि उमदा पुरुष विरळाच सांपडेल. संकटांत आपल्याबरोबर खांद्याशीं खांदा लावून दिवस कंठणाऱ्या स्नेह्यांच्याबद्दल कृतज्ञता त्यांच्या अंतःकरणांत आकंठ भरली होती. इ. स. १५२९ च्या डिसेंबरमध्यें त्यानें आपल्या स्नेह्यांस फार मोठा थाटाचा उद्यानोपहार दिला होता. त्याचा दिमाख आणि थाट त्याच्या बादशाही वैभवास शोभण्यासारखा तर होताच पण त्या प्रसंगीं हजर असणाऱ्या लोकांची यादी पाहिली म्हणजे त्याच्या स्नेह्यांचा विस्तार अचंबा वाटण्यासारखा होता. त्याच्या पायाशीं पाय बांधून प्राणघातक संकटांना तोंड देणाऱ्या वीरांचा त्यानें केलेला गुणगौरव हा तर केवळ अपूर्व होता. या वेळीं पाहुण्यांच्या करमणुकीसाठीं करण्यांत आलेले करमणुकीचे प्रकार अनेकविध होते. हत्तींच्या टकरी, उंटांच्या पळण्याच्या शर्यती, साठमारीचे खेळ, पेहेलवानांच्या कुस्त्या, गवयांचीं गाणीं, कलावंतिणींचे नाच, जादूचे प्रयोग वगैरे गोष्टींची नुसती झुंबड उडाली होती.

बाबुराचा स्वभाव अत्यंत उमदा होता. त्याचें समरकंदवरील प्रेम बिनमोल होतें. तें तीन वेळां त्याच्या हातांत आलें आणि गेलें पण त्याचा मोह बाबुरास सुटला नाहीं. बुखाऱ्याचा मध व समरकंदचीं खरबुजें त्यास फार आवडत. समरकंदासच बाबुरास काव्यस्फूर्ति झाली व तो कविता रचूं लागला. संकटांत असतांही बाबुराचा कवितेचा नाद सुटला नाहीं. तो दर-रोज सरासरी बावन्न श्लोक रचीत असे. बाबुरानें एक लिपी काढून ती अमलांत आणिली. याच तुर्क लिपींत तो आपल्या कविता 'व इतर ग्रंथ लिहीत असे. ह्या लिपीस बाबरी लिपी म्हणतात. तो कवनें करण्यांत फार सराईत होता. त्याचा मुलगा हुमायून काबुलास राज्य करीत असतां त्यानें कांहीं कवनें करून बाबुरास दाखविलीं, पण तीं तितकीशीं साधलीं नव्हतीं. तेव्हां बाबुरानें त्याची चांगलीच खरडपट्टी काढिली. त्याचें त्याच्या सैनिकां-वर फार प्रेम असे. तो स्वतःच्या शरिरापेक्षां त्यांची काळजी अधिक घेई.

बाबुरास हिंदुस्थानांत एवढा मोठा विजय मिळाला त्याचें मुख्य कारण असें कीं, त्यानें सैन्यास उत्तम प्रकारचें लष्करी शिक्षण दिलें होतें. त्याची टापटीप व शिस्त अवर्णनीय होती. पूर्वीं लढाईच्या प्रसंगीं निरनिराळ्या टोळ्या मर्जीस येईल त्याप्रमाणें हल्ला चढवीत, पण बाबुरानें शैबानीखानाशीं गांठ पडल्यापासून ही पद्धत सोडली आणि सर्वांनीं शिस्तवार आणि एक-मतानें लढण्याची नवीन पद्धत अंगिकारली.

बाबुराच्या एकंदर चारित्रावरून तो मर्द होता, तसाच तो सभ्यही होता. थोरपणास उचित असे सर्व गुण त्याच्या अंगीं होते. धूर्तता, विद्वत्ता, मेहनत, महत्त्वाकांक्षा, औदार्य, रसिकता आणि सौंदर्यसमीक्षता, वगैरे बहुमोल गुणांनीं तो युक्त होता. साधारणपणें राजपुरुषाहून बाबुर अगदीं निराळा वाटतो. मानवी प्राण्यांत नैसर्गिक जे काय गुण असावयाचे ते त्याच्यांत भरपूर होते. तो चलाख, ममताळू व साधा असून मोठा अधिकार हातीं आल्यावरही हे त्याचे गुण कमी झाले नाहींत. इतर राजांसारखा तो डामडौली नव्हता. त्याच्याजवळ राजे लोकांचा दरबारीपणा तर मुळींच नव्हता. कल्पकता व बहुगुणसंपन्नता ह्यांत त्याची बरोबरी करणारा राजा क्वचितच सापडेल. राजपुरुषाच्या अंगीं सहसा न आढळणारा मनमिळाऊपणा, मनाची तरतरी, विपत्ति येवो अथवा भाग्योदय प्राप्त होवो, दोन्हीही स्थितींत धैर्य ढळूं न देतां आनंदी व शांत वृत्ति ठेवणें हे तर त्याचे विशेष होते. न डगमगणारें धैर्य, विद्याभिरुचि व तिच्यामध्यें मिळालेली सिद्धि इत्यादि गुणांमध्यें बाबुराचे तोडींत बसेल असा बादशहा क्वचितच सांपडेल.

हुमायूनला पहिला मुलगा झाला त्या वेळीं त्यानें त्यास अभिनंदनपर असें एक पत्र ता. १३-११-१५२८ ला धाडलें आहे. त्यानें त्यांत त्यास बहुमोल

उपदेश केला आहे. त्या वेळीं समरकंद पुन्हां ताब्यांत येण्याचा रंग दिसत होता म्हणून हुमायूननें समरकंदवर चाल करून जावें म्हणून लिहिलें होतें. साहस करून दाखविण्याची हीच वेळ आहे, तेव्हां स्वारी अंगावर घेऊन जातीनिशी चाल करून जावें; आळस न करणें, कारण सुस्ती आणि सुख राजेरणास शोभत नाहींत; राजा म्हणविणारानें सौख्यास आणि सुस्तीस थारा देतां कामा नये. या पत्रांत स्वारी-शिकारीसंबंधींचाच मजकूर होता असें नव्हे तर त्यानें कसें वागावें याची छाननी होती. त्यानें आपल्या भावाशीं चांगल्या प्रकारें वागावें, बदकशानच्या एकलकोंड्या जीवनाविषयीं कुरकुरूं नये, बेग सरदारांशीं संगनमत करून त्यांचा अभिप्राय वारंवार घ्यावा, राजकारणांतील खास खाश्या लोकांच्या गांठी दिवसांतून दोनदां तरी घ्याव्यात, लष्कराची ताकद आणि शिस्त उत्तम असावी, वगैरे मुद्यांची व प्रमुख गोष्टींची नोंद त्या पत्रांत आहेच पण बारक्या-सारक्या गोष्टी सुद्धां त्याच्या दृष्टींतून सुटल्या नाहींत. तुमचीं पत्रें तुम्ही पुन्हा वाचतां कीं नाहीं कोण जाणे ? पण तुम्ही तसें कराल तर तीं तुमचीं तुम्हाला तरी वाचतां येतील किंवा नाहीं, याची शंकाच आहे. बाबुर स्वभाषेचा सम्रा होता. तो नेहमीं असें म्हणे कीं, राजाची भाषा ही भाषांची सम्राज्ञी असली पाहिजे. लोकांनीं त्याच्या भाषेचा आणि बोलीचा आदर्श डोळ्यापुढें ठेविला पाहिजे. आणि खरोखरीच बाबुराची भाषा तशी होती, आणि दरबारी थाटदार भाषा तर त्यानेंच लिहावी.

हुमायूनसंबंधीं त्याच्या मातेचें आणि बाबुराचें बोलणें चाललें असतां हुमायून एकाएकीं त्या ठिकाणीं अवतीर्ण झाला. उभय माता-पितांच्या हृदयाचे गुलाब फुलले आणि नेत्रांत प्रेमाश्रु उभे राहिले. ‘ शंभर वर्षांचें आयुष्य आहे तुला. आतांच तुझें स्मरण केलें आणि बेटा तूं भेटलास. ’ हुमायून भेटल्याबरोबर बाबुराचें पितृहृदय वात्सल्यानें स्रवूं लागलें आणि वरील उद्गार त्याच्या तोंडांतून बाहेर पडले. सम्राट्पदाची कठोरता मावळली. ‘ तूं परवानगीशिवाय कां आलास ? समरकंदच्या स्वारीचें काय झालें ? ’ वगैरे वगैरे प्रश्न पार कुठच्या कुठें गेले. त्यानें त्या दिवशीं फार मोठा दरबारी खाना हुमायूनच्या

आगमनार्थ देण्याचें ठरविलें. त्या दिवशीं खान्याचे वेळीं त्यास मुख्य पाहुण्याचा मान देण्यांत आला होता. प्रस्तुतचे दिवस या पितापुत्रांनीं मोठ्या मन-मोकळेपणानें आणि आनंदानें काढिले. कुटुंबाचा कर्ता पुरुष आणि साम्राज्याचा भावी सम्राट् या नात्यानें त्याचीं कर्तव्यें कोणतीं या गोष्टींची मोकळी चर्चा झाली. उभयतांचे दिवस आनंदांत चालले होते. पण कसोटीची वेळ आली आणि कसोटी म्हटलें कीं, बाबुर बावनकशी उतरावयाचा हेंही पण ठरलेलेंच.

आतां पिता या नात्यानें बाबुरास शेवटचा निकष लागणार होता, आणि येथें हें सोनें बावनकशी ठरलें. प्रातःकाळीं झळाळणाऱ्या सोनेरी किरणाप्रमाणें त्याचीं कीर्तिकिरणें जगाच्या अंतापर्यंत या प्रसंगानें दीप्तिमान राहतील यांत तिलप्राय शंका नाहीं. हुमायून एकाएकीं आजारी पडला. दिवसानु-दिवस त्याचें दुखणें विकोपास जाऊं लागलें. वैद्य, राजवैद्य आणि धन्वंतरींनीं हात टेकले. प्रकृति आंवाक्यांत येईना, क्षणाक्षणाला चिंता वाढू लागली. सर्वांचीं तोंडें चिमणीसारखीं झालीं. दुःखाचें वातावरण तीव्र स्वरूप धारण करूं लागलें. औषधें संपून दैवी उपायांची चर्चा सुरू झाली. बाबुर उमदा होता. साम्राज्यें मिळविणें आणि घालविणें हा त्याच्या आयुष्याचा खेळ होता. सोने, रूपें, जडजवाहीर, माणिक, मोती, भूदान काय वाटेल तें, साम्राज्यसुद्धां. पण या सर्व गोष्टींचीं दानें ठोकरीनें उडविणाऱ्या काळपुरुषास असल्या फडतुस चिजांची जरूर नव्हती. त्याला बाबुराच्या अंतःकरणाचा तुकडा हवा होता. त्याची ही मागणी कोणास उमगण्यासारखी नव्हती. पण ती मनः-सामर्थ्यानें जाणणारा एकीएक बाबुरच झाला.

एक दिवस हुमायूनच्या रुग्ण-शय्येभोंवतीं बाबुरानें अत्यंत पवित्र मनानें आणि पाक दिलानें तीन प्रदक्षिणा घातल्या आणि मनांतल्या मनांत त्यानें पैगंबराची करुणा भाकली. त्याबरोबर त्याच्या मनःचक्षूपुढें एक दीप मालवला आणि दुसरा लागला. त्याबरोबर त्यानें आपल्या ऊर्वरित आयुष्याचें

उदक हुमायूनसाठीं सोडलें. त्या क्षणीं हुमायूनच्या प्रकृतीस आराम पडूं लागला आणि बाबुराची प्रकृति क्षीण होऊं लागली. पुत्रासाठीं पित्यानें आत्मार्पण केलें. तिकडे हुमायून खडखडीत बरा झाला आणि इकडे बाबुर याही बाबतींत उच्चांक गांठून स्वर्गांत पैगंबराच्या चरणीं दाखल झाला.

मरणापूर्वीं पांचच मिनिटें आधीं बाबुरानें अत्यन्त सावधानतेनें एक महत्त्वपूर्ण गोष्ट केली. त्यानें आपल्या हातानें हुमायूनला चार खाशा सरदारांच्या समक्ष स्वतःच्या तख्तावर मोठ्या आनंदानें बसविलें. आपल्यानंतर सर्वसत्ताधारी तक्तनशीन बादशहा म्हणून त्यानें त्याचें नांव उद्घोषित केलें. त्यानंतर तो तख्ताच्या पायाशीं एका कोचावर पडून राहिला. या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर मोठें समाधान विलसत होतें. आपण कृतकृत्य झालों असें त्यास वाटत होतें. इतक्यांत त्याचा शेवटचा क्षण आला. त्याबरोबर प्राण सोडतांना मोठ्या कळकळीनें त्यानें हुमायूनला सांगितलें कीं बाबारे, आपल्या बंधूंना अन्तर देऊं नकोस. त्यांचे सर्व अपराध पोटांत घाल. कोणत्याही कारणास्तव त्यांच्यावर शस्त्र धरूं नकोस. लाडक्या,मी येतों. असें म्हणून त्यानें आपले प्राण सोडले.

बाबुरास एकंदर चार मुलगे होते. हुमायून, कामरान, अस्करी आणि हिंदाल यांचीं नांवें इतिहासांत दाखल झालीं व अनवार नांवाचा एक धाकटा मुलगा बाबुरासमक्षच निवर्तला.

त्याला सहा मुली होत्या. पहिली अशिआ सुलतान बेगम. ती लहानपणींच वारली.

दुसरी मासुमा सुलतान बेगम. ती लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं निवर्तली.

तिसरी गुलबदन बेगम.

चौथी गुलरंग बेगम. हिच्या मुलीनें—सलीमा सुलतान बेगमनें—बहिरामखानाशीं लग्न केलें व त्याच्यानंतर सम्राट् अकबराशीं लग्न केलें.

पांचवी गुलचहार बेगम आणि सहावी शेहरबन बेगम.

बाबुरास तीन बायका होत्या. ( १ ) मासुमा, ( २ ) गुलरूक, ( ३ ) दिलबर.

प्रत्येकाचें आयुष्य ही सुद्धां एक लढाई आहे आणि तिचा शेवट यशस्वी होणें ही परम भाग्याची गोष्ट आहे. बाबुराच्या आयुष्याचा कळसाध्यायही पण तसाच गोड झाला. ता. २६-१२-१५३० ला बाबुराचा आत्मा या पार्थिव देहाच्या पिंजऱ्यांतून मुक्त झाला. केवळ अठ्ठेचाळीस वर्षांचा हा थोर पुरुष आणि छत्तीस वर्षें आपल्या राज्यासाठीं अहोरात्र झुंज घेणारा हा राजराजेश्वर पार्थिव देहास सलाम ठोकून दुनियेपार झाला. पण त्याचा कीर्ति-परिमल मात्र एकसारखा दरवळत राहील यांत शंकाच नाहीं.

बाबुराचा अंत्यविधि त्याच्या इच्छेनुरूप काबूलनजीक एका टेकडीच्या पायथ्याशीं झुळझुळ वाहणाऱ्या एका ओढ्याजवळ सृष्टिसौंदर्यानें संपन्न अशा स्थळीं करण्यांत आला. शहाजहान बादशहानें इ. स. १६४० त त्या जागेवर टुमदार कबर बांधिली. अद्यापहि त्या ठिकाणीं काबूलचे लोक हवा खाण्यास व नवस करण्यास जमा होतात.

# बाबुराचें चारित्र्य

## राज्यकर्ता बाबुर

बाबुरानें अकरा महिन्यांच्या अंतरानें राणा संग व इब्राहिमखान लोदी यांस खडे चारून आपलें दिल्लीचें तख्त निर्वेध केलें. तो बादशहा झाला, त्याबरोबर त्याचा राजदंड फार मोठ्या राज्यावर चालू झाला. त्याची जबाबदारी वाढली. राज्यांतील दंगे-धोपे नाहींसे करून प्रजेला स्थैर्य लाभावें, लोकांचें वित्त व जीवित धोक्यांत नसावें, त्यांचे दैनंदिन कारभार गुण्यागोविंदानें चालावे अशी त्याची उत्कट इच्छा होती. त्यासाठीं प्रांताप्रांतांतून दंगेधोपे नाहींसे करून शांतता प्रस्थापित करण्यासाठीं बाबुरानें मोठमोठाले मातबर सरदार लष्करासह पाठविले. राज्यकारभाराचीं सूत्रें नीट चालावींत म्हणून खटपटी सुरू होत्या, त्यामुळें राज्यांतील अराजकें नाहींशीं होऊन शांतता निर्माण झाली, प्रजा निर्धास्त होऊन रयतेस चित्तस्वास्थ लाभलें. राज्यकारभार नीट मार्गी लावण्याचे उद्योग बाबुरानें केले याबद्दल वाद नाहीं; पण एकंदरीनें विचार करतां राज्यकारभारधुरंधर म्हणून बाबुराची योग्यता त्याचेनंतर झालेल्या शेरशहा व अकबर यांच्या पुढें फिक्की पडते. त्याच्याजवळ ती वरच्या दर्जाची कुवत नव्हती. आतां हें खरें कीं त्याला या गोष्टी करण्यास अवसर मिळाला नाहीं. त्याचें उभें आयुष्य घोड्यावर लढाया

मारण्यांत गेलें. त्यानें अनेक लढाया जिंकल्या, राज्यें कमाविलीं आणि घालविलीं. वयाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षीं तो दिल्लीचा दिल्लीपति झाला. त्यानंतर मात्र त्यास थोडें चित्तस्वास्थ्य लाभलें आणि राज्याला स्थैर्य आणण्याच्या उद्योगास तो लागला.

बंडखोर लोकांना वचक बसावा, त्यांनीं लूटमार करून रयतेस सतावूं नये म्हणून बाबुरानें अत्यंत उग्र स्वरूप धारण केलें होतें. पंजाबांत लूटमार करून लोकांचा निःपात करणारें पेंढार फार होतें. हे लोक जाट व गुजर जातींचे असून ते कडेपठाराच्या आश्रयानें राहात आणि डाके घालून आपली गुजराण करीत. पूर्वीं हिंदुस्थानवर चढाई करून येत असतां या लोकांनीं बाबुरास व त्याच्या लष्करास त्राहिभगवान् करून सोडलें होतें. डोंगरावरून हे लोक एखाद्या विजेप्रमाणें कोसळत आणि भयंकर कत्तली करून वाटसरूंचा निकाल लावीत आणि पैका लांबवीत. या बंडखोरीमुळें पंजाबांत कोणतीच सत्ता नांदत नव्हती.

बाबुरानें आतां आपली सत्ता तेथें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न चालविला होता. जरा बंदोबस्त ढिला पडतांच हे लोक बंडें करून उठत व रयतेस सतावीत व लोकांचें जीवित धोक्यांत आणीत तेव्हां बंडखोरांना पकडून त्यांना कडक शासन करण्याचा तडाखा आतां सुरू झाला. या बंडखोर लोकांच्या-पैकीं दोन-तीन मुखंडांना पकडून त्यांचें रयतेसमक्ष बाबुराच्या हुकुमानें राई-राईएवढे तुकडे करण्यांत आले. या गोष्टींचा योग्य तो परिणाम झाला.

सरहिंदच्या बाजूस मुंडाहिर लोक असेच लुटारू होते. पेंढारीपणा करून ते रयतेस सतावून सोडीत. त्यांच्यावर वचक बसावा म्हणून बाबुरानें असेंच उग्र स्वरूप धारण केलें होतें. बाबुराचा मुक्काम सरहिंदला असतांना एका काजीनें बादशहाजवळ अशी तक्रार केली कीं, मोहन मुंडाहिर नांवाच्या एका गृहस्थानें त्याची जिंदगी लुटून जाळून बेचिराख केली व त्याच्या मुलास ठार केलें. ही कागाळी ऐकून बाबुर संतापला. त्यानें लगेच ह्या

बंडाव्याची चौकशी करून बंडखोरांना शासन करण्याचें काम अलि कुली-इमदानी नांवाच्या अधिकाऱ्याकडे सोंपविलें. त्याच्या हाताखालीं या कामासाठीं तीन हजार लष्करी स्वारांची एक तुकडी दिली. पहिल्या तडाक्याला एक हजार मुंडाहिर बंडखोर तलवारीनें काटले गेले. कत्तल अंगावर शहारे आणणारी झाली. मुंडाहिरांच्या मुंडक्यांचे उंच मनोरे उभे करण्यांत आले. एक हजाराच्या सुमारांत बंडखोर मुंडाहिराच्या बायका, पोरें व पुरुष कैद करण्यांत आले. त्या सर्वांची रवानगी दिल्लीला बादशहाकडे झाली. खटल्याची इथंभूत हकीगतही बाबुराकडे पाठविण्यांत आली. मुख्य आरोपी मोहन याचीही दिल्लीला रवानगी झाली. हे सर्व आरोपी दिल्लीस येतांच त्यांतील बायकांची वांटणी मोगलांत झाली. इतर आरोपींस योग्य त्या शिक्षा करण्यांत आल्या. मुख्य आरोपी मोहन यास बादशहाच्या आज्ञेनें जमिनींत कमरेपर्यंत गाडण्यांत येऊन त्यास बाणानें ठार करण्यांत आलें. मुंडाहिर लोकांच्या बंडाचा निचरा अशा प्रकारें करण्यांत आला. बंडखोर रेशमाप्रमाणें मऊ पडल्यानें रयत निर्धास्त झाली.

बाबुरानें केलेल्या कत्तली, अत्याचार व रक्तपात बाबुरासारख्या सुसंस्कृत माणसाला न शोभणाऱ्या वाटतात पण तें तसें नाहीं. तो त्या कालाचा दोष आहे. बाबुर आपल्या विरुद्ध वागणाऱ्या लोकांवर शस्त्र धरी. पण त्यांनीं आपली विरुद्ध चाल सोडून दिली म्हणजे अपराध्यास तो पूर्ण माफी करी. त्याच्या मनांत त्यांच्याबद्दल किल्मिष राहात नसे. तो त्यांच्याशीं साफ दिलानें वागे. वस्त्याच्या वस्त्या, गांवेचीं गांवें, व जिल्हेचे जिल्हे जाळून निर्वंश करून आपली सत्ता प्रस्थापित करणाऱ्या वंशांतला तो होता. आजही आपण अणु अस्त्राच्या जोरावर अखिल विश्वगोल उध्वस्त करून आपली सत्ता प्रस्थापित करणारीं महान् राष्ट्रें आपण पाहतों. त्यांच्यापुढें इसलामी-यांनीं केलेल्या कत्तली कांहींच नाहींत.

राज्यांत उत्तम प्रकारचें दळणवळण बाबुरानें निर्माण केलें. दिल्लीपासून काबूलपर्यंतचा राजरस्ता त्यानें चांगलाच तयार केला. पंधरा पंधरा मैलांच्या

दरम्यान डाक-घरें बांधण्यांत आलीं. टपाल त्वरित पोंचविण्यासाठीं सह। सहा घोड्यांचें एक पथक व त्यावर अधिकारी नेमण्यांत आले.

बाबुर स्वारीकरितां किंवा शिकारीसाठीं ज्या ज्या मार्गानें प्रवास करी तो तो रस्ता मोजण्याचें काम त्या त्या वेळीं लगेच करण्यांत येई. बाबुरानें निर्माण केलेलें माप बाबुरी गज या नांवानें प्रसिद्ध होतें. हा गज जहांगिराच्या कारकीर्दीपर्यंत चालू होता.

बाबुर सौंदर्याचा मोठा भोक्ता. त्याच्यासारखा रसीक तोच. कलाकुसरीनें परिप्लुत अशीं सौंदर्यपूर्ण उद्यानें व भव्य इमारती बांधण्यांत त्यास नितान्त आनंद वाटे. उद्यानें, इमारती, पाण्याचे नळ व खजिने बांधण्याचें काम मोठ्या प्रमाणांत चालू होतें. एकट्या आग्रा शहरांत बाबुराच्या राजवाड्यावर ६८० लोक या कामावर असत. याशिवाय आग्रा, शिक्री, बयाना, धोलपूर, ग्वालेर व कौल या ठिकाणीं मिळून १४९१ घडशी काम करीत. बाबुराच्या राज्याच्या दुसऱ्याच वर्षीं यमुनेच्या रम्य तटाकीं एक भव्य व सौंदर्यपूर्ण उद्यान निर्माण करण्यांत आलें. हें ठिकाण बाबुराचें फार आवडतें होतें. तेथें बादशहा आपल्या खास मर्जींतील मोंगल सरदारांसमवेत आपला काल मोठ्या आनंदानें व ख्यालीखुशालींत घालवी. त्या ठिकाणीं नाचरंग व गाणीं-बजावणीं चालत. पुढें या बागेच्या धर्तीवर कामराननें एक बाग लाहोरास निर्माण केली.

बाबुराच्या सुदैवानें तो अशा देशाचा धनी झाला होता कीं त्याचें वर्णन त्याच्या कल्पनेंत बसणारें नव्हतें. त्या देशाचा विस्तार महान् विशाल होता. तेथील संपदा अमाप होती. बाबुर हिंदुस्थानचें वर्णन करतो कीं, ‘ या देशाचा विस्तार अफाट असून तो सोन्या-चांदीनें खच्चून भरला आहे. ’ बाबुराच्या राज्याचा वसूल ६३३१८०००० रुपये होता.

हिंदुस्थानाबाहेर बाबुराचें राज्य रानटी लोकांवर होतें. हे लोक डोंगरांवरून वस्त्या करून राहात. त्यांच्यावर सत्ता प्रस्थापित करण्याचें काम

महान् दुर्घट होतें. त्यांना आपल्या हुकमतींत वागविणें हें तर त्याहूनही कठीण होतें. ते लोक बाबुराच्या नांवानें खुद्बा पढत पण वसूल मात्र कांहींच मिळत नसे. धाकधपटशा दाखवून जें कांहीं मिळे त्यावरच समाधान मानावें लागें. या सर्वांचा भरपूर वचपा हिंदुस्थानांत निघाला होता. सिंधूचा पूर्व, भाग सर्व पंजाब, मुलतान, सतलज नदीची पूर्व आणि दक्षिण बाजू, हिंदुस्थानचा सुपीक प्रदेश, राजपुतांचे सर्व प्रदेश, तसेंच माळवा, बयाना, राथभोर, ग्वालेर व चंदेरी ह्या किल्ल्यांवर बाबुराची सत्ता प्रस्थापित झाली होती. ठिकठिकाणच्या राज्यकारभारांत एकसूत्रीपणा होताच असें नाहीं. प्रत्येक राजा, प्रत्येक जिल्हा व प्रत्येक गांव या ठिकाणचा रोजचा व्यवहार अगदीं सामान्य पद्धतीनें चाले. दिवाणी आणि फौजदारी अधिकार मोठमोठाल्या अधिकाऱ्यांना असत.

त्यावेळीं कोणकोणते कर होते, हे समजण्यास नीट साधन नाहीं. पण शेतसारा हा मुख्य कर होता व तो जमीनदारांपासून घेतला जाई. बाहेरून येणाऱ्या वस्तूंवर कर असे. या ठिकाणांपासून त्या ठिकाणावर जाणाऱ्या मालावरही कर घेतला जाई. दुकानदारांवर कर असे. ज्याठिकाणीं मुसलमानांची सत्ता अबाधित होती तेथील हिंदु लोकांवर जिजिया कर होता.

बाबुर हिंदूंना जंगली म्हणे. त्यांच्या मुंडक्यांचे मनोरे धर्मनिष्ठ मुसलमानांना खुष करण्यासाठीं तो उभारी. राणा संगाच्या लढाईच्या वेळीं त्यानें जिहाद उद्घोषित केला. गाजी हें नामाभिधान आपल्या बिरुदावलींत दाखल केलें हें जरी खरें तरी तो कांहीं कडवा मुसलमान नव्हता. तो व्यवहारी होता. त्याच्या धर्मभावना लवचीक होत्या. त्याचा परमेश्वरावर पूर्ण विश्वास होता.

हुमायून त्याचा ज्येष्ठ पुत्र होता. तो युवराज होता. त्याच्यावर त्याचें प्रेम विशेष होतें. तो त्याला नेहमींच उपदेश करी. त्यानें त्याला खालीलप्रमाणें उपदेश केला आहे :

माझ्या मुला :—

१. राजानें संकटांत आणि धोक्यांत जीव घालून आपल्या पराक्रमास उजळा द्यावा.

२. आळसाचा आणि सुखाचा त्यानें झडझडून त्याग करावा, कारण सुखलोलुपता आणि आळस राजास शोभत नाहींत.

३. बेग लोकांशीं म्हणजेच आपल्या लोकांशीं व मंत्र्यांशीं विचार-विनिमय करावा. दिवसांतून दरबार दोन वेळां बोलवावा.

४. सैन्यांत कडक शिस्त ठेवावी. लष्कर बलशाली असावें.

हिंदुस्थानचा बादशहा म्हणून हुमायूननें आपल्या वागणुकीचा ढंग कसा ठेवावा यासंबंधींची बाबुराची सांगी विशेष आहे.

१. अनेक धर्मांच्या लोकांवर राज्य करण्याचें भाग्य ईशकृपेनें तुला लाभलें आहे, तेव्हां प्रजेला न्यायदान करतांना धार्मिक भावनेस बळी न पडतां न्यायनिवाडा निःपक्षपातीपणानें कर.

२. गोहत्त्या करण्याचें टाळ. त्यामुळें हिंदु लोक तुझ्यावर प्रेम करतील, त्यांच्या अंतःकरणाची पकड घेतली जाईल. प्रजा कृतज्ञतेच्या रज्जूनें बद्ध करण्याचा प्रयत्न कर.

३. कोणत्याही धर्माच्या लोकांचीं पूजास्थानें नष्ट करूं नकोस.

४. इस्लामी धर्माचा प्रसार उपकाराच्या समशेरीनें कर.

५. शिया आणि सुनी यांच्या मतभेदाकडे दुर्लक्ष कर; नाहींतर इस्लामचें सामर्थ्य खचून जाईल.

## सर सेनापति बाबुर

सेनापति म्हणून बाबुराची योग्यता फार मोठी होती. दमदार घोड्याची मांड, अचूक नेमबाज, अव्वल दर्जाचा समशेरबहादूर, जिद्दीचा शिकारी, सैनिकांच्या आकांक्षा बरोबर हेरणारा असा अष्टपैलू सेनानी तो होता. जन्मजात पुढारी पण तो होता. महान् नेत्यास लागणाऱ्या सर्व सद्गुणांचा संगम त्याच्या ठिकाणीं झाला होता. सैनिकांच्या खांद्याला खांदा लावून त्यानें अनेक आपत्तींना तोंड दिलें होतें. तसेंच चांगले दिवसही काढले होते म्हणून त्याला प्रत्येक सैनिकाची व सेनानायकाची खतखोड पूर्णपणें माहीत होती. त्या सर्वांपेक्षां सेनानायकास लागणारा फार मोठा अपूर्व गुण

त्याच्याजवळ होता. तो म्हणजे चढाई करून येणाऱ्या सेनेचें व सेनानायकाचें सामर्थ्य आणि मर्मस्थानें त्यास पूर्णपणें अवगत असत. त्याच्या अतुल धैर्याला चिकाटीची जोड होती. त्याची महत्त्वाकांक्षा तर दुर्दमनीय होती. त्याची इच्छाशक्ति अतिशय प्रखर होती. नेता म्हणून नांव गाजविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा फार दांडगी होती. एक-दोन पराभवाच्या तडाक्यानें त्यानें केव्हांच मरगळ खाल्ली नाहीं. त्याचे उद्योग सतत चालूच असत.

पराजित शत्रूवर अत्त्याचार होऊं नयेत म्हणून तो फार दक्ष असे. इब्राहिमखान लोदीच्या कुटुंबियांवर अत्त्याचार झालेच असते, पण बाबुर त्या ठिकाणीं तात्काळ हजर झाला म्हणून तो प्रसंग टळला. त्यानें इब्राहिमखान लोदीच्या कुटुंबियांची त्यांच्या इतमामाप्रमाणें नीट व्यवस्था लावून दिली. दौलतखानाचा मुलगा गाजीखान हा मोठा विद्वान् आणि प्रतिभासंपन्न कवि होता. त्याचें फार मोठें ग्रंथालय त्यानें या क्रान्तीच्या तडाक्यांतून वांचविलें. विजयामुळें बेहोष होऊन सैनिकांनीं बहराह गांवाच्या नागरिकांवर अत्त्याचार चालविल्याची व त्यांना ते वाईट तऱ्हेची वागणूक देत असल्याची वार्ता बाबुराच्या कानावर येतांच त्यानें ताडकन् कांहीं सैनिक पाठवून ते अत्त्याचार ताबडतोब थांबविले. ज्या सैनिकांनीं हीं कृत्यें केलीं त्यांस पकडण्यांत आलें. ज्यांनीं फारच अत्त्याचार केले होते. त्यांना ठार करण्यांत आलें आणि बाकीच्यांचीं नाकें उभीं कापून त्यांची धिंड लष्कराच्या तळावर काढण्यांत आली.

तैमूरच्या प्रांतास तो आपले प्रांत समजे. तेथें त्यानें कोणत्याही प्रकारची लुटालूट केली नाहीं व अत्त्याचार होऊं दिले नाहींत.

## व्यक्तिमत्व

एखाद्या दीपस्तंभाप्रमाणें बाबुराचा मोठेपणा एकदम डोळ्यांत भरण्यासारखा आहे. इंद्रप्रस्थाचें तख्त काबीज केल्यानें त्याच्या कीर्तीच्या नौबदा दशदिशां झडल्या. इतिहासांत त्याचें नांव उच्चपदीं झळकूं लागलें. त्याच्या बेचाळीस कुळांचा उद्धार झाला. याहीपेक्षां त्याचें नांव जगतांत अजरामर

करणारी त्याची दुसरी अद्वितीय कृति म्हणजे त्याचें आत्मचरित्र. आत्म-चरित्रांच्या दृष्टीनें आत्मचरित्रांत त्याचें स्थान केवळ अद्वितीय आहे. तें एक बिनमोल साहित्य आहे. त्यांत साहित्याचे सर्व गुण प्रकर्षानें आहेत. त्या ग्रंथांत प्रारंभाला त्यानें आपलें बालपण मोठ्या रसिकपणानें सांगितलें आहे. नंतर दैनंदिन घडणाऱ्या व्यवहारांच्या रोजनिशी-वजा नोंदी आहेत. विशेष गोष्टींचे तपशील आहेत. कांहीं टिपणीं आहेत. या आत्मवृत्ताचा विशेष असा कांहीं न्यारा आहे कीं, हा राजराजेश्वर त्याच्यावर येऊन गेलेल्या प्रसंगांचीं चित्रें, कोणत्याही प्रकारचा आडपडदा न ठेवतां खुल्या अंतःकरणानें मोठ्या बहारीनें रंगवतो. त्याच्या त्या तन्मयतेंत तो आपला मोठेपणा, राजराजेश्वराचे डाम-डौल व दरबार पार विसरून जातो आणि मोकळ्या अंतःतकरणाच्या सहृदय लेखकाप्रमाणें त्याचें लिखाण रंगत असतें. त्यानें रेखाटलेलीं व्यक्तिचित्रें हुबेहुब आणि बोलकीं आहेत.

आपल्या ईप्सितासाठीं अहर्निश झटणारा वाटेल तसलें संकट अंगावर घेऊन त्यांतून यशस्वीपणें पार पडण्याची पल्लेदार दृष्टि असणारा, हातीं असणाऱ्या चतुर्विध साधनांची योग्य प्रकारें गुंफण करून त्या आयुधांचा झोत योग्य ठिकाणीं चालू करण्याची अपूर्व कार्य-कुशलता अंगीं असणारा, कामाचा उरक, पराकाष्ठेचा आत्मविश्वास, जबाबदारी अंगावर घेण्याची उत्सुकता, क्षणोक्षणीं बदलणाऱ्या परिस्थितीस तोंड देण्याची धमक, पल्लेदार कल्पकता व अपूर्व लेखनशैली वगैरे सद्गुणांचा मुक्तहार या दिल्लीश्वराच्या गळ्यांत रुळत होता.

समाप्त

# व्यक्ति सूची

अब्दर रझाक ७२, ८९, ९०, ९१.
अबदुल सय्यद बाबुराचा आजा २०.
अहंमद मिर्झा बाबुराचा सर्वांत मोठा चुलता २१, २३, २४, ३०.
अस्करी १३१.
आलि कुलीअहमदानी १३७.
इसान दौलत बेगम बाबुराची आजी २५, २६, २८, ४०.
इब्राहिमखान लोदी १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, ११४.
इस्माईल ९२, ९३.
उमरशेख बाबुराचा पिता १७, १८, १९, २१, २२, ४६.
उलुघ बेग २१, ७२.
कमर अली ४९, ६०, ६४, ७३.
कुतुलघ निगार ( बाबुराची आई ) १७, ४०.
खवाज पाहया ४९, ५०, ५२, ५३, ५५.
जहांगिर ( बाबुराचा धाकटा भाऊ ) २८, ४४, ४५, ४६, ४७, ७३, ७६, ७७.
बाकि बेग ७३, ७६, ७७.
बदिअझ झमान ७८, ७९.
नसीम ७३, ७५, ७७.

महंमदखान २१, २३.
महंमद मिर्झा २१, ३०, ३१, ३८.
मासुमा ८०.
मुझफर ७८, ७९, ८०.
सुलतान अल्ली ३१, ३२, ३६, ३७, ४०, ४१, ४८, ४९, ५३.
हिंदाल १३१.
हसन याकूब २८.
हुसेन मिर्झा २१, ३१, ३७, ७८.
हुमायून ११८, १२१, १२६, १२७, १२८.
हैदर ९४.

# स्वाध्याय

१. बालपण : बाबुराचा जन्म केव्हां झाला? त्याचा साखरपुडा कोणाशीं ठरला? केव्हां ठरला? साखरपुडा म्हणजे काय? शिवाजीमहाराजांचें लग्न केव्हां झालें? त्या वेळीं त्यांचें वय किती होतें? बाबुराचा पिता केव्हां मेला? कसा? उमरशेखच्या मरणानंतर बाबुरवर कोणची जबाबदारी येऊन पडली?

'छत्रचामरांमागें असंख्य कट्यारी असतात,' 'राजमुकुटास फड्या निवडुंगाचे कांटे असतात'— म्हणजे काय? बाबुराचें बालपण पाहिल्यावर मराठ्यांच्या इतिहासांतील कोणत्या व्यक्तीची आठवण होते? कां?

बाबुराला जीवनभर स्वास्थ्य कां मिळालें नाहीं?

सर्वसाधारण माणसाचें बालपण व बाबुर याचें बालपण यांत फरक कोणता? स्वतःच्या लहानपणच्या आठवणी थोडक्यांत लिहा.

२. राज्यस्थिति : बाबुर व उमरशेख यांची महत्त्वाकांक्षा काय होती? आपल्या पित्याची इच्छा बाबुरानें केव्हां पुरी केली? 'बाबुरच्या शरीरांत मोंगल व तुर्क या दोन्हीं वंशांचें रक्त सळसळत होतें'—हें कसें? बाबुराला आपलें वंशपरंपरागत आलेलें फरघान्याचें राज्य टिकवण्यासाठीं कोणाशीं दोन हात करावे लागले? कां?

३. शत्रूंचा बीमोड : बाबुरचें राज्य गिळण्यासाठीं हात सरसावून आलेले त्याचे नातेवाईक कोणचे? अशा वेळीं बाबुरनें कोणचें धोरण स्वीकारलें? तें योग्य होतें का? 'आपण स्वारी केली नसती तर बरें झालें असतें' असें अहंमदखानास कां वाटूं लागलें? तें त्याचें मत बरोबर होतें का? कां? महंमदखानाशीं तो कोणत्या प्रकारें वागला? कां?

शिवाजीमहाराजांनीं मोगलांशीं तह करून कांहीं किल्ले त्यांना दिले व दिल्लीला औरंगजेबाचे भेटीस येण्याचें कबूल केलें यांत धोरण कोणतें होतें तें शिक्षकांकडून समजावून घ्या.

४. इसान दौलत बेगम : ही कोण होती ? हिचें बाबुराच्या जीवनांत स्थान कोणतें होतें ? इसान दौलत बेगमनें जमालला कोणतें बाणेदार उत्तर दिलें ? कोणच्या प्रसंगीं दिलें ?

शिवाजीच्या जीवनांत जिजाऊचें स्थान कोणतें ? तें काम तिला कां करावें लागलें ? तुमच्या आईची एखादी अविस्मरणीय आठवण थोडक्यांत लिहा.

५. बालराजा : राजाचें मुख्य काम कोणतें ? एकटाच राजा जर स्वतःच्या मनाप्रमाणें राज्यकारभार करीत असेल तर तिला कसली राज्यपद्धति म्हणतात ? त्या राज्यपद्धतींत दोष कोणचा असूं शकतो ? अशा प्रकारच्या राज्यपद्धतीचीं दोन उदाहरणें सांगा. इतक्या लहान वयांत बाबुरनें अष्टप्रधानांवर कशी छाप बसविली ?

सभोंवतीं असलेल्या अनेक लोकांपैकीं बाबुरानें कोणास दिवाण केलें ? त्यालाच त्यानें दिवाण कां निवडलें ? त्यानें कोणतें राजकारण करण्यास सुरुवात केली ? त्याचा मोड कोणीं व कसा केला ? कोणत्याही भयंकर प्रसंगाला न डगमगतां तोंड देण्याचें सामर्थ्य बाबुरांत कशामुळें आलें ?

राज्यकारभारांत स्वार्थी लोकांचा भरणा असला तर त्यांचें लक्ष राष्ट्राच्या फायद्यावर असत नाहीं; त्यामुळें राष्ट्रहिताकडे दुर्लक्षच होतें. पण अशा वेळीं जर मध्यवर्ती सत्ता भक्कम असेल तर हा अपघात टळूं शकतो.—मराठ्यांच्या इतिहासांतील उदाहरणें द्या.

६. समरकंद : समरकंद येथें कोण राज्य करीत होते ? महंमद मिर्झाचे पूर्वीं तेथें कोण राज्य करीत होते ? त्यांच्या कारकीर्दीसंबंधीं तेथील प्रजेचें काय मत होतें ? महंमद मिर्झाचे कारकीर्दींत समरकंदमधील लोकांची स्थिति कशी होती त्याचें थोडक्यांत वर्णन करा.

सर्व सत्ता एकाच माणसाच्या हातांत केंद्रीभूत झाली असतां प्रजेला सुख मिळण्याचा जितका संभव तितकाच छळ होण्याचा संभव. पण अशा वेळीं राजाचा छळ प्रजेला सहन करावा लागतो, कारण त्याच्याजवळ लष्कराचें

सामर्थ्य असतें; पण या छळाला सुद्धां सीमा असते. ती मर्यादा ओलांडल्यावरच लोक क्रांति करतात. फ्रेंच राज्यक्रांति वगैरेबद्दल शिक्षकांकडून माहिती मिळवा.

संभाजीच्या कारकीर्दींत मराठी राज्याची स्थिति कशी होती तें सांगा.

७. समरकंदवर चाल : बाबुर समरकंदवर चालून केव्हां गेला? त्याला मदत करण्याचें कोणीं कबूल केलें होतें? त्याप्रमाणें त्यानें मदत कां केली नाहीं? बाबुरच्या सैन्यानें समरकंद लुटलें असतां त्यानें आपल्या सैनिकांना कोणता आदेश दिला? त्याचा समरकंदमधील लोकांवर काय परिणाम झाला?

बाबुरला जरी समरकंद घ्यावयाचें होतें तरी तेथील प्रजेची छळवणूक नको होती, आणि त्यामुळें सात्त्विक मनाच्या बाबुराला वाईट वाटलें. यांत त्याच्या मनांत वसत असलेली देशहिताची बुद्धि स्पष्ट दिसत आहे.

चंगीझखान, तैमूरलंग, नादिरशहा यांच्या स्वाऱ्यांची माहिती मिळवा. उल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेंतील स्वारीची माहिती मिळवा.

बाबुरनें बैसंगर व शैबानिखान यांना कसें पिटाळलें?

तैमूरलंगाच्या सिंहासनावर बसल्यानंतर त्याच्या मनांत आलेले विचार त्याच्याच शब्दांत द्या.

८. शंभर दिवसांचें राज्य : समरकंद जिंकून घेण्यांत बाबुरच्या सैनिकांचा काय हेतु होता? त्याच्या सैन्यांत बेदिली माजण्याचीं कारणें कोणतीं? सैन्यास समरकंद लुटण्यास बाबुरनें अनुमति कां दिली नाहीं? बाबुरचें फर्गाना प्रांताचें राज्य कसें गेलें? समरकंदचें राज्य कोणीं बळकावलें? केव्हां बळकावलें?

९. अर्धें राज्य : फर्गाना परत मिळविण्यासाठीं त्यानें काय प्रयत्न केला? तो कां फसला? त्याच्या सेनेंतील अनेक लोक त्याला सोडून कां गेले? ' अश्रूंच्या रूपानें निराशा निचरून तो ताजातवाना झाला '—यांतील सौंदर्य शोधा.

१०. रंकाचें जिणें : समरकंद व खोजंद यांमधील पर्वतमय प्रदेशांत सुलतान अलीनें बाबुरास कां राहूं दिलें नाहीं? सुलतान अलीचें हें कृत्य

चुकीचें होतें का ? कां ? त्यानंतर बाबुर कोठें गेला ? त्याच्या धुमसणाऱ्या मनाला कशानें समाधान मिळालें ? ' पोटांत वडवानलाच्या ज्वाला एक-सारख्या भडकत असतांना खदखदां हसावें '—यांतील सौंदर्य शोधा.

' कोणच्याही नात्यापेक्षां रक्ताचें नातें जास्त श्रेष्ठ. '—विस्तार करा.

११. आमंत्रण : दोस्त अलीचें पत्र वाचून बाबुरचा त्यावर विश्वास कां बसला ? यांत त्याच्या अंगचा कोणता गुण दिसतो ? त्याच्या गोंधळलेल्या मनानें कोणता निर्णय घेतला ?

१२. नामधारी राजा : फर्घाना प्रांताचें राज्य बाबुरला परत केव्हां मिळालें ? राज्यकारभार करण्यासंबंधीं बाबुरच्या कल्पना काय होत्या ? बाबुर व अहंमद तंबल यांमध्यें बेबनाव कां झाला ? त्याचा परिणाम काय झाला ? बाबुरला अंदिजान घेऊन समाधान कां मानावें लागलें ?

आपसांतील भांडणामुळें नेहमीं तोटाच होतो—हें दाखविणारीं मराठ्यांच्या अगर मोगलांच्या इतिहासांतील उदाहरणें सांगा.

१३. अंदिजानला रामराम : अंदिजान बाबुरनें कां सोडलें ?

१४. फसगत : समरकंदच्या लोकांना बाबुरच राजा हवा असें कां वाटूं लागलें ? बाबुर किश येथें असतां त्याला आश्चर्यचकित करून टाकणारा कोणता प्रसंग घडला ?

१५. पुन्हां एकदां समरकंद : त्यानंतर बाबुर कोठें येऊन राहिला ? शैबानीखान गादीवर असतांना आपल्याला समरकंदची गादी मिळवतां येईल असें बाबुरला कां वाटत होतें ? इ. स. १५०० मध्यें बाबुरानें समरकंदमध्यें कसा प्रवेश मिळविला ? त्याच्या येण्याचा तेथील लोकांवर काय परिणाम झाला ? लोकांना बाबुर हवाहवासा कां वाटत होता ?

१६. पुढील तयारी : बाबुरानें समरकंदची गादी मिळविली त्या वेळीं त्याचें वय काय होतें ? शिवाजी व ज्ञानेश्वर यांनीं इतक्या लहान वयांत कोणची कामगिरी केली त्याची माहिती मिळवा. उझबेग लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां बाबुरानें काय काय केलें ?

१७. ज्योतिषानें घात केला : शैबानीखानावरील स्वारीच्या वेळीं ज्योतिषानें काय सल्ला दिला ? त्याचा परिणाम काय झाला ? अशा वेळीं ज्योतिषावर सेनानींनीं विश्वास ठेवावा का ? कशाकरितां ? ( संभाजी व कलुषा यांसंबंधीं माहिती मिळवा ) त्याच्या सेनेंतील किती सैनिक जिवंत आले ?

१८. समरकंदला रामराम : समरकंदचें संरक्षण करणें कठीण असें बाबुरास कां वाटत होतें ? त्या वेळीं समरकंदमधील लोकांची स्थिति कशी होती ? बाबुर समरकंदबाहेर पडला त्या वेळीं त्याच्याबरोबर कोण कोण स्त्रिया होत्या ? त्याची बहीण त्याच्याबरोबर कां आली नाहीं ?

एकजुटीनें प्रबल शत्रूशीं मुकाबला केला तर तो नामोहरम होईल हें माहीत असतांनासुद्धां अपसांतील वैरामुळें एकजूट होऊं शकत नाहीं व तो प्रबल शत्रु एकएकस्याचा पराभव करतो.—मराठ्यांच्या इतिहासांतील अशीं कांहीं उदाहरणें शोधा.

'जात्यांतील रडतात, पण सुपांतले हंसतात.'—विस्तार करा.

१९. वनवास : उरतिपा येथें असतांना त्यानें आपल्या जीवनांत सुख कसें उत्पन्न केलें ? तो कोणाकडे रहात होता ? त्याला तैमूरलंगाच्या स्वारीची हकीगत कोणीं सांगितली ? त्याच्या मनांत कोणत्या विरोधी विचारांचें काहूर माजलें ? त्यानें आपल्या भाऊबंदांस मान खालीं घालून नजराणे कां पाठवले ? तंबलचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यानें कोणाचें साहाय्य घेतलें ?

२०. जखमी वाघ : कोणाच्या साहाय्यानें बाबुर समरकंदवर चालून गेला ? त्यानें तंबलची शक्ति कमी करण्याकरितां काय केलें ? बाबुरच्या मांडीला जखम कोणीं व केव्हां केली ?

२१. कुचंबणा : बाबुरनें जिंकलेले प्रांत अहंमदखानाचे ताब्यांत देण्यांत महंमदखानाचे हेतु काय होते ? आपली कृति बाबुरच्या फायद्याकरितांच आहे हें त्यानें बाबुरला कसें पटवून दिलें ? बाबुरनें त्याच्या म्हणण्याला मान्यता कां दिली ?

'सुसरीबाई, तुझी पाठ मऊ.'—कल्पनेचा विस्तार करा.

२२. सुटका : बाबुराचे मनाला कोणती जखम झाली होती ? तंबलच्या भावानें बाबुरची मदत कां मागितली ? त्यांत त्याचें राजकारण कोणचें होतें ? मामानेंसुद्धां तंबलला मदत करावी असें बाबुरला कां सुचविलें ?

'सुखकारक परिस्थितीच्या हिरवळींतून प्राणघातक प्रसंगाचा नाग सळसळत होता.'—हिरवळीची परिस्थिति कोणती ? नाग कोणाला म्हटलें ? कां ?

'दुधानें तोंड पोळलें कीं ताक फुंकून प्यावें.'—कल्पनाविस्तार करा.

२३. काबूल : बाबुरची दृष्टि समरकंदहून काबुलकडे कां वळली ? लेखकानें 'हरळीची मुळी' कशाला म्हटलें आहे ? लुटालूट करणाऱ्या सरदाराला बाबुर कोणची शिक्षा देत असे ? कां ? काबूलवर स्वारी करण्याकरितां त्याला कोणीं मदत केली ? काबूल जिंकण्यांत बाबुरला फारसे कष्ट घ्यावे लागले नाहींत, असें कां ? मुकीमबेग याचा प्रश्न बाबुरनें कसा मिटवला ? कां ?

२४. स्थिरस्थावर व व्यवस्था : बाबुरला काबूलचें राज्य मिळाल्यावर त्यानें कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी केल्या ? त्या गोष्टी करण्यांत बाबुरची दृष्टि कोणती होती ? तेथील लोकांशीं वागण्याचें बाबुराचें धोरण कोणतें होतें ? तें तसें कां होतें ? फार पूर्वींच्या—एका म्हातारीनें मनांत पेरलेल्या—कल्पनेस साकार स्वरूप देण्याकरितां त्यानें कोठें कोठें प्रवास केला ? बकीबेगची मिजास उतरविण्यासाठीं बाबुरानें काय केलें ? तें करणें योग्य होतें का ? तसें जर त्यानें केलें नसतें तर काय झालें असतें ? बकीबेगला क्षमा न करण्यांत बाबुराचा हेतु कोणता ?

मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली असतां इतर सरदार शिरजोर बनतात व राज्यकारभारांत सुसूत्रपणा रहात नाहीं. एवढेंच नव्हे तर ते सरदार मध्यवर्ती सत्तेपासून फुटून निघून स्वतःचें घर थाटतात.—अशीं इतिहासांतील उदाहरणें सांगा. ( दक्षिणेंतील निजाम, मल्हाराव होळकर आणि...? )

२५. हिरात : बाबुरच्या मनाला कोणतें शल्य बोचत होतें ? कां ? तें नाहींसें करण्याकरितां उपाय कोणता होता ? हुसेन मिर्झानें बाबुरास खलिता कां पाठविला ? बाबुरानें तें आमंत्रण तात्रडतोब कां स्वीकारलें ? पण त्याच्या या उत्साहावर विरजण कसें पडलें ?

' फोडा व झोडा ' याचा अर्थ काय ?—या तत्त्वामुळें आपणापेक्षां बलाढ्य लोकांनासुद्धां नामोहरम करतां येतें. विरुद्ध पक्षांची एकजूट होऊं शकत नाहीं, त्यांचें सामर्थ्य विभागलें जातें. मग त्यांपैकीं प्रत्येकास नामोहरम करणें सोपें जातें.—या तत्त्वाला बळी पडलेलीं अशीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील उदाहरणें द्या.

२६. दारूचें दुरून दर्शन : बाबुराचें आदरातिथ्य करण्यासाठीं मुजफरनें खान्याचे वेळीं कोणत्या पेयाचा समावेश केला होता ? सर्व लोक दारू घेत असतां बाबुरनें दारूला स्पर्श कां केला नाहीं ? बाबुरला तेरेबखाना येथें राहण्याचा कंटाळा कां आला ? तेथें त्याला कोणकोणत्या प्रकारचीं सुखें लाभलीं ? तेथून तो काबूलला कां परतला ?

२७. खडतर प्रवास : कोहिलकोटी या गुहेपर्यंत बाबुरनें केलेल्या प्रवासाचें वर्णन थोडक्यांत करा. बाबुर गुहेंत कां गेला नाहीं ? असें करण्यांत बाबुरच्या अंगचा कोणता गुण दिसून येतो ? या त्याच्या कृतीमुळें सैनिकांचे मनावर काय परिणाम झाला असेल ?

२८. काबूलचें कारस्थान : बाबुर हिरातला असतां काबूलमध्यें कोणीं कारस्थान केलें ? कां केलें ? तें करणें त्यांना योग्य होतें का ? कां ? त्या कारस्थानाचा बींमोड करण्यासाठीं त्यानें काबूलवर हल्ला कां केला नाहीं ? मग कोणत्या मार्गानें तो काबूलचा राजा झाला ? त्यांत त्याच्या अंगचा कोणता सद्गुण दिसून येतो ?

२९. कंदाहार : शैबानीखानाविरुद्ध लढा देण्यासाठीं बाबुरभोंवतीं लोक कां जमा झाले ? शैबानीखानाविरुद्ध लढण्यासाठीं बाबुरास कोणीं बोलाविलें ? त्यांत त्यांचें कोणतें धोरण दिसून येतें ? कंदाहारला बाबुर कां गेला ? तेथें

त्याला काय दिसून आलें ? कमी सैन्य असतांना बाबुरनें कंदाहार कसें जिकलें ? या स्वारींत त्याला कोणता फायदा झाला ? शिस्तीनें बांधलें गेलेलें छोटें सैन्यसुद्धां बेशिस्त अशा अफाट सेनेची धूळधाण उडवूं शकतें हें तत्त्व त्यानें ओळखलें.

३०. बादशाह् : बाबुरनें काबूल कां सोडलें ? काबूल सोडल्यानंतर त्याचें लक्ष कशावर केंद्रीभूत झालें ? हिंदुस्थानवरील आपली स्वारी अर्धवट टाकून तो काबूलला परत कां फिरला ? बादशाह झाल्यानंतर बाबुरविरुद्ध कोणीं बंड केलें ? कां केलें ? त्याचा शेवट कसा झाला ?

३१. पुन्हां एकदां समरकंद : शैबानीखानाचा पाडाव कोणीं केला ? त्यानें बाबुरला मदतीला कां बोलाविलें ? बाबुरला या लढाईत कोणाची जास्त मदत झाली ? १५११ सालीं बाबुरच्या ताब्यांत असलेले प्रदेश नकाशांत भरा.

३२. सिंहासनावरून उचलबांगडी : बाबुराला सिंहासन कां सोडवें लागलें ? त्यानें शिया पंथ कां स्वीकारला ? लोक बाबुराविरुद्ध कां चिडले ? बाबुरच्या एवढ्या मोठ्या सेनेचा ३००० उझबेग पराभव कां करूं शकले ? बाबुरचें हें करणें चुकीचें होतें कीं बरोबर ? कां ? यांत दिसून येणारें मुसलमानांचें धर्माचें वेडेंपण आजच्या घडामोडींत कोठें दिसून येतें का ? ' मुहमें नाम और बगलमें छुरी ' म्हणजे काय ? ही राज्यक्रांति कां झाली ?

३३. तोफेचें ओतकाम : बाबुरानें हिंदुस्थानवर आतांपर्यंत ( १५२५ ) किती स्वाऱ्या केल्या ? त्यांचा परिणाम काय झाला ? बाबुरानें पहिली तोफ कोणाच्या मदतीनें ओतविली ? दोन भागांत तोफ ओतली असतां तें काम सोपें होतें हें केव्हां कळून आलें ? या तोफांचें सहाय्यानें तो कोणती गोष्ट करूं शकला ?

मराठे इंग्रजांकडून शस्त्रास्त्रें विकत घेत असत, पण तयार करीत नसत. कवायत शिकवलेल्या सैन्याचं मुख्य कोण होतें ? तसें कां ? बाबुरच्या धोरणांत व पूर्वींच्या मराठ्यांच्या धोरणांत कोणता फरक दिसतो ?

३४. दारूबाज : बाजऊर लोकांचा धुव्वा उडविण्यांत बाबुराला कशाची मदत झाली ? ' दारू बाबुरानें सोडली, पण दारूनें त्यास सोडलें नाहीं '— म्हणजे काय ? शेवटपर्यंत बाबुराला कोणतें व्यसन होतें ?

३५. पानिपत : बाबुरला हिंदुस्थानबद्दल आपलेपणा कां वाटत होता ? बाबुरनें इब्राहिमखानाकडे काय निरोप पाठविला ? इब्राहिमखानानें त्या खलित्यासंबंधीं कोणतें धोरण स्वीकारलें ? त्यानें काय करावयास पाहिजे होतें ? इब्राहिमखानाच्या अफाट सेनेचा बाबुरानें धुव्वा कसा उडवला ? इब्राहिमखानाचा पराभव कशामुळें झाला ? दुसऱ्या महायुद्धाचा शेवट ॲटमबॉंबनें व पहिल्या महायुद्धाचा शेवट टॅंकनें केला.

३६. कालंदर : पानपत येथें इब्राहिमखानाचा पराभव होण्याचीं कारणें कोणतीं ? शिवाजीचें सैन्य कमी असतां मोगल त्याचा युद्धांत पराभव कां करूं शकले नाहींत ? संताजी-धनाजीनें मुसलमानांस कसें त्राहि भगवान करून सोडलें ? ' तुलुग्मा ' या युद्धपद्धतीची माहिती द्या. ' खुदबा ' म्हणजे काय ? या युद्धांत मिळालेल्या लुटींतून त्यानें कोणास काय काय दिलें ? यांत त्याच्या अंगचा कोणता गुण दिसून येतो ? बाबुरानें इब्राहिमखानाच्या आईची व्यवस्था काय केली ? कां ? हें सर्व करीत असतां त्यानें स्वतःकरितां काय ठेविलें ? कां ? त्याला कालंदर हें नांव कां मिळालें ?

३७. अनाहूत संकट : बाबुरच्या सैन्यांत ' मायदेशीं परत चला ' अशी लाट उसळल्याचें कारण काय ? बाबुरानें त्या प्रसंगाला कोणत्या प्रकारें तोंड दिलें ? महंमद गझनी, तैमूरलंग व बाबुर यांच्या स्वाऱ्यांत कोणता फरक होता ? त्यांच्याशीं सहकार्य न करणारी प्रजा बाबुरच्या बाजूला कां वळली ?

३८. राणा संग : राणा संग हा कोण ? कोठला ? त्याचा मोठेपणा थोडक्यांत द्या. बाबुर जर हिंदुस्थानांत आला नसता तर राणा संगानें काय केलें असतें ? कशावरून ? राणा संग व बाबुर यांचें बिनसायचें खरें कारण कोणतें ? त्यांचें जर मैत्रीचे संबंध होते तर ' राणानें शब्द पाळला नाहीं ' असें बाबुर कां म्हणाला ? राणाची बाबुरविरुद्ध काय तक्रार होती ?

३९. कानवाची लढाई : ही लढाई कोणाकोणांत झाली ? राणा संगाच्या बाजूला कोणकोण होते ? ते कशाकरितां लढत होते ? त्यांची कल्पना काय होती ? महंमदखान लोदी राणास कां येऊन मिळाला ? बाबुराला

लढाईच्या कोणकोणत्या पद्धती अवगत होत्या ? तरी तो राणाला मनांतून कां घाबरला होता ? पहिल्या चकमकीनंतर त्याचे लोक यशाविषयीं निराश कां झाले ? त्यानें अशा प्रसंगीं 'दारू घेणार नाहीं' अशी प्रतिज्ञा कां केली ? त्यानें सैन्यापुढें केलेल्या भाषणाचा परिणाम काय झाला ? आपल्याला जय मिळत नाहीं असें दिसतांच त्यानें लढाईच्या कोणत्या पद्धतीचा उपयोग केला ? राणा चितोडमध्यें कां गेला नाहीं ? 'गाजी' हें उपपद कोणीं लावलें ? कां ? त्याचा अर्थ काय ?

४०. इतर सत्ताधाऱ्यांचा बीमोड : राणा संग याशिवाय आणखी कोण कोण त्याचे शत्रू बनले ? कां ? त्यांचा बंदोबस्त बाबुरानें कसा केला ? त्याच्या उमद्या स्वभावाबद्दल कांहीं दाखले द्या. त्याच्या चांगल्या संवयी कोणत्या ? बाबुरला मिळालेल्या या मोठ्या विजयाचें रहस्य कशांत आहे ? 'शिस्तीचें लष्कर असावें' याची जाणीव मराठ्यांना केव्हां झाली ? त्यांत कोणीं लक्ष घातलें ?

४१. हुमायूनसाठीं बलिदान : इतर राजपुरुष व बाबुर यांच्या स्वभावांत अत्यंत महत्वाचे फरक कोणते होते ? बाबुरानें हुमायुनाला पत्रांतून काय उपदेश केला आहे ? हुमायून पुढें चांगला राज्यकर्ता व्हावा याकरितां बाबुरानें काय केलें ? हुमायुनाला आराम वाटावा म्हणून बाबुरानें काय केलें ? मरणापूर्वीं बाबुरानें कोणती गोष्ट करविली ? बाबुराच्या मोठेपणाचीं रहस्यें त्याच्या जीवनांतून वेचून काढा.

---

## आधार ग्रंथ

(1) A history of India under first two soveriens of the house of Taimur, Babur and Humayun.
(2) Babur by Lane Poole.
(3) Babur Nama in English by A. S. Beveridge.